
किल्लारी

# भूकंपाचा साक्षीदार

किशोर नावंदे

पोलिस उपनिरिक्षक



किल्लारी

# भुकंपाचा साक्षीदार

किशोर नावंदे

पोलिस उपनिरीक्षक



॥ सुमेय प्रकाशन ॥

नांदेड.

सुमेय : व्दितीय प्रकाशन

Killari Bhookampacha Sakshidar
Kishor Navande

---

किल्लारी भूकंपाचा साक्षीदार
किशोर नावंदे

---

© सौ. संध्या किशोर नावंदे
वृंदावन गार्डन गोकुळनगर,
नांदेड.

---

प्रथमावृत्ती :
१७ ऑगस्ट २०००

---

प्रकाशक
सुमेय प्रकाशन
चंद्रमौळी, कैलासनगर, नांदेड. दूरध्वनी : ५५६२०

---

अक्षरजुळणी व मुद्रक
सुमेय ऑफसेटस व पद्मावती कॉम्प्युटर्स
२७, व्यंकटेश अपार्टमेंटस्, बजाज मार्केट, वजिराबाद,
नांदेड. दूरध्वनी : ३१२६६

---

मुखपृष्ठ
भ.मा.परसवाळे


---

किंमत : १२० रु.

## ॥ अर्पण पत्रिका ॥

किल्लारी भूकंपात उध्वस्त झालेल्यांना
व त्यांचे नव्याने जीवन उभे करण्यासाठी..
ज्या ज्ञात अज्ञात समाजसेवक पुढारी
आणि तत्कालिन प्रशासनातील मदत
मोहिमेत सहभागी असणाऱ्या
सर्वांना.....

**किशोर नावंदे**



# मनोगत

३० सप्टेंबर सन १९९३ चा सूर्य भुपाळीचे स्वर घेऊन ऊगवला नाही तर भल्या पहाटे ३.५६ मिनिटाला किल्लारी आणि परिसराला भूंकपाचा प्रचंड धक्का बसला, शास्त्रीय भाषेत या धक्क्याची तिव्रता ६.४ रिश्टर स्केल एवढ्या तिव्रतेचा हा भूकंप सतत ४५ सेंकद होत राहिला. भूकंपामुळे लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकजीवनात अमूलाग्र असा बदल घडून आला. सर्वत्र हाहाःकार आणि किंकाळ्याने आसमंत भरून गेला. प्रचंड हानी झाली सुमारे ५२ गावात कित्येकजण ढिगाऱ्याखाली दबले गेले तर शेकडो गावातून प्रचंड प्रमाणात वित्तहानी झाली. गेल्या शतकातला हा महाविनाशकारी भूकंप म्हणावा लागेल. ४५ सेकंदाच्या भूकंपाने अंदाजे नऊ हजार लोकांना मृत्यू आला. हजारो लोक जखमी झाले. अनेकजण अपंग झाले तर अनेकाच्या मनावर मानसिक आघात झाला.

भूकंपा पूर्वीची व भूकंपा नंतरची, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती मी जवळून पाहिली पोलिस उपनिरीक्षक म्हणून दरम्यानच्या काळात मी किल्लारीला कार्यरत होतो. कायद्याचे पालन करता करता समाजजीवनाचे निरीक्षण करण्याची मला सवय आहे; कारण माझे पदव्युत्तर शिक्षण हे सामाजिक कार्य या विषयात झाले. किल्लारीतील व परिसरातील समाज रचना, लोकजीवन, रूढी, परंपरा, त्या भागातील लोकाच्या धार्मिक वृत्तीचा परिचय झाला होता. भूकंपा पूर्वीची संस्कृती क्षणात बदलली होती. नैतिकता आणि पिढ्यान पिढ्या जोपासलेल्या चालिरिती लोप पावत होत्या लोकांची मानसिकता बदलल्या नंतर जे वास्तव चित्र मला दिसले ते सर्व जशास, तशे टिपण्याचा मी प्रयत्न केला आहे.

श्री विर्सजनाची ती रात्र होती. उत्तररात्री भूकंप झाला रात्री मस्तीत नाचणारे अनेक पुन्हा कधी दिसले नाही. मी स्वतः सुदैवाने जिवंत राहिलोः मी माझे कुटुंब घरातून बाहेर पडता क्षणीच घर कोसळले म्हणून मी सर्व घटनाचा साक्षीदार ठरलो.

भूकंपा नंतर काही लेखकांनी केवळ अंदाजाने भूकंपावर पुस्तके लिहिली, काहीनी भूकंपावर कविता लिहल्या. हे सर्व लेखन माझ्या वाचनात आले. परंतु वस्तुस्थितीला धरून नसलेले लेखन पाहून मला आश्चर्य वाटले, कारण या परिसरात घडलेल्या प्रत्येक क्षणाचा आणि प्रत्येक घटनेचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्या पैकी मी एक आहे. जे अनुभवातून उतरले आहे. जे पाहिले आहे ते सर्व सहजपणे लेखणीतून उतरले आहे वाचकांना वस्तुस्थितीची जाणीव व्हावी एवढाच माझा प्रामाणिक उदेश आहे.

भूकंपानंतर निर्माण झालेला हलकल्लोळ व हदयाला पाझर फोडणाऱ्या किंकाळयाचे वृत्त हवेने जगात पसरविले. महाराष्ट्रातच नव्हे तर विदेशातूनही भूकंप ग्रस्तांना मदतीसाठी लोक धावले अनेक सेवाभावी संस्था, नेते मंडळी, प्रशासन मदतीसाठी धावले, या सर्व मदत कार्यांतून माणुसकीचे दर्शन झाले या क्षणी जे जिवंत राहिले त्यापैकी अनेकजण श्रीमंत होते. भूकंपाच्या एका धक्क्याने त्यांना मदत मिळण्यासाठी लाचार असलेल्या रांगेत नियतीने उभे केलेले मी पाहिले. भूकंपामुळे जात आणि धर्म, सामाजिक भेदभाव नाहीसा झालेला दिसला. मात्र मदतीचा ओघ जसा जसा वाढू लागला तसातसा सामाजिक विकृतींचा उगम ही पाहिला. ही विकृती माणूसकीची सीमारेषापलिकडे गेली होती. भूकंपानंतर एक नव्या तत्वहीन संस्कृतीने जन्म घेतला होता हे सर्व सारांश रूपाने या पुस्तकात वाचकांना वाचावयास मिळेल.

मी पुस्तक लिहित असतांना माझी पत्नी सौ. संध्या, मुलगा संकेत, मुलगी संयुजा यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले व माझा उत्साह द्विगुणीत केला म्हणून त्यांचा उल्लेख या ठिकाणी मला करणे भाग आहे. तसेच लिखानाला व्यवस्थित रूप देण्यासाठी मला श्री. प्रा. सेलूकर, श्री. अशोक अर्धापूरकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच माझे कवि मित्र प्रा. विलास वैद्य व चित्रकार मित्र भ.मा. परसावळे यांचे ही वेळोवेळी प्रोत्साहन दिले या श्रेय नामावलीत विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. एच.बी. घुले साहेब, श्री. सुप्रकाश चक्रवर्ती साहेब, पोलिस उपमहानिरीक्षक श्री. रामराव घाडगे साहेब तसेच श्री. पारधी साहेब, पोलिस अधिक्षक श्री. रितेशकुमार साहेब, श्री. गावीत साहेब, श्री. धंनजय कमलाकर साहेब, पोलिस उपअधिक्षक श्री. निसार तांबोळी, श्री. कैलास कणसे, श्री. जालंदर सुपेकर तसेच पोलिस निरीक्षक जेम्स आंबिलढगे, श्री. शिवाजी रूपनार तसेच किल्लारी परिसरातील सर्व जुनी मित्र मंडळी यांचा उल्लेख यशावकाश आलाच त्या सर्वांचा मी ऋणी आहे. हे माझे प्रथम पुस्तक आपल्या हाती देतांना मला आनंद होत आहे.

**किशोर नांवदे**

बी.ए.,बी.एड्.,एम.एस.डब्ल्यु.

पोलिस उपनिरीक्षक

# प्रस्तावना

किशोर नावंदे हे १९९३ मध्ये किल्लारी ता. औसा जि. लातूर येथे पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. किल्लारी येथे झालेल्या प्रलयंकारी भूकंपाचे हे एक साक्षीदार आहेत एक संवेदनशील वृत्तीचे पोलिस अधिकारी म्हणून नावंदे यांनी भूकंपावरील दर्दभरी कहानी शब्द बद्ध केली आहे. पोलिस खात्यात असूनही माणुसकीचा ओलांवा त्यांच्या जवळ असल्याचे प्रकर्षाने जाणवते. भूकंपामुळे किल्लारीत नेमक काय घडले ? घरा दारांची अवस्था काय झाली ? दबलेले जीव श्वास कोंडून ढिगाऱ्याखाली कसे मृतप्राय झाले ? मृतांची विल्हेवाट कशी लावली गेली ? जगलेले, वाचलेले लोक जीव मुठीत घेऊन दिशा फुटेल तिकडे, कसे सैरा वैरा पळत सुटले ? माणुसकीच्या नात्याने भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी जनसागर कसा धावून आला ? शासकीय अधिकारी, स्वंयसेवी संस्था यांनी नेमकी कोणती भूमिका पार पाडली? जिकडे तिकडे भेसूर आक्रोशाचे कल्लोळ कसे निर्माण झाले ? मातीच्या ढिगाऱ्यातून जीवंत राहिलेल्या बांधवांनी प्रपंचाची घरा-दारांची पूर्नमांडणी कशी केली ? माकणी धरण फुटले या अफवेने लोकांची तारांबळ कशी उडाली ? जखमी व विव्हळणाऱ्या जीवाच्या अत्यांतिक यातना, संपूर्ण किल्लारी गावाचे स्मशान भूमीत झालेले रूपांतर ? भूकंपाच्या जबर आघातांनी मानसिक विकृती कशी निर्माण झाली ? भूकंपानंतर झालेल्या मदतीमुळे व शासनाच्या आर्थिक सहकार्यामुळे चंगळवाद कसा वाढला ? व्यसनाधिनतेचे व गैरप्रकारांचे स्तोम कसे निर्माण झाले ? ऐतखाऊ वृत्तीमुळे लोकांची मनोवृत्ती कशी बनली ? या सारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे नावंदे यांनी आपल्या छोटेखानी "किल्लारी भूकंपाचा साक्षीदार" या ग्रंथाद्वारे

देण्याचा सहजतेने प्रयत्न केला आहे.


नावंदे यांनी ३७ प्रकरणांतून एका अर्थाने किल्लारी भूकंपाचे जिते-जागते दर्शन घडविले आहे. पोलिस उपनिरीक्षक या नात्याने नावंदे यांच्या जवळ चोखंदळ अशी निरीक्षण शैली आहे. माणसाचे मानसशास्त्र जाणण्याचे चांगले कसब त्यांच्याजवळ आहे. हे त्यांच्या लिखाणांतून सहजरित्या लक्षात येते. भूकंपाच्या काळात ते पोलिस उपनिरीक्षकापेक्षा समाज कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून सक्षमरितीने कार्यरत होते. ह्याची प्रचिती त्यांच्या लिखाणांतून येते भूकंपामुळे उध्वस्त झालेल्या लोकांच्या व्यथा आणि वेदना जशा शब्दबध्द केल्या आहेत; त्याचप्रमाणे भूकंपामुळे जाती-धर्मांच्या भिंती कशा कोसळून पडल्या ? मदतीसाठी सर्व जाती-धर्मांचे लोक एकाच रांगेत कसे आलेत ? तात्पुरत्या उभारलेल्या शेडमध्ये विविध जाती-धर्मांच्या बांधवांनी "माणुस तितुका एक आहे", ह्यांचे अनोखे प्रत्यंतर कसे घडवून दिले. ह्यांचे हे मर्मग्राही विवेचन लेखकाने कौशल्यपूर्ण रितीने केले आहे.

किल्लारी आणि परिसरातील अनेक गावांची भूकंपामुळे नेमकी काय दुर्दशा झाली ? ह्यांचे वास्तववादी दर्शन नावंदे यांनी या ग्रंथात लेखनीबद्ध केले आहे. नावंदे यांनी आपल्या ग्रंथात मी भूकंपाचा गाईड झालो असे मान्य केले आहे. भूकंपाचा मार्गदर्शक व पोलिस उपनिरीक्षक या नात्याने ३० सप्टेंबरच्या पहाटेपासून घडलेल्या सर्व बारीक सारीक घटनांचे साद पडसाद या ग्रंथात यथार्थपणे उमटले आहेत. भूकंपानंतरची किल्लारीची नेमकी अवस्था समजून घेण्याच्या संदर्भात सर्व सामान्य वाचकांना इत्थभूत माहिती देण्याच्या दृष्टीने या ग्रंथाची उपयुक्तता लक्षणीय ठरणार आहे.

नावंदे यांनी मंगरूळ येथील ढिगाऱ्याखालील पलंगाच्या पोकळीत चार दिवसानंतर जिवंत असलेल्या अडीच वर्षांच्या मुलीचे अत्यंत

वाटते. एखादी सुगरण खोप्याची गुंफण ज्या पद्धतीने करते त्या पद्धतीने नावंदे यांनी प्रवाही शब्दांत या ग्रंथाची मांडणी केली आहे. भूकंपात प्रत्यक्षात असलेल्या आणि पहिल्या धक्यापासून अनेक धक्के सोसलेले सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या संवेदनशील लेखकाने केलेले हे वर्णन आहे. मराठी वाचकांना किल्लारीचा भूकंप व त्यामुळे उध्वस्त झालेले गांव, गांवाची बदललेली मानसिकता, माती दगडांचे प्रचंड ढिगारे, आत्यंतिक वेदनानी विव्हळणारे असहाय जीव, मृतांचे ढिगारे आणि अश्रू गोठविणारे कितीतरी प्रसंगाचे वास्तवचित्रण किशोर नावंदे यांनी परिणाम कारक रितीने केले आहे. त्या बद्दल त्यांना धन्यवादच दिले पाहिजेत. पोलिस उपनिरीक्षकांमधील हे 'माणुसपण' अखेरपर्यंत असेच टिकून राहो ही अपेक्षा.

वाचकवर्ग या ग्रंथाचे यथोचित स्वागत तर करतीलच ह्याची मला खात्री वाटते. तद्वतच वेदनेशी नाते जोडण्याचा भावही अंतःकरणात बाळगतील असं मला वाटते, खऱ्या अर्थाने तेच या ग्रंथाचे खरं फलीत असणार आहे. संवेदनाशून्य समाजाला हरवलेल्या पुन्हा संवेदना देण्याऱ्या लेखन उपक्रमास माझ्या हार्दिक शुभकामना...



विकास आमटे

(आनंदवन)

# १

३० सप्टेंबर १९९३, वार गुरूवार, वेळ सकाळी ३ वाजून ५६ मिनीटे, जमिनीखालून प्रचंड गडगडाट झाला. काही क्षणातच किल्लारी आणि सभोवतालच्या परिसरातील शेकडो गावांचे होत्याचे नव्हते झाले. महाविनाशकारी भूकंप झाला होता. एका क्षणात घरे जमीनदोस्त झाली. झोपेत असलेल्यांना नियतीने जागे होण्याची संधी देखील दिली नाही. त्यातून काहींनी आपले प्राण वाचविले. चोहीकडे एकच कल्लोळ माजला. आक्रोश कानावर आदळू लागला. अशा ह्या विनाशकारी भूकंपाचा व भूकंपामुळे किल्लारीतील बदललेल्या जनजीवनाचा मी एक साक्षीदार !

किल्लारी गाव इतर सामान्य गावाप्रमाणेच एक होते. या गावचा फारसा परिचय सर्वदूर असण्याचे कारण नव्हते. भूकंपामुळे एका क्षणात किल्लारीला जगात प्रसिद्धी मिळाली. मी शासकीय सेवेत असल्यामुळे किल्लारीस आलो होतो. भूकंपापूर्वी काही दिवस आधी मी पोलिस उपनिरीक्षक म्हणून तेथील ठाण्यावर रुजू झालो होतो. त्यामुळे गावाशी माझे थोडे जुने नाते होते. मी मुरूडहून दि. २६.६.१९९३ रोजी किल्लारीस येऊन दाखल झालो. शासनाच्या आदेशाप्रमाणे येथे माझी बदली झाली होती. तेथील माझे सहकारी अधिकारी श्री शेख यांच्याकडून मी कार्यभार स्वीकारला व कामकाजास प्रारंभ केला. तेथे कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या ओळखीही करून घेतल्या; अशा रीतीने माझा पहिला दिवस संपला.

दुसऱ्या दिवशी मी पोलिस स्टेशनवर येऊन कामास सुरुवात केली.

माझ्या सहकाऱ्यांना थोड्याफार सूचना दिल्या. तसे किल्लारी मला नवखे वाटत नव्हते. याचे नेमके कारण असे की, सन १९९० मध्ये मी शिकाऊ पोलिस उपनिरीक्षक असताना या भागात काही दिवसाकरिता आलो होतो. येथील किल्लारी सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात एका कर्मचाऱ्याचा खून झाला होता. येथे बंदोबस्ताच्या निमित्ताने मला दीड महिना वास्तव्य करावे लागले होते. दरम्यानच्या काळात या परिसरातील अनेक लोकांचा जवळून परिचय झाला होता. त्यामुळे हे गाव मला नवीन असे वाटलेच नाही. बदल एवढाच की यापूर्वी बंदोबस्ताच्या कारणामुळे काही काळासाठी आलो होतो, तर ह्याच ठिकाणी आता पूर्ण वेळ व स्वतंत्रपणे काम करण्याची संधी मिळाली होती. मी कार्यालयात काही फाईली चाळत असताना पोलिस स्टेशन बाहेर काही मंडळी आमच्या पोलिस शिपायांबरोबर हितगुज करताना दिसली. तेव्हा मी सहज त्याला विचारले,

"काय रे बाबा, काय म्हणतात ते लोक?" तेव्हा त्यावर त्याने सांगितले,

"साहेब, काही नाही. इथे नवीन फौजदार आला की लोक असेच विचारत असतात." "म्हणजे?" माझा प्रश्न. त्यावर ते म्हणाले,

"तसं फार काही विचारत नाहीत. पण फौजदार कसा आहे, त्यांचा स्वभाव कसा आहे, तो कोण्या जातीचा आहे, तो कोण्या गावचा आहे, कडक आहे का," वगैरे वगैरे बाबत माहिती काढतात. हे ऐकून मी शिपायास म्हणालो,

"मग तू त्यांना माहिती दिली का ?"

"नाही साहेब, मलाच आपल्या बद्दल अजून पूर्ण माहिती व्हायची आहे", तो सहज म्हणाला. एकूणच ग्रामीण भागातील बरेचसे राजकारण पोलिस संबंधावर आधारीत असते. त्याला हेही गाव अपवाद नसावे, असे मला

वाटले व मी परत फाईल पाहू लागलो.

किल्लारी येथे पोलिस वसाहत नसल्यामुळे येथे राहण्याचा प्रश्न माझ्यासमोर नव्याने निर्माण झाला. येथे येताच पहिल्यांदा घर शोधणे ही महत्त्वाची बाब समजून मी पोलिस कर्मचाऱ्यांना म्हणालो,

"माझ्यासाठी एखादे सुव्यवस्थित घर मिळेल काय ?" त्यावर एकाने सांगितले,

"साहेब, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे या गावात चांगले घर मिळणे कठीण आहे."

"येथे जवळपास सगळी घरे जुन्या पध्दतीची व दगडामातीची बांधलेली आहेत. तरीपण साहेब, आम्ही तुमच्यासाठी चांगले घर शोधण्याचा प्रयत्न करतो."

हे ऐकून माझ्या राहण्याचा प्रश्न सुटल्यासारखा वाटला. थोडसं काम आटोपून मी रेस्टहाऊसवर गेलो. रात्र बरीच झाली होती. गावात शांतता राखण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करावेत याचा सहज विचार करीत पडलो होतो. तेवढ्यात रेस्टहाऊसचा वॉचमन आत आला आणि म्हणाला, "साहेब जेवायला वाढू का ?"

"ठीक आहे" म्हणत मी जेवायला बसलो. मला लागेल ते तो वॉचमन आणून देत होता. माझ्या डोक्यात घराचा प्रश्न होताच. सहज म्हणून मी त्याला विचारले, "का रे बाबा या गावात चांगली घरे नाहीत का ?"

त्यावर तो म्हणाला, "नाही साहेब, येथे कोणीही भाजक्या विटांची घरे बांधीत नाहीत. त्यामुळे सर्व घरे जुन्या पध्दतीचीच आहेत."

मी त्याचा चेहरा बघत त्याला परत विचारले, "याचं काय कारण आहे ?"

त्याला नेमके उत्तर माहीत नाही हे मी त्याचा चेहरा पाहून ओळखले. तरीपण तो म्हणाला,

"साहेब, का बांधीत नाहीत हे मलाही माहीत नाही."

किल्लारी गावात इतके श्रीमंत लोक असून सुध्दा आधुनिक पद्धतीची घरे का बांधीत नसावीत, असा नवा प्रश्न मनात घोळत राहीला. जेवण आटपून अंथरूणावर पडल्यापडल्या केव्हा झोप लागली हे कळले नाही.

सकाळी झोपेतून उठताच आवारातील झाडांवरील पक्ष्यांचा चिवचिवाट कानावर पडला व मन उल्हसित झाले. सकाळची कामे आटोपून पोलिस स्टेशनवर जाण्याची तयारी करीत असतानाच,

"जय हिंद सर" आवाज आला आणि त्या पाठोपाठच आमचा सफाई कामगार प्रभू आत आला. प्रभू आमच्याच खात्यात तात्पुरत्या नेमणुकीवर सफाई कामगार म्हणून काम करीत असे. मी युनिफॉर्म घालत असताना त्यास विचारले, "प्रभू या पूर्वीचे सर्व फौजदार गावात कोठे राहत होते?" त्यावर त्याने सांगितले, "साहेब, येथे आलेल्यापैकी बरेच फौजदार साहेब एकटेच राहायचे. त्यांनी येथे कधी मुलाबाळांना आणल्याचे आठवत नाही."

मी त्याच्या चेहऱ्याकडे बघत त्याच्या मनात काय आहे हे जाणून घेण्याच्या प्रयत्नात होतो. पण 'घर' महत्त्वाचे असल्यामुळे त्याला मी म्हणालो,

"मी कुटुंब आणणार आहे, पण व्यवस्थित घर तर मिळायलाच पाहिजे, पण यासाठी तूच घर शोधण्याचा प्रयत्न कर."

ही जबाबदारी आपण सहज पार पाडू शकतो, अशा अविर्भावात प्रभू म्हणाला,

"मला सर्व गावाची माहिती आहे, साहेब ! कारण मी इथलाच राहणारा

आहे. आपल्यासाठी नक्कीच एखादे चांगलं घर शोधतो."

"ठीक आहे," म्हणत कॉटवरच्या फाइल्स घेतल्या व पोलिस स्टेशनला निघालो.

कार्यालयात येऊन मी काही फाईल्स पाहून या भागातील एकूण परिस्थिती काय आहे, याचा अंदाज घेत होतो. दुपारपर्यंत मी ही माहिती घेण्यासाठी काही पोलिस शिपायांना देखील विचारून घेतले. दुपारपर्यंत कार्यालयात बसून होतो, नंतर जेवणासाठी रेस्टहाऊसवर निघण्याच्या तयारीत असतानाच प्रभू आत आला.

एखाद्या युद्धात जिंकून यावे अशा खुशित तो माझ्याशी बोलत होता.

"साहेब घर मिळाले बघा"

मी त्याच्या चेहऱ्याकडे कुतूहलाने पहात विचारले,

"कुठे आहे ?"

"आपले हजारे गुरूजी आहेत ना, त्यांचे घर चांगले आहे. तुम्हाला पाहिजे तसे आहे. तुम्ही आताच चला आणि घर पाहून घ्या," त्याने सर्व माहिती एका वाक्यात सांगून टाकली. वास्तविक पाहता हे हजारे गुरूजी कोण आहेत, याची मला काहीही माहिती नव्हती. दुपार टळून गेली होती मला खुप भूक लागलेली होती. पण प्रभूची तळमळ आणि उत्साह पाहून मी माझ्या एका सहकाऱ्याला सोबत घेऊन त्याच्या मागेमागे निघालो.

प्रभू पुढे आणि आम्ही त्याच्या मागोमाग जात होतो. रिमझिम पाऊस बरसत होता. रस्ते कच्चे असल्यामुळे चिखल तुडवीत आम्ही शिवाजी चौकात आलो. चौकाच्या मध्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. त्याच्या सभोवतालची बरीच जागा मोकळी असून वर्तुळाकार

काही कार्यालय, दुकाने, हॉटेल्स व पानटपऱ्या आहेत. मी नवीनच असल्यामुळे आजूबाजूच्या बऱ्याच लोकांनी मला नमस्कार करीत आपाद मस्तक न्याहाळले. हा माणूस आपल्यासाठी फायद्याचा आहे काय असेही काहींच्या चेहऱ्यावर मला स्पष्ट दिसले. काही लोक माझी ओळख नसताना जवळ येऊन नमस्कार करीत होते. मी पण ओळख असल्यासारखे स्मित हास्य करीत, हात जोडून नमस्कार करीत होतो. पण घर पाहणे महत्त्वाचे असल्यामुळे मी त्यांच्याकडे पूर्ण दूर्लक्ष करून पुढे निघालो.

गल्ली बोळांच्या चक्रव्युहातून एकदाचे आम्ही हजारे गुरूजींच्या घराजवळ आलो. आमच्या आधी प्रभू वाड्यात गेला आणि लगेच परत येऊन गुरूजी घरी नाहीत हे त्याने सांगितले. तरीपण घर पाहून घेण्याचे ठरवून मी वाड्यात गेलो. वाड्याचे सर्व बांधकाम दगडा-मातीचे होते, वर माळवद होते. त्यातल्या त्यात हे घर राहण्यासाठी ठीक आहे समजून आम्ही बाहेर पडलो.

"प्रभु, तु संध्याकाळी हजारे गुरूजींना पोलिस स्टेशनवर घेऊन ये" म्हणत, मी रेस्टहाऊसला गेलो.

माझ्या सांगण्याप्रमाणे प्रभूने गुरूजींना निरोप दिला असावा म्हणूनच सायंकाळी हजारे गुरूजी पोलिस स्टेशनवर भेटण्यासाठी आले. गुरूजींचा नमस्कार चमत्कार झाला, मी त्यांना बसण्यास सांगितले. त्यांच्या चेहऱ्यावरून मला माणूस चांगला वाटला. नंतर घराच्या मुद्यावर मी बोलायला सुरूवात केली. गुरूजींनी आपल्या मुलीच्या लग्नाची सबब सांगून घर देण्यास नकार दिला. त्यांच्या चेहऱ्यावर दिलगिरीचे भाव मला स्पष्ट दिसले.

"साहेब, मुलीचे लग्न ठरले तर जागा आम्हालाच लागणार. आता तुम्हाला घर द्यायचे व ऐनवेळी तुम्ही घर खाली नाही केले तर आमची पंचाईत व्हायची. शेवटी तुम्ही साहेब लोक, आम्हाला काही बोलता येणार नाही. तेव्हा तुम्ही दुसरीकडे घर पाहणे चांगले राहील," असे म्हणत त्यांनी अक्षरशः हात जोडले. त्यांची अडचण माझ्या लक्षात आली आणि मला तर घर पाहिजे होते म्हणून मी म्हणालो,

"गुरूजी, तुम्ही अजिबात चिंता करू नका. तुमच्या मुलीचे जेव्हा केव्हा लग्न ठरेल, तेव्हा मी लगेच घर खाली करून द्यायला तयार आहे. या बाबतीत तुम्हाला कोणाची हमी लागत असेल तर ती सुद्धा मी द्यायला तयार आहे," मी विनंतीच्या स्वरात सांगितले.

"नको साहेब, माफ करा ! तुम्ही दुसरेच घर पहा !" त्यांनी विनवणी केली. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नव्हती. घर मिळण्याची माझी आशा जवळजवळ मावळली होती. तरीपण शेवटचा प्रयत्न म्हणून गावातील काही प्रतिष्ठित मंडळीच्या मध्यस्थीने गुरूजींना पाहिजे ती हमी देऊन एकदाचा मार्ग काढला व मी घर मिळविले.

घराचा प्रश्न सुटला होता घर एकदम चांगले नसले तरीपण राहण्यासाठी योग्य असे होते. म्हणून सामान आणण्यासाठी मी मुरूडला गेलो, तिथे माझे बरेच मित्र होते. मुरूड सोडण्यापूर्वी आमचे एक मित्र मुंबरे सर यांच्याकडे चहापाण्यासाठी गेलो असता गप्पांच्या ओघात ते म्हणाले,

"आता तुम्ही किल्लारीला गेलात, चांगले गाव आहे. पण मागच्या वर्षी ऐन दीपावलीच्या दिवशीच त्या ठिकाणी भूकंपाचे धक्के बसले होते."

त्यांनी ही माहिती सहज म्हणून सांगितली भूकंपावर मी कधीही गांभियाने

विचार केला नव्हता. बराच वेळ आम्ही इकडच्या तिकडच्या गप्पा केल्या. एक वर्षाच्या वास्तव्यात अनेकांशी माझा स्नेह जडला होता. त्या सर्वांना धावत्या भेटी देऊन मी मुलाबाळांसह व घरातील सर्व सामानाचा ट्रक घेऊन किल्लारीकडे निघालो.

किल्लारीला पोहचताच आम्ही घेतलेल्या नव्या घरात सर्व सामान उतरून घेतले. मदतीला माझे सहकारी होते. मुलाबाळांच्या राहण्याची व्यवस्था झाल्याने एक चिंता मिटल्याचे समाधान वाटले.

किल्लारी गाव इतर गावांच्या तुलनेत बरेच मोठे होते. गावची लोकसंख्या अंदाजे १७,००० च्या जवळपास होती. किल्लारी ग्रामपंचायत अंतर्गत या गावाशिवाय थोड्या अंतरावर असलेली किल्लारी पाटी व किल्लारी वाडीचाही समावेश होता. नोंद करण्यासारखे एकही मोठे शासकीय कार्यालय नव्हते. तरीपण येथे ग्रामीण रूग्णालय, जिल्हा मध्यवर्ती बँक, विद्युत मंडळाचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय, एक तलाठी सज्जा, पोस्ट ऑफिस तसेच आमचे पोलिस ठाणे होते. लोकांची वाचनाची भूक भागविण्यासाठी एक सार्वजनिक वाचनालय होते तसेच दोन शैक्षणिक संस्था कार्यरत होत्या. एका गोष्टीची विशेष नोंद करावीशी वाटते. या भागात समाजवादी विचारसरणीचे एक वयस्कर जोडपे होते. लोक त्यांना ताई आणि भाऊ म्हणून संबोधत असत. यांची एक बालवाडी होती. हे दापंत्य सतत लहान मुलांमध्ये रमणारे होते. मुलांशी यांच्या इतके समरस होणारे कोणी दिसत नव्हते. किल्लारी हे गाव या परिसरातील एक मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होते. येथे सोन्यापासून ते सर्व जीवनावश्यक वस्तू मिळत असत. येथे दर शनिवारी आठवडी बाजार

भरत असे. बाजारच्या दिवशी सभोवतालच्या पाच-पंचवीस खेड्यातील लोक बाजार करण्याच्या निमित्ताने येथे येत असत. त्यामुळे किल्लारी ही एक गजबजलेली मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होती. विशेष म्हणजे येथे इतर शहराच्या मानाने कापड स्वस्त मिळत असे.

या भागात शेती व्यवसाय भरभराटीस आलेला होता. बहुसंख्य लोक आपल्या शेतातून ऊसाचे पीक घेत असत. ऊसाचे क्षेत्र जास्त असल्यामुळे किल्लारी सहकारी साखर कारखाना या भागात उभारला गेला होता. येथील शेतकरी ऊसाशिवाय द्राक्षाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेत असत. या भागातील द्राक्षे विदेशात निर्यात केली जात असत त्यामुळे किल्लारीला एक वेगळा नावलौकिक प्राप्त झाला होता. या भागात मजूर वर्ग सुध्दा मोठ्या प्रमाणात होता कारण त्यांना शेतीवर वर्षभर कामे मिळत असे. एकूण सबंध गाव उद्योगी असल्यासारखे दिसत होते. येथे रिकामटेकडे लोक सहसा पहावयास मिळत नसत.

गावात मोठी हॉटेल्स किंवा खानावळी नव्हत्या. साधारण हॉटेल्स होती, ज्यात भजे, पुरी-भाजी मिळत असे, तीन चार चहाची हॉटेल होती. करमणुकीची कोणतीही साधने येथे नव्हती. सायंकाळी लोक शिवाजी चौकात जमून गटागटाने गप्पा मारीत असत. बरेच जण रात्रीचे घराबाहेर पडण्याचे टाळत असत. गावात टवाळखोरी करणारे किंवा रस्त्यावर गुंडागर्दी करणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प होते.

या गावात सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत असत. इतरांच्या तुलनेत मराठा व लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात होता. तरीपण जातीयतेतून त्यांच्यात विशेष असे वाद उद्‌भवत नव्हते. 'सामाजिक ऐक्य'

असणारे गाव म्हणून किल्लारीचा उल्लेख होत असे. या ठिकाणचे वैशिष्ट्य असे की प्रत्येकजण सर्व जाती धर्मांच्या सणात व धार्मिक उत्सवात उत्स्फूर्तपणे भाग घेताना दिसत होते. लोकांचे एकमेकांसोबत सलोख्याचे संबंध होते. सामाजिक एकोप्यामुळे समंजस व प्रतिष्ठित लोकांची संख्या बरीच होती. लहानसहान भांडणतंटे पोलिस स्टेशनपर्यंत न जाता आपसात मिटवून घेण्याकडे लोकांचा कल होता. फारच गंभीर स्वरूपाची तक्रार असेल तर लोक पोलिस स्टेशनमध्ये येत असत.

सर्व पक्षाची राजकीय मंडळी येथे कार्यरत होती. त्यांचे राजकारण नेहमीच सामंजस्याचे दिसत होते. इतर ठिकाणी असते तशी राजकारणाची तीव्रता येथे जाणवत नव्हती. राजकारणातला विरोध हा निवडणुकीपुरता मर्यादित असे.

सामजिक ऐक्य आणि कौटुंबिक ऐक्य सतत दिसत असे. एकत्र कुटुंबपध्दती या गावात नांदत होती. त्यामुळे एकमेकांना समजून घेण्याची प्रवृत्ती प्रत्येकात होती. चांगुलपणाचा प्रभाव अधिक असला तरीही काही वाईट प्रवृत्तीचे लोक अधूनमधून दिसायचे. गावात एक देशी दारूचे दुकान होते. मजूर किंवा सामान्य लोक याठिकाणी येऊन दारू पीत असत. त्यांनी सार्वजनिक ठिकाणी पिऊन गोंधळ घालण्याचे प्रकार फारसे आढळत नसत. काही प्रतिष्ठित समजले जाणारे लोक राजरोस दारू पिण्याचे टाळून आपआपल्या सोयीनुसार चोरून लपून पीत होते. इतरांच्या नजरेत आपली प्रतिष्ठा कमी होऊ नये म्हणून ते जागृत असत. देशी दारूच्या दुकानात जशी समानता असते तशीच समानता खानावळीच्या संदर्भात होती. किल्लारीत एकच खानावळ होती. तिला आयाची खानावळ म्हणत. आया नावाची बाई

ती खानावळ चालवित असे. गावात येणारा श्रीमंत व्यापारी असो, लॉकअप मधला आरोपी असो किंवा फौजदार असो, या सर्वांसाठी एकाच प्रकारचे जेवण या खानावळीत मिळत असे.

ज्याप्रमाणे काही गावे दर्गा, पीर, मंदिर, समाधी इ. स्थानमहात्म्यामुळे प्रसिद्ध असतात. त्याला किल्लारीचा अपवाद नव्हता. हेही गाव आपल्या वैशिष्ट्यपूर्ण ग्रामदेवतेमुळे ओळखले जाते. ते ग्रामदैवत म्हणजे 'श्री नीळकंठेश्वराचे मंदिर' होय. हे मंदिर गावाच्या मध्यभागी आहे. हे मंदिर पुरातन असून हेमाडपंथी बांधकामाचा एक नमुना आहे. या बांधकामाचा नेमका काळ कोणासही माहीत नाही. नीळकंठेश्वराची स्थापना कधी झाली या बाबत इतिहास उपलब्ध नाही. मंदिरातील महादेवाची पिंड ही स्वंयभू असून पिंडीखाली पोकळी स्पष्ट दिसते. पिंडीच्या खालचा एक भाग बंद आहे व तिन्ही बाजूने पोकळी आहे. या मोकळ्या पोकळीत बोटाने आपण जर स्पर्श केला तर पाण्याच्या स्पर्श होतो. पिंडीखाली नेहमी पाणी असते. या पाण्याची खोली किती आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न अनेकांनी केला परंतु कोणालाही अंत लागला नाही. या चमत्कारिक प्रकारामुळे हे जागृत दैवत मानल्या जाते. या परिसरातील नीळकंठेश्वर हे सर्वांचे श्रध्दास्थान आहे. दर सोमवारी लोक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. दरवर्षी श्रावण महिन्यात येथे फार मोठी यात्रा भरते. नीळकंठेश्वराबद्दल या परिसरात अनेक आख्यायिका ऐकण्यास मिळतात. येथे जर कोणाला सर्प दंश झाला तर त्यास या मंदिरात आणून कडू लिंबाचा पाला खाण्यास किंवा या पाल्याचा रस प्यावयास दिल्यास सर्प विष उतरते असा विश्वास लोकात आहे. सर्व जाती-धर्मांचे लोक नीळकंठेश्वरास मानतात. सोमवारी कोणीही

मांसाहार करीत नाही. यापेक्षा सामाजिक ऐक्याचे दुसरे आदर्श उदाहरण दिसत नाही. ही प्रथा अजूनही पाळली जाते हे विशेष होय. शुभकार्यांच्या सुरूवातीला नीळकंठेश्वराचे दर्शन घेण्याची प्रथा आहे.



किल्लारीकरांचे ग्रामदेवत नीळकंठेश्वर

नीळकंठेश्वरावर लोकांची अपार श्रद्धा आहे. आजही विज्ञान युगाचा प्रभाव सर्वत्र जाणवत असला तरी किल्लारी गावात लोक भाजक्या विटांची घरे बांधत नाहीत. जर असे कोणी केले तर नीळकंठेश्वराचा कोप होतो. असा समज सर्वदूर आहे. या गावात चांगली घरे नाही, असे पूर्वी प्रभूने सांगितले होते. त्याचा उलगडा मला या आख्यायिकेतून झाला.

मंदिरातील पिंडीखालच्या पाण्याची पातळी कितीही उन्हाळा असला तरी कमी होत नाही, असा लोकसमज आहे. सन १९९२ साली पिंडीखालचे

पाणी कमी झाल्याचे लोकांच्या लक्षात आले. परिणामी आता आपल्या गावावर काहीतरी संकट येणार अशी सूक्ष्म भीती लोकांच्या मनात निर्माण झाली होती. नेमक्या याच काळात भूकंपाचे काही धक्के या परिसरात लोकांना जाणवले. यावरून पिंडीखालचे पाणी कमी झाले की गावावर संकट येणार की कल्पना दृढ झाली असावी.

१९९२ च्या ऑक्टोबर महिन्यात अनेक वेळा भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. दि. १०, २१ व २२ या तीन दिवसात भूकंपाचे धक्के थोडे तीव्रपणे जाणवले. ह्याची सर्वत्र चर्चाही झाली. त्यावेळी यापुढे होणाऱ्या महाविनाशकारी भूकंपाची ही पूर्वसूचना असेल, असे कोणाच्याही लक्षात आले नाही. या सौम्य धक्यानंतर भूगर्भशास्त्र विभागाने या परिसराचा विशेष अभ्यास केला व आपला अहवाल शासनाकडे दाखल केला. या भूकंपाचे मापन ४.५ व ३.८ रिश्टर स्केल एवढे होते. शास्त्रज्ञांच्या मते अशा प्रकारच्या भूकंपामुळे जीवितहानी होण्याची शक्यता कमी असते. ही गोष्ट किल्लारीतील लोकांना कळली. त्यामुळे कोणीही भूकंपाच्या संदर्भात फारसे गंभीरतेने लक्ष दिले नाही.

ह्या भागात झालेल्या तुरळक भूकंपाच्या धक्याने काही लोक घाबरले व ते गाव सोडून इतर ठिकाणी रहावयास गेले. शास्त्रज्ञाने मांडलेले मत त्यांच्यापर्यंत पोहचले, आता फारसा धोका नाही. असे समजून इतरत्र गेलेले लोक पुन्हा आपल्या गावातील आपआपल्या जुन्या घरात राहण्यास गेले. यानंतर भूकंप होईल असे कोणालाही वाटले नसेल.

## २

किल्लारी पाटी ही नेहमी गजबजलेली असायची. ही पाटी मूळ गावापासून दूर अंतरावर असली तरी तिचा समावेश किल्लारी ग्रामपंचायत हद्दीतच होत होता. हे ठिकाण लोकांच्या करमणुकीचे होते. जवळच शेतकरी सहकारी साखर कारखाना होता, त्यामुळे कामगारांची संख्या भरपूर होती. सहकारी साखर कारखाना असल्यामुळे लिडर लोकांची या कारखान्यावर सतत ये जा असे. त्यामुळे कामगार वर्ग करमणुकीसाठी व वेळ घालविण्यासाठी किल्लारी पाटीवर यायचे. पाटीवर पानटपऱ्या, हॉटेल्स, व्ही.डी.ओ. गृह, परमिट रूम, जनरल स्टोअर्स, कापड दुकाने व भुसार मालाची दुकाने होती. सांयकाळी गावातील सर्व व्यवहार बंद झाल्यावर गावातील लोक वेळ घालविण्यासाठी मौजेखातर ह्याच पाटीवर फिरावयास येत.

किल्लारी पाटीशिवाय किल्लारी वाडीचाही समावेश किल्लारी ग्रामपंचायत अंतर्गत होता. हे एक अत्यंत छोटे गाव असून या वाडीत राहणाऱ्या लोकांचा दररोजचा संबंध किल्लारी गावाशी येत असे. सांगायचा मुद्दा असा की किल्लारी गाव ढोबळ मानाने तीन विभागात वसलेले होते.

किल्लारी गाव म्हणजे जुनी वस्ती. त्यामुळे बऱ्याच जुन्या परंपरा येथे पहावयास मिळत. एकत्र कुटुंबपध्दतीचे प्रमाण येथे जास्त होते. कुटुंब प्रमुखाचा सर्वांवर अधिकार चालत असे. कुटुंबातील इतर सदस्य त्याचा विशेष मान ठेवीत असत. अशा प्रकारचे अनेक चांगले संस्कार प्रत्येक कुटुंबात दिसत असत. कुटुंबातील प्रत्येकजण आपले घराणे आर्थिकदृष्ट्या

समृद्ध होईल, असाच प्रयत्न करीत असत. त्यामुळे सामाजिक विकासाची दृष्टी कमी प्रमाणात होती.

सामाजिक विकासाचा वेग तुलनेने कमी असला तरी या गावातील नेतेमंडळी पुरेशी प्रगल्भ असल्याचे मला जाणवू लागले. कामानिमित्ताने गावातील अनेक लोकांचा परिचय होत होता. तेव्हा डॉ. पडसाळगे हे किल्लारीचे सरपंच होते. त्यांचा आयुर्वेदाचा चांगला अभ्यास होता. तसेच भोसले गुरूजींचाही परिचय झाला. श्री भोसले हे केवळ शिक्षक नव्हते तर ते किल्लारी साखर कारखान्याचे संचालकसुद्धा होते. या भागात देवीदास भोसले नावाचा शिवसेनेचा कार्यकर्ता होता. अन्यायाविरूद्ध त्याच्या मनात प्रचंड चीड होती. तसेच कृष्णाजी भालेराव, रोहिदास व अंकुश कांबळे हे दलित समाजाचे पुढारी होते. कोणत्याही विषयावरून ते पोलिस स्टेशनला येऊन आमच्यावर कसा अन्याय होतो हे पटवून देत. वेळप्रसंगी मोर्चे काढण्याची भाषा करीत असत. तसेच मुस्लिम पुढारी हरूण अत्तार ह्यांचाही परिचय झाला होता. तो सतत धार्मिक व सामाजिक कामे करीत असे.

याशिवाय गावातील राजकीय व प्रतिष्ठित लोकांचा परिचय झाला होता. त्यात विश्वनाथ भोसले, गुलाब भोसले, गुंड्डपा बिराजदार, शेख गुरूजी, किरण बाबळसुरे, राजेश तेलंग, देवीदास भोसले, नामदेव हॅबाडे, व्यंकट मुळजे, शाम पाटील, प्रकाश पाटील, सुदर्शन पाटील, विनोद बाबळसुरे, देवीदास जाधव, कदम, जीवन गोरे, अंदूरकर, निळू जाधव, अनिल स्वामी, रेड्डी, बाबू वाडेकर, प्रतापसिंह ठाकूर, सुभाष भालेराव, दत्तू बनसोडे, व्यकंट क्षीरसागर, कवठ्याचे सोनवने, डॉ. पोतदार, डॉ. वाघन्ना, डॉ. येंदे, इत्यादींचा परिचय झाला होता.

माझ्या विशेष लक्षात राहणारे एक व्यक्तिमत्त्व होते, ते म्हणजे किशन वाळके. हा माणूस किल्लारी परिसरात सर्वांच्या परिचयाचा होता. वाळके हे हाडाचे पत्रकार होते. पत्रकारितेच्या दीर्घ अनुभवामुळे त्यांना विशिष्ट अशी निरीक्षण करण्याची सवय होती. पत्रकारीतेच्या निमित्ताने गावातील किरकोळ घटनेची ते बारकाईने माहिती काढत असत. गुप्तचरावर मात करणारी त्यांची माहिती काढण्याची पध्दत होती, म्हणूनच त्यांचे 'कानोसा' असे टोपण नाव पडले होते. त्यांना भेटणारा प्रत्येकजण "काय वाळके, आजचा कानोसा काय आहे ?" असे विचारून नंतर नमस्कार करीत असे. तो वार्ताहर असल्यामुळे माझी ओळख झाली. त्याचा स्वभाव मला आवडला होता. ते दररोज मला भेटायला येत.

"वाळके, आजचा कानोसा काय ?" असे विचारता क्षणीच तो मला जेवढी माहिती असे तेवढी देत असे. साहेब, आज अमक्याचे भांडण झाले, ह्या ह्या कारणाने झाले, कोणाचे लग्न जोडले, कोणाचे मोडले, कोणाचे प्रेमप्रकरण कुठवर आले, कोणाचा प्रेमभंग झाला इत्यादी माहिती सांगून त्यातील बारकावे तपशिलाने सांगत. प्रत्येक गोष्ट सांगताना हास्य विनोदाची उधळण होत असे. या मनमुराद हास्यातून आनंद घेण्याची सवय मला झाली होती. सत्य असत्य तपासण्यासाठी वाळकेंना केव्हा वेळ मिळत असेल ते देव जाणे पण दररोजच्या माहितीत काहीतरी नाविन्य असायचे. ते पिकले पान असूनही हिरवे मन राखून होते.

किल्लारी पोलिस स्टेशन हद्दीत अनेक गावांना कामानिमित्ताने जावे लागे. त्यामुळे अनेक गावकऱ्यांचा परिचय झाला होता. त्यात माझ्या स्मरणात राहणारे तळणीचे मालू शेटजी, यांचा धार्मिक कार्यात सतत

पुढाकार असे, हासलगनचे तानाजी मोरे हे गावचे सरपंच असून राजकीय क्षेत्रात त्यांचे चांगले वजन होते. नांदुरग्याचे शिंदे व तांबारवाडीचे जीवन पाटील हे उत्तम प्रकारे शेती करीत असत. उतक्याचे माधव पाटील हे मोठे व्यापारी होते तर लामजण्याचे नंदलाल बिदादा हे व्यापारी असून दानशूर होते. चिंचोलीचे चंदरमामा, त्र्यंबकमामा, गुबाळाचे बालाजी जाधव, रामेगावचे सरपंच शिवाजी जाधव, मंगरूळचे बिराजदार, सारणीचे नागनाथ पत्रिके, किल्लारवाडीचे कमलाकर बिराजदार, हरेगावचे कवाळे, पोमादेवी जवळग्याचे श्रीपतराव काकडे, खरोश्याचे सांगवे, जावळीचे मोरे, उतक्याचे शिवाजी पाटील, कीनीनवरीचे पाटील, बाणेगावचे परिहार, लिंबाळा दाऊचे देशमुख व सरपंच शेख, तळणीचे बाबुराव पाटील, कारल्याचे शाहुराज बिराजदार ही मंडळी आपल्या शेतीकडे दुर्लक्ष न करता त्यांनी राजकारणात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते.



# ३

सर्व परिसराशी व व्यक्तींशी परिचय होत होत काळ कसा गेला हे कळलेच नाही. आता श्री गणेश उत्सवाचे दिवस जवळ आले होते. दरवर्षी प्रमाणे ह्याही वर्षी २० सप्टेंबर १९९३ रोजी श्री ची स्थापना होणार होती, तर २९ सप्टेंबर १९९३ रोजी विसर्जन होणार होते. हा उत्सव शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने दरम्यानचा काळ पोलिसांच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील समजला जातो. तसे पाहिले तर येथे शहराप्रमाणे ताण घ्यावा इतका मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा होत नव्हता. येथे सर्वच गावात फार फार तर तीन-चार गणेश मंडळांची स्थापना होई. ह्या हद्दीतील हसलगन, लामजाना, तळणी, ननंद इत्यादी गावातून श्री ची स्थापना होत होती.

यावर्षी गणेश उत्सवाच्या काळात औसा कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जाहीर झाल्याने बरीच मान्यवर मंडळी निवडणुकीच्या धामधुमीत गुंतली होती. दि. २५.०९.१९९३ ला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांचे भवितव्य मतदान पेटीत बंद होणार होते. किल्लारी हे मध्यवर्ती व मतदानाच्या दृष्टीने महत्त्वाचे गाव असल्यामुळे राजकीय लोकांच्या प्रचारसभा, मिरवणुका नेहमी होत होत्या. त्यामुळे गणेश उत्सवासोबतच अशा राजकीय सभा व प्रचार मिरवणुकांचा बंदोबस्त करावा लागत होता.

किल्लारीत छोटे मोठे चार-पाच गणेश मंडळे स्थापन झाली होती. त्यापैकी दोन गणेश मंडळांचे वर्चस्व स्पष्ट दिसून येत असे. किल्लारीत

मराठा आणि लिंगायत समाज मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे या दोन्ही समाजाचे दोन गणेश मंडळ आपला विशेष प्रभाव दाखविण्यासाठी स्पर्धा करीत असत. गणेश उत्सवाच्या काळात छोटे-मोठे सांस्कृतिक कार्यक्रम लोकांच्या करमणुकीसाठी होत असत.

या वर्षी बाजार समितीची निवडणुक असल्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी आपले लक्ष निवडणुकीवर केंद्रित केले होते. तीच माणसं गणेश उत्सवात हिरीरीने भाग घेत असत. या वर्षी फारसे कार्यक्रम किंवा स्पर्धा गणेश उत्सवात दिसली नाही. निवडणुक कार्यक्रमाप्रमाणे दि. २५.०९.१९९३ रोजी मतदान संपन्न झाले व निवडणुकीस उभे असणाऱ्या उमेदवारांची स्वप्ने काही काळापुरती पेट्यात बंद झाली.

दरम्यानच्या काळात माझे स्नेही शशीमोहन नंदा यांचा लग्न सोहळा दि. २७.०९.१९९३ ला नांदेड येथे संपन्न होणार होता. कोणत्याही कौटुंबिक कार्यक्रमांना आर्वजून उपस्थित राहता येईलच. याची शाश्वती नसल्यामुळे मी पत्नी व मुलास नांदेडला लग्न सोहळयास उपस्थित राहण्यासाठी पाठविले होते. सामाजिक शांतता असल्यामुळे फारसा ताण नव्हता. वरिष्ठांची परवानगी घेऊन आपणही नंदा यांच्या लग्नास जावे असा माझ्या मनात विचार आला. त्यावेळी श्री जाधव साहेब हे उपविभागीय पोलिस अधिकारी होते. त्यांना मी विनंती केली व बारा तासांची परवानगी घेऊन नांदेडकडे निघालो.

लग्नानिमित्ताने आलेल्या सर्व जुन्या मित्रांच्या भेटी गाठी झाल्या. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, गप्पांमध्ये वसंत फुलून आला होता. किल्लारीला परत जाण्याची सूचना घड्याळयाच्या काट्याने दिली. इच्छा

असूनही त्यांच्या सहवासात जास्त वेळ राहता येत नव्हते. रात्रभर मुक्काम करावा, असे माझे मन मला वारंवार सांगत होते. पण कर्तव्य श्रेष्ठ समजून मी परतीच्या प्रवासाला निघालो.

सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास किल्लारीस पोहचलो. पत्नीस घरी सोडून मी लगेच पोलिस स्टेशनकडे निघालो. रस्त्याने जात असताना मी लोकांचे चेहरे वाचले. त्यांच्या चेहऱ्यावर मला अस्वस्थता जाणवली. अनेक लोक माझ्याकडे पाहून आपआपसात दबलेल्या आवाजात कुजबुजतांना दिसले. मनात शंकेची पाल चुकचुकली. मी चालण्याचा वेग वाढवून पोलिस स्टेशन गाठले.

मी ऑफिसात येऊन बसताच माझे सहकारी ठाणे अमलदार घाबरलेल्या अवस्थेत माझ्यासमोर आले. त्यांचा चेहरा चिंताग्रस्त दिसत होता. मी शांतपणे त्यांच्याकडे पाहू लागलो. ते म्हणाले,

" बरे झाले साहेब तुम्ही आलात"

" अरे काय झाले ते तर सांग आधी"

" साहेब, आज पाटीवर भांडणे झालीत"

" कोणाकोणाची ?"

मी माहिती मिळविण्याच्या उद्देशाने त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकू लागलो. त्याने सांगायला सुरूवात केली,

" साहेब, आज दुपारी किल्लारी पाटीवर माधव पाटील व सिद्धू बिराजदार यांचे व रोहिदास कांबळे व अंकुश कांबळे यांचे भांडण झाले. दोघांनीही परस्परविरोधी पोलिस स्टेशनला येऊन तक्रारी दाखल केल्या. यामुळे गावात सध्या तणाव आहे. बहुतेक उद्या ह्या प्रकारामुळे बाजारपेठ बंद राहण्याची

शक्यता आहे"

ठाणे अमलदाराने दिलेल्या माहितीवर मी थोडा विचार केला. येथे घडलेल्या घटनेबद्दल पहिल्यांदा वरिष्ठांना कळविलं. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये या उद्देशाने गावातून पेट्रोलिंग केली.

दुसऱ्या दिवशी किल्लारी व्यापारपेठ बंद राहीली. वातावरण शांत होते. संध्याकाळी बाजार समितीचा निकाल जाहीर झाला, त्यात स्थानिक उमेदवार श्री दयानंदजी मुळजे हे निवडून आल्याचे जाहीर झाले. सर्व गावकरी आनंदाच्या लाटेवर स्वार होऊन जल्लोश करू लागले.



# ४

आज विसर्जनाचा दिवस. पण अजूनही तणावाचे वातावरण निवळलेले नव्हते. श्री विर्सजनाच्या निमित्ताने तालुका दंडाधिकारी ह्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री वाघमारे आले होते. तसा दोन दिवसापासून गावात तणाव होता. तणावाचे वातावरण कमी करण्यासाठी श्री वाघमारे, मी व गावातील प्रतिष्ठितांनी गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन श्री विसर्जनाचा कार्यक्रम शांततापुर्ण करण्याचे आवाहन केले. बैठकीतील काही तरूणांच्या मनात काही वेगळे विचार असल्याचे मला त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. पण तसा कोणताही विषय मी काढला नाही. तेवढ्यात बैठकीला उपस्थित असलेल्यापैकी तीन-चार जण उभे राहून म्हणाले,

"साहेब, आम्ही विर्सजन करणार नाही "

उपस्थित असलेले सर्वजण अवाक होऊन त्यांच्या चेहऱ्याकडे पाहू लागले. एकाएकी नवा प्रश्न उभा राहिल्यामुळे आम्हालाही आश्चर्य वाटले. क्षणभर थांबून अगदी शांत स्वरात मी त्यांना विचारले,

" विसर्जन का करणार नाही तुम्ही ?"

त्यांच्यापैकी एकाने उत्तर दिले,

"आमच्या गणेश मंडळाचे अध्यक्ष सिद्धू बिराजदार आहेत. तुम्ही त्यांच्यावर गुन्हा दाखल केल्यामुळे ते गावात नाहीत. गणेश मंडळाचे अध्यक्ष जर येथे नाहीत तर ती जबाबदारी आम्ही काय म्हणून पार पाडावी !"

तो माझ्याकडे बघत तावातावाने बोलत होता.

ठरलेल्या दिवशी ह्या लोकांनी विसर्जन करण्याचे थांबविल्यामुळे आमच्यापुढे नवीन समस्या निर्माण झाली. पण यातून मार्ग काढणे भाग होते. नाहीतर या सर्वांचे खापर आमच्या माथी फुटणार, याची मला पूर्ण कल्पना आली होती. समोरच्या तरुणांचा राग क्षणोक्षणी उफाळून येत होता. यावेळी त्यांना समजून सांगण्यात काही अर्थ नव्हता. त्यांच्यापैकी कोणीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. थोडावेळ थांबून पुन्हा समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्यासाठी आत्ताची बैठक तूर्त स्थगित केली.

काही वेळानंतर बाहेर उभे असलेल्या कार्यकर्त्यांना आम्ही आत बोलाविले. दरम्यान काही प्रतिष्ठित मंडळींनासुध्दा आम्ही बोलावून घेतले होते. मघाशी रागात असलेले तरुण काहींसे समजदार असल्यासारखे वाटू लागले.

" श्री विसर्जन तर झालेच पाहिजे," असे आग्रही प्रतिपादन श्री वाघमारेंनी केले. उपस्थित असलेल्या सर्व गणेश मंडळातील पदाधिकाऱ्यांनी आपआपसात चर्चा केली.

" साहेबाचं म्हणणं बरोबर आहे,"

एका समजंस तरुणाने आपला विचार स्पष्टपणे सांगितला.

" आता निर्माण झालेल्या समस्येवर आपणच उपाय सुचवावा, "

मी सर्वांना विनंती केली. उपस्थितात थोडी हालचाल झाली. एकजण उभा राहिला आणि म्हणाला,

" तुम्हीच उपाय सुचवा, साहेब ! "

मी सर्वांचं चेहरे एकदा न्याहाळून घेतले. त्यांच्या मनात काय चालले आहे याचा अंदाजही घेतला. त्यांच्या मनाविरूद्ध निर्णय लादणे त्यांना मान्य होईल

काय ? असा क्षणभर प्रश्न माझ्या मनात उभा राहिला. खरं म्हणजे ही एक मोठी समस्या समोर उभी होती आणि यातून मार्ग काढणे आवश्यक होते. मग मी म्हणालो,

" तुमचे अध्यक्ष या क्षणी येथे उपस्थित नाहीत. त्यांच्या माघारी विसर्जन मिरवणूक काढण्याची तुमची इच्छा नाही. तुमच्या भावना मला कळतात. आम्ही कायद्याचे बांधील असल्यामुळे काही गोष्टी आम्हाला कराव्याच लागतात. तशातलाच हा एक भाग आहे. तुमचा रोष पोलिसांवर आहे, हेही मला कळते. आम्ही सुद्धा समाजाचे घटक आहोत, हे तुम्ही विसरू नका. जर तुमची परवानगी असेल तर एक उपाय सुचवायची माझी तयारी आहे."

सर्वजण कोरस मध्ये म्हणाले,

" सांगा सांगा, उपाय सांगा "

त्या सर्वांचे पूर्ण लक्ष माझ्याकडे होते. या संधीचा फायदा घेऊन मी म्हणालो,

" निदान ज्या ठिकाणी "श्री" ची प्रतिष्ठापना केली, तिथून श्री मूर्ती आरती पूजा करून थोडी बाजूला सरकवून ठेवावी व विसर्जन झाल्याचे आपण जाहीर करावे. मग मिरवणुक नाही काढली तरी चालेल. मी सुचविलेल्या उपायामुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा उमटून गेल्याचे मला स्पष्ट जाणवले. अपेक्षे प्रमाणे माझ्या प्रयत्नाला यश मिळाले होते. श्री वाघमारेंनी आपला हात माझ्याकडे सरकविला व मी आपसूक त्यांना सेकहॅन्ड केला. एका जबाबदारीतून मुक्त झाल्याचे समाधान प्रत्यक्ष कृती आधीच श्री वाघमारेंच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसले.

" मान्य... मान्य."

सर्वजण कोरस मध्ये म्हणत असताना टाळ्यांचा कडकडाट केला.


किल्लारीला लोक सधन असल्यामुळे तेथील गणेशोत्सव दरवर्षीच धुमधडाक्यात पार पडत असे. सर्व जाती-धर्मांचे लोक उत्सवानिमित्त होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहून प्रतिसाद देत असत. त्यामुळे मराठा मंडळ व लिंगायत कार्यकर्ते एकापेक्षा एक दर्जेदार कार्यक्रम आपल्या गणपतीसमोर सादर करीत असत.

या वर्षाच्या गणेश उत्सवाला थोडेसे ग्रहण लागल्यासारखे मला उगीच वाटू लागले. नेमक्या याच काळात बाजार समितीच्या निवडणुका, सवर्ण आणि दलित यांच्या एकमेकांविरूध्द पोलिस ठाण्यात तक्रारी, परिणामी गावात निर्माण झालेला तणाव, गणेश विसर्जन मिरवणूक न काढण्याचा तरूणांचा निर्णय, या अघटित घटना किल्लारीकर पहिल्यांदाच पाहत असावेत. असे अनेक विचार माझ्या मनात दाटले होते. समोर उद्भवलेल्या परिस्थितीवर उपाय शोधल्याचा आनंद होत होता. नंतर आम्ही सर्व लोकांसोबत लिंगायत समाजाच्या गणेश मंडळाकडे गेलो. त्या मंडळाच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांनी "श्री" ची आरती व पूजा करून चार फुटी उंच मूर्ती " गणपती बाप्पा मोरया । पुढल्या वर्षी लवकर या... " असा गजर करून "श्री" मूर्ती उचलून बाजूला ठेवली व विसर्जन झाल्याचे जाहीर केले व माझा जीव भांड्यात पडला.

" चला साहेब, "

म्हणत मी वाघमारेंना घेऊन ठाण्याकडे निघालो. रस्त्याने चालताना किल्लारीच्या सांस्कृतिक व नैतिक परंपरेची आम्ही चर्चा करीत होतो. आजची घटना अनपेक्षित होती. यातून मी मार्ग काढल्याबद्दल वाघमारेंनी माझं वारंवार अभिनंदन केलं.

" मी आता परत जातो," असं सांगून ते त्यांच्या जीपकडे वळले.
मीही माझ्या बुद्धिमत्तेवर खुश होऊन झपझप पाऊले टाकत पोलिस स्टेशनला गेलो.



५

गणेशोत्सवाचा काळ पोलिसांच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील समजला जातो. जरा कुठे खट झाले की त्याचा आवाज संबंध महाराष्ट्रात उमटण्याची शक्यता असते. आताच अशा विचित्र प्रसंगातून मी सहज मुक्त झालो. डोक्यावर असलेला ताण पूर्णपणे कमी झाला होता. एक प्रचंड ओझे उतरल्याचा आनंद माझ्या मनात दाटला होता. थोड्या वेळापूर्वी झालेल्या मिटिंग मधले प्रसंग वारंवार माझ्यासमोर येत होते. हे सर्व माझ्या सहकाऱ्यांना सांगण्याच्या हेतूने मी एकाला खुर्ची बाहेर आणायला सांगितले. लगेच सर्वजण माझ्या भोवती जमा झाले.

मी सांगण्याच्या मूडमध्ये असतानाच समोर असलेल्या पाण्याच्या टाकीवर घुबडाने घुमायला सुरूवात केली. लगेच आमच्या सर्वांच्या नजरा आवाजाच्या दिशेला वळल्या. माझे शब्द थांबले.

" या....च्याईला....मादरचोदाला.... बोंबलायला... काय झालं रे....! "
व नेहमीप्रमाणे शिवी माझ्या तोंडून बाहेर पडली.

" मूर्ख लोक... असेच वागायलेत. एक एक अपशकुन घडतच राहिला. म्हणून घुबड वरडत तर नसेल ! " एका शिपायाने गंभीर चेहरा करून शंका उपस्थित केली.

घुबड सारखं घुमतच होतं. त्यामुळे बाहेरचा अंधार उगाच भीतिदायक वाटू लागला. असल्या गोष्टीवर माझा विश्वास नसल्यामुळे मी फारसं लक्ष दिल नाही.

" हो यार... लोकबी बावचळल्यासारखे करायलेत. फालतू नाही ते कुटाने निर्माण करून आपल्याला डोकेदुखी करायलेत. गावाला काय शनी लागलीय... कळत नाही, " मी माझ्या मनातले विचार व्यक्त केले.

" हो साहेब... ! "

घुबडाचा घुत्कार थांबला. आमचा पोलिस शिपाई शेटकर गावातून फेरफटका मारून आला. माझे लक्ष त्याच्याकडे गेले,

" गावात काही भानगड वगैरे नाहीना...! " मी जिज्ञासेने विचारले.

" काही विशेष नाही साहेब... ! सगळे आपआपल्या घरी गेले...."

आता मी पूर्णतः सैल झालो होतो. दिवसभराचा थकवा घालविण्यासाठी एक उपाय शोधला. अजून जेवणही झाले नव्हते. म्हणून मी घड्याळाकडे पाहिले तर रात्रीचे अकरा वाजून गेले होते. कंपनी म्हणून प्रकाश हॅबाडेस फोन केला. योगायोगाने फोनवर तोच होता. मी त्यास म्हणालो,

" काय प्रकाश काय चालले ? "

तो म्हणाला,

" काही नाही साहेब, कसा काय फोन केलात ? "

" प्रकाश, तुझे जेवण झाले काय ? "

" नाही, हॉटेल नेमकेच बंद केले आहे, आता बसणारच होतो."

"तू रेस्टहाऊसला आपल्या दोघांचेही जेवण व खोकल्याचे औषध घेऊन ये."

तो फोनवरच खळखळून हसला व बरं साहेब म्हणून त्याने फोन ठेवला. मी आळस देत सहज खिडकीतून बाहेर नजर टाकली तर समोरून तळणीचे जीवन बाबळसुरे हे ऑफीसकडे येताना दिसले. आमचा नमस्कार झाला.

नमस्कार करीत मी त्यांना विचारले,

" जीवनराव एवढ्या रात्री कसे काय फिरकलात ? काही भानगड तर झाली नाही ना ?"

" नाही साहेब, आम्ही जंगली श्वापदासारखं रात्रीच फिरत असतो "

त्याच्या या विनोदावर आम्ही दोघेही खळाळून हसलो.

"मग आता आलाच आहात तर चला आमच्या बरोबर कुटका मोडायला"

" ठिक आहे म्हणत त्याने मान हलविली व आम्ही दोघेही ऑफिसच्या बाहेर आलो. मी मोटर सायकलला किक् मारली. गाडी रेस्टहाऊसकडे धावू लागली.

रेस्टहाऊसवर प्रकाश आधीच येऊन दाखल झाला होता. आम्हाला पाहताच रेस्टहाऊसचा वॉचमन खेळण्याला किल्ली दिल्याप्रमाणे तरतर चालत आला. नमस्कार करून,

" आता सूट उघडतो साहेब, चला...! " म्हणत.

त्याने एक सूट उघडून दिला. आम्ही आत जाऊन सोफ्यावर बसलो. वॉचमनला आमच्या सगळ्या सवयी माहीत असल्यामुळे त्याने माझ्या आज्ञेची वाट न पाहता तीन ग्लास व पाण्याचा जग टिपॉयवर आणून ठेवला.

" हे बघ... माझ्या मोटरसायकलच्या डिक्कीत ठेवलेल्या वस्तू घेऊन ये "

प्रकाशने वॉचमनला सांगितले.

त्याने औषधाची बाटली व सोड्याच्या बाटल्या टिपॉयवर आणून ठेवल्या. लगेच जीवनने बाटली हातात घेऊन फोडली व तीन ग्लासात एक एक डोस ओतला. त्यात सोडा ओतण्यास सुरूवात केली. ग्लासात बुडबुडे नाचू

लागले, माझ्या मनात उगीचच विचाराचे वादळ निर्माण झाले. मनाची द्विधा अवस्था निर्माण झाली. समोर ग्लास भरलेला होता. दिवसभराच्या ताणतणावाने प्रचंड थकवा आला होता. आम्ही तिघांनीही आपआपले ग्लास उचलले. त्या दोघांनी आस्वाद घ्यायला सुरूवात केली. माझ्या अंतर्मनात असे काही द्वंद्व निर्माण झाले की, नेमका निर्णय मला घेता आला नाही व मी ग्लास तसाच टिपॉयवर ठेवला. हे पाहून प्रकाशला आणि जीवनला आश्चर्य वाटले. ते प्रश्नार्थक नजरेने माझ्याकडे पाहू लागले. मी त्यांना स्पष्ट सांगितले,

" काही म्हणा यार...आज पिण्यासाठी मनच होत नाही. तुम्ही घ्या. मला फोर्स करू नका."

" असे कसे जमेल साहेब, तुम्ही फोन केलात म्हणून तर इतक्या त्रासाने हे सर्व तुमच्यासाठी आणले आहे."

औषधाच्या बाटलीकडे हात करून प्रकाश बोलला.

" आज विसर्जनाचा दिवस आहे, जिल्ह्यात कोठेही काहीही घडू शकते, केव्हाही कोठेही बंदोबस्तासाठी जावे लागेल. याचा काही नेम नाही. उगीचच थोड्याशा मोहापायी कशाला संकट ओढून घ्यायचे, एका दिवसाने काय होते... वाटलं तर उद्या बसू " मी स्वच्छ मनाने सांगून टाकले व शेंगदाणे खात, गप्पा मारीत टाईमपास केला. त्यांचा एकदाचा कार्यक्रम संपला. मी वॉचमनला आवाज देऊन जेवण लावण्यास सांगितले.

" बरं साहेब... लावतो." म्हणत डार्यानिंग टेबलवर ताटे वाढली. मी त्यांना चला म्हणत पुढे निघालो, ते माझ्या मागोमाग आले. आम्ही जेवण केले. विश्रामगृहाच्या मोकळ्या मैदानात हिरवळीचा गालीचा अंथरलेला होता,

तिथे खुर्च्या टाकून आम्ही गप्पा मारीत बसलो. आमच्या गप्पात रेस्टहाऊसचा वॉचमन सामील झाला. ह्या गप्पांच्या ओघात मागच्या वर्षी बसलेल्या भूंकपाच्या धक्याचाही विषय निघाला. तेंव्हा जीवन म्हणाला,
"साहेब... जेंव्हा गेल्या वर्षी भूंकपाचे धक्के बसणे सुरू झाले, त्यावेळेस लोक भयभीत होऊन शिवाजी चौकात येऊन बसत. नंतर या लोकांना धीर देण्यासाठी स्थानिक व बाहेरचे पुढारी येथे आले व भाषणे ठोकली. या भाषणात एका पुढाऱ्याने भूकंपाचे वर्णन फार मजेशीर केले. तो म्हणाला, वासरू जसं गाईला पितांना ढुसन्या मारते, तसाच हा प्रकार आहे."
जीवनने अशाच एक-दोन मजेशीर घटना सांगितल्या. आम्ही मनमुराद हसलो. हसताना मी आकाशात पाहिलं एक तारा इकडून तिकडे धावताना तुटला. तारा तुटताना पाहू नये असं माझ्या लहानपणी कधीतरी माझ्या आजीनं मला सांगितल्याचं आठवलं. पण या संदर्भात मी काही बोललो नाही.

रेस्टहाऊस समोरील निलगिरीच्या झाडांवर टिटवी ओरडली आणि प्रकाशने घड्याळात पाहिले.
" साहेब चला... दोन वाजलेत, मी चलतो... मला सकाळी लवकर हॉटेल उघडावे लागते " असे म्हणाला.
" अरे बापरे ! दोन वाजलेत..." असे म्हणत मीही उठलो.

जीवन व प्रकाश मोटार सायकल वरून तळणीकडे गेले. मीही माझ्या मोटर सायकलला किक् मारली. वातावरण शांत होते, दूरवर कोठेतरी कुत्र्याच्या ओरडण्याचा आवाज येत होता. मी ठाण्यावर पोहचण्याच्या आधीच मोटार सायकलचा आवाज तिथे पोहचला. ठाणे

अमलदार पवार बाहेर येऊन थांबले होते. मोटर सायकल उभी करताना मी विचारले,

" काही कमी जास्त...?"

" काही नाही...शांतता आहे "

" बरं चलतो मग "

म्हणत, पायीच घराकडे निघालो. माझे घर ठाण्यापासून फार अंतरावर नव्हते. दारावर खटखट करताच नेहमीच्या सवयीप्रमाणे पत्नीने दरवाजा उघडला व विचारले, "जेवण झाले का ?" मी "हो" म्हणालो. तिने जास्त चौकशी केली नाही व झोपण्यास निघून गेली. मी पोलिसी पोषाख उतरवून नेहमीचे घरगुती कपडे घातले व चिरंजीव संकेतच्या शेजारी अंग टाकले. समोरच्या भिंतीवर सहज नजर गेली व दाभोळकरांच्या गणपतीचे दर्शन झाले. झोप केव्हा लागली कळले नाही.

## ६

गाढ झोपेत असतानाच अचानक एका धक्क्यानिशी गडगड असा आवाज झाला. मी दचकून जागा झालो. उठून बसतो न बसतो तोच सगळे घर गदगद हलायला लागले. घरातील सर्व भांडी व भितीवरील तसबिरी कोणीतरी फेकल्यासारखे जमिनीवर आदळू लागले. क्षणभर भांबावल्या सारखे झाले. विचार करायला उसंत नव्हती. नेमकं काय होत आहे हेही कळत नंव्हत. हा भूकंपाचा धक्का आहे हे लक्षात आलं. एव्हांना पत्नी जागी झाली. मी झोपलेल्या संकेतला क्षणात जवळ घेतले व जीव वाचविण्याच्या हेतूने मी पत्नीस... चल चल म्हणत आम्ही सर्व बाहेर आलो. समोरील घरे पत्त्याचे बंगले जसे कोसळावेत तसे कोसळत होते. लाईटही गेलेली होती. जिकडे तिकडे क्षणात धुळीचे साम्राज्य पसरले. अंधाराने संपूर्ण गाव आपल्या कवेत घेतला. समोरील काहीही दिसत नव्हतं. मात्र रडण्या-ओरडण्याचे आवाज आणि किंकाळ्या आसमंतात दाटल्या होत्या.

प्रचंड बेचैनीत माझ्या लक्षात आले की हा भूकंपच आहे. मी पत्नीला म्हणालो,

" अरे बापरे...! भूकंप झाला. " तिच्याही लक्षात आले.

आम्ही घाबरून गेलो. आमच्या घरासमोरील भित कोसळयामुळे रस्ता बंद झाला होता. बाहेर पडण्याची धडपड करीत होतो. पण काहीच सूचत नव्हते, का कोण जाणे ? कसे बाहेर पडलो हेही समजले नाही. जीवाच्या आकांताने समोर पडलेल्या भिंतीचा ढिगाराही दिसला नाही. पायाखाली येणारे दगडही

दिसत नव्हते. फक्त जीव वाचविणे ह्या एकाच धडपडीत आम्ही भिंतीच्या ढिगाऱ्यावरून बाहेर कसे पडलो याचे आश्चर्य आजही वाटते.

आम्ही ज्या घरात राहत होतो, त्या घरातून बाहेर येता क्षणीच छत कोसळले. त्या वेळेस कोणताच विचार आला नाही. परंतु जेव्हा ह्या भयाण प्रसंगाची आठवण होते तेव्हा अंगावर शहारे येतात. एखाद्या सेकंदाने घराबाहेर पडण्यास जर विलंब झाला असता तर आम्हीसुद्धा इतरांसारखेच ढिगाऱ्याखाली समाधीस्थ झालो असतो. हा प्रसंग आठवला की वाटतं बरं झालं त्या दिवशी आपण प्यालो नाही. तर मलाही जाग आली नसती व घराबाहेर पडता आले नसते. या विचाराने आजही मी भयभीत होतो. त्या रात्री झोपण्यापूर्वी भिंतीवरील गणरायाचे दर्शन झाले होते. कदाचित त्यानेच भूकंप होता क्षणीच आम्हाला जागे केले व बाहेर पडण्याची बुद्धी दिली असावी. अशी माझी श्रद्धा आहे.



**लेखक राहत असलेले निवासस्थान**

समोरचे काहीच दिसत नव्हते. नाकातोंडात धूळ जात होती. मी पोलिस स्टेशनकडे जाण्यास निघालो. पायाखालचा रस्ता असूनही पोलिस स्टेशन कोणत्या दिशेला हे प्रयत्न करूनही लक्षात येत नव्हते. सगळेच काही बदललेले होते, रोजचा ओळखीचा परिसर दिसत नव्हता. कोणाचीही भीतीने गाळण उडून अंगावर काटे उभे राहावे अशी भयानक परिस्थिती निर्माण झाली होती.

थोड्या वेळापुरते मला काय करावे हे काहीच सूचत नव्हते. शेवटी हिंमत करून पत्नीला म्हणालो, चल पोलिस स्टेशनकडे तरी जाऊ. पत्नीसह अंदाजानेच त्या भयाण अंधारात पडलेल्या दगडा-मातीच्या ढिगाऱ्यावरून रस्ता शोधीत शोधीत चालू लागलो. परंतु रस्त्याच्या कडेच्या भिंती पडल्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी दगडा-मातीचे ढिगारे पडले होते. रस्ता त्यात हरवला होता. सर्व दिशा संपल्या होत्या. कधी मी पत्नीस हाताचा आधार देत होतो तर कधी पत्नी मला आधार देत होती असे एकमेकांच्या आधाराने मुलाला घेऊन अंधार कापीत एक एक पाऊल पुढे जात होतो. चौक आल्याचे जाणवले. चौकाच्या प्रत्येक कोपऱ्यातून किंकाळ्या आणि रडण्याचा आवाज येत होता. पाहतो तर हा पोलिस स्टेशन पुढील नेहमीचाच शिवाजी चौक होता.

चौकात येताच पाहतो तर चोहीकडून असंख्य लोक भयभीत होऊन जीव मुठीत घेऊन पळताना दिसत होते. त्यांच्या फक्त आकृत्याच दिसायच्या. प्रचंड आक्रोश चालला होता. अंधारातही लोक दिसेल त्याला विनंती करीत, "अहो माझ्या घरात वडील दबले, कोणी म्हणे आई, पत्नी, मुलगा दबला. जे कोणी अडकले असतील त्याचे नांव घेऊन त्यांना काढण्यास चला हो

म्हणून केविलवाणी विनंती करीत. ऐकणाराही सांगणाऱ्यालाही अशीच विनंती करीत होता. शेवटी सर्वजण हताश होऊन एकमेकांच्या चेहऱ्याकडे भांबावलेल्या परिस्थितीत पाहत रडत उभे होते.

ह्या बिकट परिस्थितीत माझ्यावरील आपत्ती टळली होती. थोडासा धीर आला होता. आलेल्या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी माझ्यात नवे बळ संचारल्याची मला जाणीव झाली. माझ्या घाबरलेल्या पत्नीस मी धीर दिला, तीही सावरली. मी तिला संकेतला घेऊन कोठेतरी बसण्यास सांगितले. पोलिस स्टेशनमध्ये जाऊन येतो, असे सांगून मी निघालो. पोलिस स्टेशनच्या गेट समोर घाबरलेल्या अवस्थेत पवार उभे होते. संकट काळात लोकांच्या मदतीला धाऊन जाणे हे पोलिस खात्याचे ब्रीद मला प्रेरित करीत गेले. सर्व विसरून मी कामाला लागलो,

" नियंत्रण-कक्षाला माहिती दिली का ?" त्याच्या उत्तराची वाट न पाहता मी पोलिस स्टेशन समोर गेलो. थोड्या वेळापूर्वी अनुभवलेल्या भयानक संकटामुळे इमारतीमध्ये जाण्याची हिंमत होत नव्हती. त्या इमारतीचा बिनतारी संच हाताळता येत नव्हता. आत जाताच इमारत कोसळेल ही भीती सतत जाणवू लागली. इमारतीच्या मागून गेलो. सुदैवाने बिनतारी संच हा खिडकीच्या अगदी जवळच बसविण्यात आलेला होता. त्यामुळे ताबडतोब खिडकीतून हात घालून माईक ओढून घेतला व त्याद्वारे मी पोलिस अधीक्षक श्री. बिपीन बिहारी यांच्याशी संपर्क साधून त्यांना घाबरलेल्या मनःस्थितीत,

" सर, किल्लारीला भूकंप झाला आहे. अंदाजे पाचशे जण मृत्युमुखी पडले असावेत, "

अशी माहिती एका दमात दिली. ती वेळ अंदाजे सकाळी ४.१५ मिनीटाची असावी. त्यांनी उलट उत्तरी कळविले, " ठीक है, हम आ रहे है। " हा पोलिस अधीक्षकांचा संदेश घेऊन. मी पोलिस स्टेशनच्या आवारातून परत शिवाजी चौकाकडे जाण्यास निघालो.

समोर पाहिले तर जवळपास शंभर लोकांचा जमाव आक्रोश करीत पोलिस स्टेशनकडे येत होता. या मागचे कारण एकच होते, आपल्या घरातील व्यक्तीचे प्राण वाचवावे व आपल्याला आधी मदत मिळावी म्हणून ते पोलिसांची मदत मागण्यासाठी येत होते. प्रत्येकाचं आप्तस्वकीय ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. जिकडे तिकडे भेसूर आक्रोशांचा कल्लोळ चालला होता. पोलिसांचे मोजके हात किती जणाला मदत करतील ? मदतीसाठी सदैव तयार असलेल्या हातांच्या मागे असलेली मनेसुध्दा भयभीत झालेली होती. याची लोकांना काय कल्पना !



## ७

एकंदरीत सर्वजण मदतीकरिता याचना करीत होते. अशा स्थितीमध्ये येथे स्थानिक मोजकेच पोलिस मदतीककरिता उपलब्ध होते, अशा निसर्गाच्या प्रकोपाचा भेसूर व विदारक प्रसंग आयुष्यात प्रथमच अनुभवायाला आला होता. हा एकीकडे गोंधळ सुरू असताना पोलिस स्टेशनचे पवार, उडते, शेटकर, हिंगे हे सर्व कर्मचारी भयभीत अवस्थेतच माझ्याजवळ आले. जमावातला प्रत्येकजण आमच्याकडून सहकार्यांची अपेक्षा ठेऊन होता. कोण काय बोलतं हे आम्हाला कळत नव्हते. त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. हे सर्व आम्ही पाहिले व पाहत होतो. त्यांचे समाधान करणे आमचे कर्तव्य होते,

" चला आम्ही आलोच, "

एवढे म्हणतो न म्हणतो तोच एक माणूस इतरांना रेटीत पुढे आला तो मोटमोठ्याने ओरडून आकाश पाताळ एक करीत होता. त्याचे बोलणे आणि रडणे आम्हाला सारखेच वाटू लागले,

"हमारा घर गिरके लोगा घरके अंदर दब गये, तुम क्या कर रहे हो ? उन्हे निकालने के लिये चलो," भावनाविवश आणि क्रोधाने तो बोलत होता.

अंधार असल्यामुळे तो कोण आहे हे आम्हाला ओळखता आले नाही. पण त्याचा आवाज ओळखीचा वाटल्याने मी त्याच्याजवळ सरकलो व त्याच्या जवळ जाऊन म्हणालो,

" अरे अत्तार भाई, क्या बात है ? घबरावो मत, हम सब आयेंगे " असे

म्हणून त्याला धीर दिला.

तो रागात बोलला तरी मला त्याचा मुळीच राग आला नाही. त्याला मदत करावी हीच भावना माझ्या मनात होती. आभाळ फाटले होते. इच्छा असूनही थिगळे लावता येत नव्हती. आम्ही केवळ नऊ-दहा जणच होतो. आमच्या दाही दिशांनी केवळ आक्रोश कानावर पडत होता.

जिकडे तिकडे हीच धावपळ असताना आम्हीही अस्वस्थ होतो. भूकंपाच्या संकटातून मी व पोलिस कर्मचारीही सुटलो नव्हतो. आमचीही घरे कोसळली होती. या पडझडीत आमच्या कर्मचाऱ्यांना व त्यांच्या घरातील सर्व कुटुंबियांना दुखापती झाल्या होत्या. अशाही परिस्थितीत जनसेवा लक्षात घेऊन व लागलेला मार विसरून आम्ही सर्वांनी आमची मुले बाळे रस्त्यावर बसवून लोकांना मदत करण्यासाठी पुढे आलो होतो.

अत्तारचा आक्रोश भयंकर होता. त्याच्या सोबत मी, उडते, शेटकर, हिंगे, त्याच्या घराकडे निघालो. काही अंतर चालून गेल्यानंतर दगडा-मातीच्या अनेक ढिगाऱ्यापैकी त्याने एक ढिगारा दाखविला आणि म्हणाला,

" साहब, ये मेरा घर है, इसके अंदर मेरे घरके लोक दब गये। "

आणि त्याने ऊर बडवायला सुरूवात केली. त्याचे सर्व घर जमीनदोस्त झाले होते. घरांच्या भिंती पडल्यामुळे घरावरील पत्रे व लाकडे ढिगाऱ्यावर होती. ढिगारा कोणत्या बाजूकडून उपसावा, क्षणभर विचार केला. तोच ढिगाऱ्याखालून कण्हण्याचा आवाज आला आणि आम्ही भराभर दगड-माती बाजूला काढायला सुरूवात केली. काहीजण पत्रे ओढत होते तर काहीजण त्याखालची लाकडे. पत्रे खिळलेले असल्यामुळे प्रचंड ओढाताण

होत होती. अडकलेल्याला बाहेर काढणं हेच प्रत्येकाचं ध्येय होतं. मी स्वतः देखील प्रचंड वेगाने दगड-माती बाजूला सारीत होतो. समोर आक्रोश करीत असणारा अत्तार रडत रडत म्हणू लागला,

" घबराहो मत....घबराहो मत.... अभी निकालते हे,"

आणि तो पूर्ण अवसान गळाल्यासारखा विकलांग होऊन रडत होता. ढिगारा उपसतांना एखादा दगड अडकलेल्या व्यक्तीवर पडला किंवा माती ढासळली तर आतला माणूस जिवंत राहू शकणार नव्हता,

" दमसे निकालो... दमसे निकालो " प्रत्येकजण प्रत्येकाला सूचना देत होता. सुदैवाने ढिगाऱ्यातून आम्ही तिघांना जिवंत बाहेर काढले. तमीजबी अत्तार, फारूक आणि अल्लाबक्श हे तिघे निघाले. सगळेजण अत्तारच्या भोवती जमा झाले. एकमेकांच्या गळयात पडून रडू लागले.

८

आक्रोशाने आसमंत भरून गेला होता. मी स्वतः आणि माझे सहकारी लोकांना जास्तीत जास्त मदत करत होते. कुठूनतरी असाच किंचाळण्याचा आवाज आला. मी त्या दिशेने निघालो. लोक सैरावैरा पळत असल्याचे दिसले. मी अनेकांना अडवून,

" काय झालं ? " म्हणून विचारलं.

जो तो आपला जीव मुठीत घेऊन पळत होता. हे का पळत आहेत हे अजूनही मला समजत नव्हते. यांच्यावर अजून कोणते संकट आलेले आहे. याची क्षणभर कल्पना केली. पण सत्य कळणे कठीण झाले. धावणारा एकजण हातवारे करीत सांगू लागला,

" धरण फुटले, पळा...पळा... "

हे ऐकून मी फार परेशान झालो. माझ्यातील सर्व शक्ती गळून पडते आहे, असे मला वाटू लागले. आता काय करावे, मीच मला प्रश्न विचारला. उत्तर सापडत नव्हते. भूकंपातून कसेबसे वाचलो, धरण फुटलं तर यातून वाचणे शक्य नाही. असा विचार मनात चमकून गेला. होणारे तर टळणार नव्हतेच. मग थांबायचे तरी कशाला. म्हणून मी दगडा-मातीच्या ढिगाऱ्यावरून धावत होतो. लोक सैरावैरा पळतच होते. त्यांची दिशा वेगळी माझी दिशा वेगळी. जर माकणी धरण फुटले तर भूकंपातील ढिगाऱ्यासकट आपण सर्वजण वाहून गेल्याशिवाय राहणार नाही. याची जाणीव मला झाली. मृत्यूच्या तांडवातून आपण सुटणार नाहीत हे माझ्या लक्षात आले.

धावण्याचा माझा वेग कमी झाला. पोलिस स्टेशनवर पोहचलो. माझे सहकारी प्रचंड दडपणाखाली माझ्या सोबतच होते. आमच्यापैकी कोणालाही आपल्या कुटुंबाची मुलाबाळाची आठवण आली नाही. केवळ कर्तव्य म्हणून आम्ही वेड्यासारखे लोकांच्या मदतीसाठी धावलो. माकणी धरण खरेच फुटले काय याची खात्री करणे आवश्यक होते.

पोलिस स्टेशनवर पोहचताच मी बिनतारी संदेशावरून लातूर कंट्रोल रूमशी संपर्क साधला. त्यांनी लगेच खात्री करून कळविले की, धरण फुटले नाही. कारण अगोदरच नैसर्गिक कोपामुळे लोक भयभीत झाले. त्यात पुन्हा धरण फुटल्याची अफवा ! आपणही वाहून जाणार, या भीतीपोटी लोक येणाऱ्या नव्या सकंटातून आपला जीव मुठीत घेऊन समोर दिसेल त्या रस्त्याने धावत होते. ह्या पळापळीत पोटच्या मुलाचा सुध्दा विचार न करता फक्त आपलाच जीव आपला समजून पळत होते. अपंग, ज्यांना पळता येत नव्हते, असे खुरडत खुरडत पुढे सरकू लागले. त्यांनाही येणाऱ्या पुरातून स्वतःलाही वाचवायचे होते. धरण फुटल्याच्या अफवेने लहान मुलापासून ते म्हाताऱ्यापर्यंत, सर्वजण पळतच होते.

माकणी धरण फुटल्याची केवळ अफवा होती. यातून लोकांना सावरणे आवश्यक होते. काय करावे लोकांना धीर द्यावा तरी कसा ! मी लगबगीने पोलिस जीपजवळ आलो व स्पीकरवरून लोकांना आवाहन केले,
" बाबांनो, पळू नका...घाबरू नका... माकणी धरण फुटले नाही. "
हेच वारंवार घसा कोरडा होईपर्यंत सांगत राहिलो. समोरून धावणाऱ्यांनाही हाताने इशारा करून थांबा थांबा म्हणालो. माझ्यावर कोणीही विश्वास ठेवण्याला तयार नव्हते. माझ्या तळमळीला कोणीही दाद देत नव्हते.

भूकंप झाल्यावर पोलिसांची मदत मागण्यासाठी हजारो लोक अंधारात माझ्याकडे आले होते. पण आता एकही जण मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच गावाच्या बाहेर पडत होता. पळणाऱ्या कित्येकांचे आप्तस्वकीय ढिगाऱ्याखाली सापडले. जे जखमी होते ते विव्हळत होते. माकणी धरण फुटल्याच्या अफवेने त्यांच्याकडे त्यांचाच आप्तस्वकीय बघायला तयार नव्हता. हीच पळणारी माणसं धरण फुटल्याच्या अफवेपूर्वी धडपडून रडत-भेकत इतरांची मदत घेऊन अडकलेल्या माणसाला जिवंत बाहेर काढण्यासाठी धडपडत होते. जखमींना दवाखान्यात कसे नेता येईल या विवंचनेत होते. पण एका अफवेने लोकांची मानसिकता क्षणात अमुलाग्र बदललेली होती.

माकणी धरण फुटल्याच्या अफवेपूर्वी सगळे हात ढिगाऱ्यात दबलेल्यांना बाहेर काढण्यासाठी गुंतले होते. अनेकांना जिवंत बाहेर काढले होते, तर अनेकांना जिवंत बाहेर कंबरेपर्यंतच काढले असताना, धरण फुटल्याची अफवा पसरली. क्षणात मदत करणारे हात मागे आले. अर्धं अधिक शरीर बाहेर पडलेल्यांना नवा सूर्य दिसणार होता. अशांना आपण कोसळलेल्या संकटातून जिवंत बाहेर निघणार, ही त्यांची आशा पल्लवीत झाली होती. त्यांनी आपले हात समोरच्यांनी वर ओढावेत यासाठी जीवाच्या आकांताने वर उचलले. श्वासापुरती हवा मिळाली पण मदत करता करताच मदतीचे हात थांबले. दबलेल्यांच्या मनात आपण जिवंत निघू, ही जी आशा क्षणापूर्वी निर्माण झाली होती ती दुसऱ्याक्षणी संपली. सूर्योदय होता होताच मावळला. मदतीची याचना करीत करीत व तडफडत त्यांनी शेवटी आपले प्राण सोडले.

ज्यांच्या अंगावर, पायावर दगड-माती, माळवद पडून गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी काहींच्या जखमेतून प्रचंड रक्तस्त्राव होत होता. त्यांच्या चेहऱ्यावर आपण जिवंत राहिलो याचं समाधान होते. त्यांचे आप्तस्वकीय त्यांना वैद्यकीय उपचारासाठी सुरक्षित ठिकाणी नेत होते. अनेकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद नव्हती. रक्त वाहत असल्याने त्यांना जागेवरून उठतापण येत नव्हते किंवा हालचालही करता येत नव्हती. अशांना त्याचे आप्तस्वकीय आधारकाठी होऊन त्यांना शिवाजी चौकाकडे आणण्याचा प्रयत्न करीत होते. दगडा-मातीच्या ढिगाऱ्यांची त्यांना पर्वा नव्हती. अफवा आली. जखमींना खांद्यावर घेऊन जाणाऱ्यांनी त्याला तिथेच टाकून दिलं. ज्यांना हाताचा आधार देत चालवित आणू लागले. अशा पंगु झालेल्यांना तिथेच सोडून निघून गेले.

" अरे... मला सोडून जाऊ नका... मला वाचवा रे....! "

गयावया करीत जाग्यावरच खुरडत मागून पळत जाणाऱ्यांना विनवू लागले,

" मला घेऊन चला.... मला कोणीतरी वाचवा रे बाप्पा..."

जखमी आणि पंगूचा आक्रोश हवेत विरून जात होता. धावणारा एकहीजण त्यांच्याकडे बघतही नव्हता. जो तो आपल्याच घाईत. आपल्याकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नाही. मदत करण्याऐवजी आपल्याला तुडवून लोक धावत आहेत. आपल्याला जिवंत राहायचे आहे, कोण वाचवील आता...कोणाला हाक मारावी ? काय करावे ? ...... सगळे मार्ग खुंटले. आता एकच मार्ग शिल्लक उरला होता. तो म्हणजे 'नीळकंठेश्वर'.

" बाप्पा... निळकंठेश्वरा...तु तरी धाव ! " म्हणत म्हणत अनेकांनी आकाशाकडे पाहत आपले प्राण सोडले.

असाह्य लोकांना रस्त्यात सोडून आपला जीव वाचविण्यासाठी जे लोक पळू लागले, त्यापैकी कांहीजण दगडा-मातीच्या ढिगाऱ्यावरून पळताना नाटीला, पत्राला, दगडाला पाय अडकून पडले. तिथच मेले. काहीजण असेच अडखळून पडले. मागचे त्यांना तुडवून पुढे गेले. अशा तुडवातुडवीत काही मेले.



**स्वतःचे घर भूकंपामुळे उध्वस्त झाल्यानंतर जीव मुठीत घेऊन पळणाऱ्यांना इतराच्या घराची भिंत कोसळून आलेला मृत्यू**

९

माकणी धरण फुटल्याची अफवा आहे, हे धावणाऱ्यांच्या लक्षात आले. मघाशी स्पीकरवरून पोलिसांनी सांगितलेले खरे आहे, हे त्यांच्या उशीराने लक्षात आले. पुन्हा त्यांना भूकंपाची आठवण झाली. पडलेल्या घरांची आठवण झाली. दगडामातीच्या ढिगाऱ्यात अडकलेल्यांची आठवण झाली. बाहेर काढलेल्या जखमींची आठवण झाली. धावपळीत हरवलेल्या मुला-बाळांची आठवण झाली. काहीना घरात पुरून ठेवलेल्या धनाची आठवण झाली. पुराच्या अफवेमुळे पळणारा लोंढा रिबॉन्ड झाला.

मी व माझे सहकारी, ढिगाऱ्यात दबलेल्या लोकांना वाचविण्याचा प्रयत्न करीत होतो. पळत गेलेले लोक लगेच परतले. पुन्हा नवा गोंधळ सुरू झाला. पुन्हा हात मदतीसाठी सरसावले. प्रचंड वेगाने ढिगारे उपसले जाऊ लागले. भूकंपामुळे गावाचा नकाशा आणि दिशाही बदललेल्या होत्या. सर्व माणसे दिशाहीन झाली होती. जमेल त्याला वाचविण्यासाठी प्रयत्न करू लागली. एका ढिगाऱ्याखाली एक मुलगी सापडली. असेल तेरा चौदा दिवसाची. बाहेर काढलं तेव्हा बेशुध्द होती. आजूबाजूला काम करणाऱ्या लोकांनी ढिगारे उपसण्याचे काम थांबविलं. सगळे त्या लेकराभोवती गोळा झाले. नीळकंठेश्वराची कृपा म्हणून लेकरू वाचलं. अनेकांनी उद्‌गार काढले. कांही तरूणांनी तिला दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी तिच्यावर उपचार केले. आणि ती शुध्दीवर आली.

ही गोष्ट सर्वांनाच या दुःखाच्या क्षणी एक सुखद अनुभव देऊन

गेली. ती वाचलेली मुलगी कोणाची आहे याचा प्रयत्न करूनही शोध लागला नाही. त्यामुळे तिच्या जातीचाही प्रश्न आला नाही. तिच्या धर्मांचाही प्रश्न आला नाही. निसर्गाने तिच्यावरील जाती धर्मांची बंधने तोडून तिला मुक्त केले होते. ती आता केवळ मानवाची कन्या होती. नावावरूनही धर्मांची ओळख होते. ज्या भूकंपामुळे तिला जाती धर्मांच्या भिंती पलीकडे जाता आले, तिला एकच नाव शोभून दिसेल ते म्हणजे 'भूकंपकन्या.'

किल्लारी या गावात लिंगायत आणि मराठा समाज मोठ्या प्रमाणावर आहे. येथे द्रांक्ष आणि ऊसाच्या बागायती आहेत, या शेतावर काम करणाऱ्या मजूरांच्याही वेगवेगळ्या जाती आहेत. गणेश उत्सवात निर्माण झालेला जातीय तणाव, हे सर्व भेद भूकंपाने या क्षणी संपविले होते. सगळ्या जाती धर्मांच्या भिंती दगडा-मातीच्या भिंती बरोबच ढासळल्या. जिवंत राहिलेल्या लोकांना भूकंपग्रस्त या नव्या नावाने जगभरात ओळखले जाऊ लागले. तिथे कोणी हिंदू नव्हता, कोणी मुस्लिम नव्हता, कोणी बौध्द नव्हता, कोणी शिख नव्हता, कोणी इसाई नव्हता या सर्वांना मिळून एकच नाव ते म्हणजे भूकंपग्रस्त !

भूकंपामुळे जातीपातीची बंधने तुटली होती. शत्रूत्व संपले होते. श्रीमंती आणि गरिबी मध्ये भेदभाव राहिला नव्हता. पूर्वीचे सर्व विसरून एकमेकांना आधार देत होते. सर्वांच्याच पदरात नियतीने दुःख टाकले होते. दुःखाचे प्रमाणही समान होते. केवळ मानवता हाच धर्म समजून कित्येक लोक स्वतःचा जीव धोक्यात घालून ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा जीव वाचावा म्हणून वेड्यागत धडपडत होते. सर्वजण नियतीच्या फुटक्या नावेतील सहप्रवाशी होते. प्रत्येकाची जिवंत राहण्याची धडपड चालू होती.

मानवी प्रवृत्तीच्या काही विचित्र छटा पाहून मन बेचैन झाले. ढिगारे उपसण्याचे काम चालू असताना एक माणूस चादरीत नोटा गुंडाळून ते गाठोडे पाठीवर घेऊन पळून जाताना दिसला. तर एकजण ढिगाऱ्यात अडकलेल्या आपल्या कुटुंबीयांकडे दुर्लक्ष करून जमिनीत पुरलेले धन काढण्यात मग्न होता.

# १०

मी मदत कार्यात व्यस्त होतो. अधूनमधून पोलिस-नियंत्रण-कक्षाशी संपर्क ठेवण्यासाठी मला पोलिस स्टेशनला जावे लागत होते. असाच एकदा ठाण्याकडे जात असताना रस्त्यात तांबारवाडीचे अरूण पाटील भेटले. ते माझे मित्रच होते. पण ख्याली खुशहालीबद्दल चर्चा करण्याची ही वेळ नव्हती. याच क्षणी विरपक्ष गावकरी नावाचा पन्नाशीचा गृहस्थ माझ्यासमोर धावत आला. मी अरूण पाटलांशी बोलणे थांबवून त्याच्याकडे बघितले.

तो हात जोडून मला विनंती करू लागला,

" साहेब... माझा मुलगा आणि सून ढिगाऱ्यात अडकले आहेत... त्यांना बाहेर काढा... त्यांचा कण्हण्याचा आवाज येत आहे, त्यांना काढण्यास चला हो ! "

अशी पोटतिडकीने व कळकळीने विनवणी करीत होता. लगेच मी, उडते व हिंगे तसेच अरूण पाटील, आम्ही सर्वजण त्याच्या घराकडे धावत गेलो. त्याच्या घराच्या अर्धवट पडलेल्या भिंतीवरुन काही चाहूल लागते का, याचा प्रयत्न केला. खरेच आतून कण्हण्याचा आवाज येत होता. आम्ही लगेच कामाला लागलो. ढिगाऱ्यावरील लाकडे व दगडाची रास बाजूला करताच आत दबलेल्या विरपक्ष गावकरीच्या मुलाचा व सूनेचा स्पष्ट आवाज ऐकायला आला. दोन जीव वाचविल्याचा आनंद आधीच मला वाटला. आता एकेकाला हात देऊन वर काढण्याचे तेवढे बाकी असतानाच आमच्या मागून जमिनीखालून गडगड असा आवाज आला आणि पुढे सरकला.

नेमक्याच क्षणी आमच्या समोरील अर्धवट उभी असलेली भिंत वर येऊ पाहणाऱ्या विरपक्ष गावकरीच्या मुलावर व सूनेवर पडून ते समाधीस्त झाले. इतका भयानक प्रसंग माझ्यासमोर घडला. ज्या हाताने ढिगार उपसून त्या दोघांना काढण्याचा मी प्रयत्न केला. दुसऱ्या क्षणी माझ्यासमोर परत ते गाडल्या गेले. मी हातावरील रेषा न्याहाळत बाजूला झालो.

एका क्षणाच्या गडगडाटाने आमचे प्रयत्न व त्यांची जगण्याची आशा फोल ठरली होती. अडकलेल्या लोकांना जिवंत काढू अशी जी आम्हास खात्री वाटत होती, ती सुध्दा क्षणभंगूर ठरली. अनेकजण ढिगाऱ्याबाहेर येता-येता पुन्हा ढिगारा पडून जिवंत गाडले गेले. इतका भयाण दुर्दवी मृत्यू मी पहात होतो. निसर्गापुढे हतबल झालो होतो. आपण काहीच करू शकत नाहीत, याचे दुःखही वाटत होते.

भूकंपाच्या धक्क्याचे वर्णन करायचे झाल्यास स्थूल मानाने असं करता येईल की, आपण बोगद्याच्या वर उभे आहोत, आणि बोगद्यातून रेल्वे जात आहे. पायाला जाणवणाऱ्या संवेदना आणि कानावर आदळणारा गडगडाट भूकंपाच्या धक्क्याचा आभासी अनुभव मिळू शकतो.

किल्लारी गावात मृत्यूचे थैमान चालूच होते. आक्रोश आणि किंकाळ्याने दाटलेला आसमंत शुष्क हुंदक्यांमध्ये रूपांतरित झाला होता. लोक आपल्याच घराच्या ढिगाऱ्यावर बसून कोरड्या डोळ्याने इकडे तिकडे पाहत होते. त्यांची मनं बधीर झाली होती. मला जे भेटतील त्यांना धीर देण्याचा मी सतत प्रयत्न करीत होतो. खरं म्हणजे मी देखील त्यांच्या सारखाच विस्थापित झालो होतो. भल्या सकाळपासूनच लोकांना मदत करण्यात गुंतल्यामुळे मला माझा किंवा माझ्या कुटुंबियांचा देखील विचार

शिवला नाही. थोडी उसंत मिळाल्यामुळे मी बायको मुलांच्या शोधात निघालो. गर्दीत कोण कुठे आहे, पत्ता लागत नव्हता. समोरुन येणारा त्याच्या बायको-मुलाबद्दल त्यांना कुठे पाहिले का, म्हणून विचारत होता.

माझी अवस्था त्यांच्या सारखी होती. म्हणून मी शेटकर पोलिस शिपायाला माझ्या कुटुंबियाबद्दल विचारले, तो म्हणाला,

" साहेब, सर्व पोलिसांच्या बायका मुले एकत्रित बसविले आहेत. त्यात बाईपण आहेत " मी निश्चिंत झालो.

सूर्योदयापूर्वी सूर्याच्या कोवळ्या किरणांनी उध्वस्त किल्लारीतील जनजीवनाचा परामर्श घेतला. याच क्षणी औसाहून आपल्या स्टॉफसह उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. जाधव साहेब, उपविभागीय दंडाधिकारी श्री. कमलाकर फंड साहेब, तहसीलदार श्री. फुलारी साहेब व अन्य अधिकारी व कर्मचारी किल्लारीत येऊन दाखल झाले. त्यांच्या पाठोपाठ पोलिस अधीक्षकही आले. लोकांच्या गर्दीतून त्यांना शिवाजी चौकापर्यंत गाडी आज आणने अवघड गेले. समोरचं दृश्य पाहून ते गोंधळून गेले. ते पायीपायीच पुढे निघाले. मी लगबगीने त्यांच्या दिशेने पुढे जाऊन 'सर' म्हणून सॅल्युट केला. त्यांनी माझ्या सॅल्युटची दखल घेतली नाही. नंतर मी स्वतःकडेच पाहिले. मी बनियान व लुंगीवर होतो. या भागातला पोलिस उपनिरीक्षक म्हणून ते मला ओळखणार तरी कसे. मी त्यांच्या सोबत होतो. माझ्या आवाजावरून मात्र त्यांनी मला ओळखले. क्षणभर थांबून माझ्या पाठीवर हात टाकून म्हणाले,

" अरे नावंदे, तुम अब घबराना नही।, मैं आया हूं, और थोडीही देर में जिले का पोलिस फोर्स भी आ रहा है। "

त्यांच्या बोलण्यामुळे मला दिलासा लाभला. त्यांनी सांगितलेल्या शब्दांनी माझे मनोबल वाढले. मूठभर सैनिकांना सोबत घेऊन लढणाऱ्या एकांड्या शिलेदाराला राजाने जसा धीर द्यावा, नेमकी तशीच अवस्था माझी झाली होती.

मी साहेबांसोबतच शिवाजी चौकात आलो. शिवाजी महाराजांचा पुतळा तेवढा उभा होता, आजूबाजूची घरे मात्र जमीनीवर रांगू लागली. हे सर्व पाहून पोलिस अधीक्षकानी बिनतारी संदेशावरून औसा, निलंगा, लातूर येथील पोलिस स्टेशनशी संपर्क साधला, त्याठिकाणच्या एस.टी. बसेस किल्लारीला पाठविण्याच्या सूचना दिल्या. समोर उपस्थित असलेल्या जमावातून एकजण म्हणाला, तळणीला रात्री एक बस रोज मुक्कामाला असते. मी माझ्या सहकारी पवार यांना यासंदर्भात विचारणा केली. तो म्हणाला,

" हो साहेब "

" जा आणि तावडतोब बस घेऊन ये "

मी सांगितल्या बरोबर तो निघाला. दरम्यान वस्तुस्थितीची पाहणी करण्याकरिता आलेल्या शासकीय अधिकाऱ्यांच्या वाहनातून जखमींना औसा, निलंगा, लातूर येथे उपचारासाठी पाठविण्याचे काम सुरूच होते.

सूर्य आस्ते कदम वर येण्याच्या तयारीत होता. एकमेकांचे चेहरे ओळखता येतील, एवढा उजेड आधीच येऊन ठेपला. एकमेकांना पाहून लोकांची मनं गहिवरून येत. जखमी झालेल्यांना रूग्णालयात पाठविण्यासाठी मी माझे सहकारी धडपडत होतो. जखमींची संख्या प्रचंड होती. वाहने अपुरी पडू लागली.

पोलिस अधीक्षक श्री बिहारी साहेब माझ्याकडे वळून म्हणाले,

" अरे नावंदे... चल गांव में जाके आयेगें। "

" एस सर "

म्हणून त्यांच्यासोबत निघालो. दगडा-मातीच्या ढिगाऱ्यातून दिसेल त्या रस्त्याने गेलो. आपल्याच घराच्या ढिगाऱ्यावर त्या घरातला जो जिवंत राहिला असेल तो बसून विलाप करताना दिसला. एका ढिगाऱ्यावर पोलिस स्टेशनच्या जीपचा ड्रायव्हर श्री इंगळे असाच दुःखी चेहऱ्याने उभा होता. त्याने साहेबांना पाहताच सॅल्युट केला, मी त्यांना इंगळेचा परिचय करून दिला.

" इंगळे, आपका क्या नुकसान हुवा। " साहेबांनी सहानुभूतीपूर्वक विचारले.

तो म्हणाला,

" ढिगाऱ्यात दबून माझी पुतणी मेली... साहेब "

साहेबांनी त्याचे सांत्वन केले आणि आम्ही पुढे निघालो. उध्वस्त किल्लारीचे इंचा इंचावर दर्शन होऊ लागले. एका वळणावर रस्त्याच्या कडेला एक मुलगा मरून पडलेला दिसला, असेल चार पाच वर्षाचा. हे भयानक दृश्य पाहून साहेबांसह आमची सर्वांचीच मन व्यथित झाली. या मुलावर त्याच्या आईवडीलाचे किती प्रेम असेल ! असा एक विचार माझ्या मनात काट्यासारखा रूतला. मन गहिवरून आलं. डोळ्यात येणाऱ्या आसवांना बांध घालण्याचा मी प्रयत्न केला. पण अयशस्वी झालो. यांत्रिकपणे मी त्या मुलाचे शव हातावर उचलून घेतले व चौकाकडे निघालो. याक्षणी माझ्याबरोबर माझे अधिकारी आहेत, हे सुध्दा मी विसरलो

होतो. रस्त्याने चालताना माझ्याकडे कामाला असलेली बाई (शशिकला) आपला ऊर बडवत माझ्या समोर आली, ती ओक्साबोक्सी रडत होती, तिचे कोरडे हुंदके पाहून आमच्या सर्वांचीच मने हेलावली.

" साहेब... माझा मुलगा पण काळाने नेला की हो "

ती सारखी आक्रोश करू लागली. मी तिला धीर देऊन सांत्वन केलं. पण तिच्या हुंदक्यांना मी आवर घालू शकलो नाही. तीरासारखी ती धावतच पुढे निघून गेली. चौकात येताच प्रेतांच्या रांगेत मी माझ्या हातावरील मुलाचे प्रेत ठेवले.

# ११

मी साहेबांना नीळकंठेश्वराबद्दल माहिती देत देत मंदिराकडे निघालो. वाटेत एका घराच्या ढिगाऱ्यावर एक बाई रडत होती. रडण्याचा आवाज नव्हता. डोळयात अश्रू नव्हते. तिच्या चेहऱ्यावर तिचे दुःख आम्हाला दिसले.

समोरून येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाकडे पाहत ती म्हणायची,

" माझे सगळेच लेकरं मेले हो... माझा नवरा जिवंत आहे अन् तो या ढिगाऱ्याखाली दबला हो "

रडत कपाळ बडवून घ्यायची. तिची मुले तर गेलीच होती, पतीला वाचविणे एवढीच तिची आशा होती, नवऱ्याचा जीव वाचविण्यासाठी जिवाच्या आकांताने ती दिसेल त्याला विनवण्या करू लागली. हृदय हेलावून सोडणार दृश्य पाहून आम्ही वेळ वाया न जाऊ देता पुढे सरसावलो. पडलेले घर माळवदाचे होते. घराच्या भिंती अर्धवट पडल्यामुळे माळवद एका बाजूने खाली आले होते. त्यावर भिंत पडून मोठा ढिगारा जमला. एक नाट तिरपी पडल्यामुळे खालच्या पोकळीत त्या असहाय्य माऊलीचं कुंकू जिवंत होत. पण त्याचे दोन्ही पाय ढिगाऱ्यात अडकले होते. तिने आपल्या सर्व मुलांची प्रेते वर काढून ठेवली होती. पण नवऱ्याला बाहेर काढणे तिला जमत नव्हते. आम्ही जेव्हा त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होतो. तेव्हा ती मुलांच्या प्रेताकडे पाहता पाहता म्हणायची,

" साहेब हळू काढा हो...आणि परत मुलांच्या प्रेताकडे बघत रडायची "

आम्ही त्याला जिवंत बाहेर काढण्यात यशस्वी झालो. याचे समाधान आमच्या चेहऱ्यावर होते. आपण या संकटातून जिवंत बाहेर निघाल्याची एक सुखद छटा त्याच्या चेहऱ्यावर आम्ही वाचली. त्याला वर काढले. त्याचे लक्ष आपल्या सर्व मृत मुलांकडे गेले. त्याच्या चेहऱ्यावरील भाव क्षणात बदलून गेले. त्याला हुंदका आवरता आला नाही. हुंदके देत देत तो एकच वाक्य पुन्हा पुन्हा म्हणत राहिला,

" मला कशाला वाचविले हो..."

रडणाऱ्या नवऱ्याकडे त्याची पत्नी रडत रडत पण डोळे भरून पाहत होती.



**ढिगाऱ्याखाली अडकलेल्या श्री. नोकजा यांना लेखक व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिवंत काढले. श्री. नोकजा हे पोलिस महासंचालक व इतर अधिकाऱ्यांच्या सोबत संवाद साधतांना.**

सूर्य जसाजसा वर येत होता तसेतसे मदत करण्यासाठी, बाहेरून लोक येऊ लागले. आमचही मदत करण्याचे कार्य अथक चालू होतं. अनेक शासकीय अधिकारी, कर्मचारी, सेवाभावी संस्थेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर येऊ लागले. तसेच नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उप-महानिरीक्षक श्री.एच.बी. घुले साहेब किल्लारीत येऊन दाखल झाले. त्यांनी प्रत्यक्ष मदत कार्यात सहभाग घेतला.

भूकंपग्रस्त गावांची यादी तासा-तासाला वाढू लागली. तसतशी जवाबदारी वाढू लागली. प्रत्येक गावालाच मदतीची गरज होती. साधने कमी होती. तरीही उपलब्ध साधन सामुग्रीचा नियोजनबध्द उपयोग करून सर्वांना दिलासा देण्याचा शासन स्तरावर प्रयत्न चालू होता. जो तो वरिष्ठ अधिकारी व पुढारी या परिसरातील भूकंपग्रस्त गावाबद्दल मलाच माहिती विचारीत होते. मी तर भांबावून गेलो होतो. आलेल्यांना माहिती पुरवू की जखमींना दवाखान्यात पाठवू, ढिगाऱ्यात अडकलेल्यांना काढू की माझ्या मुला-बाळांचा शोध घेऊ. नेमके विचार करण्याची उसंत मिळत नव्हती.

माझ्या चेहऱ्यावरील विचित्र भाव पोलिस उप-अधीक्षक श्री. धैर्यशील जाधव यांनी ओळखले. या विचित्र परिस्थितीत ते माझ्या जवळ आले आणि म्हणाले,

" अरे पोरा, तुला काय झाले ? तुझी बायको मुलं कशी आहेत ? तुझं घर तर पडलं नाही ना ? " असे अनेक प्रश्न त्यांनी विचारले.

या प्रश्नात कौटुंबिक जिव्हाळा आणि आत्मियता दिसून आली. 'पोरा' या शब्दामुळे मी सद्‌गदित झालो. आपल्याही पाठीशी कुणीतरी आहे. याची जाणीव झाली. आत्मियतेच्या शब्दांनी कठीण प्रसंगात धीर दिल्याचा सुखद

अनुभव मला आला.

कौटुंबिक चर्चेमधून जाधव साहेब मला अधिक कार्य करण्यास प्रेरणा देत होते. नेमका याच वेळी शेटकर तेथे आला. मलाही माझ्या कुटुंबाची आठवण झाली. मी त्याला विचारले. तो म्हणाला,

" साहेब, पोलिसांच्या बायका मुलांना लातूरला पाठविले आहे. बाईसाहेब व आपला मुलगाही त्यात आहे. बाई लातूर येथील आपले स्नेही सुरेश कोकाटे यांच्या घरी जाणार आहेत. असा निरोप त्यांनी तुम्हाला सांगण्यास सांगितले."

त्यावर मी " ठीक आहे " म्हणून मदत कार्यात गुंतलो.

भूकंपग्रस्तांना सहानुभूती दाखविण्यासाठी लोकांचा ओघ येत होता. तेवढ्यात त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मी त्यांना मदत कार्यात अडथळा आणू नका असे आवाहन करीत होतो. तेवढ्यात थोड्यावेळापूर्वी मला निरोप देऊन गेलेला शेटकर परत आला. मला त्याचे डोळे डबडबले दिसले. त्याच्यावर कोणते दुःख कोसळले, याची मला अजिबात कल्पना नव्हती. मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहतच राहिलो. तो माझ्या जवळ आला व म्हणाला,

" साहेब, आपले पोलिस स्टेशनचे चाबूकस्वार, नलवाड व चामे या भूकंपात मेले...साहेब."

हे ऐकून मला धक्का बसला. मी लगेच शेटकर बरोबर पोलिस स्टेशनकडे निघालो. पाहतो तर पोलिस स्टेशन गेट जवळच दोन प्रेते झोपलेल्या अवस्थेत होती. माझा माझ्या डोळयावर विश्वास बसत नव्हता. मला झालेले दुःख डोळ्यांतून वाहू लागले. रात्री दोन वाजेपर्यंत जे माझ्या सोबत सावली

सारखे राहून कार्य करीत होते. ते आज माझ्यापासून दूर गेले होते. कधीही न परतण्यासाठी. शेवटी भावनेला आवर घालून त्यांच्या नातेवाईकांचे सांत्वन केले. "तुम्ही रडू नका. नियतीच्या पुढे कोणाचेही काही चालत नाही". त्यांचे सांत्वन करता करता माझे डोळे पाझरू लागले. रूमालाने डोळे पुसून मी परत शिवाजी चौकाकडे निघालो.

एव्हाना उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. नरोड, श्री. पाटील, श्री. कराळे, पोलिस निरीक्षक श्री. मरवाळीकर, श्री. एम.एम. गुट्टे, श्री. बॅंद्रे, श्री. महानोर, श्री. लामतुरे, तसेच पोलिस उपनिरीक्षक इंगळे पाटील, राम चेवले, गौर, गिते, शेख, थोरात, सूर्यवंशी, काजी, मंकावार, माळी, भाऊराव केंद्रे, डोईजड, राजपुत ही अधिकारी व कर्मचारी मंडळी मदतीसाठी किल्लारीत येऊन दाखल झाली.

एवढा मोठा भूकंप घडल्यामुळे त्याचे पडसाद शासन दरबारी पडले; शासकीय अधिकाऱ्यासोबतच या भागाचे आमदार श्री. किशनराव जाधव, जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीपराव देशमुख, माजी मुख्यमंत्री निलंगेकर साहेब, कॉ. माणिक जाधव, एस. आर. देशमुख, बाबासाहेब गायकवाड, अनिल शिंदे, बी. व्ही. काळे, मधुकर कोकाटे, होनराव सर, शैलेश लाहोटी व इतर असंख्य पुढाऱ्यांनी किल्लारीस येऊन भूकंपग्रस्तांना भेटी दिल्या.

भूकंपामुळे उध्वस्त झालेले जनजीवन, वित्तहानी व जीवितहानी जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी या परिसरातील पत्रकार राजा माने, जयप्रकाश दगडे, जेवरीकर, कोळगे, ओम मोती पोवळे, माधव विचारे, गोपाल कुलकर्णी, व्यंकट पन्हाळे, विजय बोरफळे, हंचाटे, स्वामी, बद्दर, महारूद्र मंगनाळे, शंकर झुलपे, चिंचोले, व इतर ज्ञात-अज्ञात पत्रकार

मंडळीही येथे दाखल झाली.

भूकंपग्रस्तांच्या वेदना आपल्याच आहेत, असे समजून विधायक कार्य करण्याच्या उद्देशाने सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक तसेच डॉ. चिंते, डॉ. कुकडे, डॉ. बाहेती, डॉ. दिनकर काळे, प्रा. विजय शिंदे, प्रा. सोमनाथ रोडे, प्रा. मदनसुरे व इतर सर्व डॉक्टर मंडळी औषधोपचारासह मदत कार्यात गुंतली होती.

# १२

किल्लारीला भूकंप झाल्याची वार्ता प्रसार माध्यमांनी जगाच्या कानाकोपऱ्यात नेऊन पोहचविली. भूकंपामुळे सर्वजण व्यथित झाले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. शरदचंद्रजी पवार व जिल्ह्याचे पालक मंत्री श्री विलासरावजी देशमुख तसेच गृहराज्य मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर ही मान्यवर मंडळी ठीक अकरा वाजता किल्लारीत येऊन दाखल झाली. लोकांनी प्रचंड गर्दी केली. मा. पोलिस अधीक्षकाने मला बोलावून सांगितले,

" नावंदे, व्ही.आय.पी.को. रस्ता बताने का काम तुम करोगें। "

" एस सर "



काहीं क्षणातच बेचिराख झालेल्या किल्लारी गावातील एक दृश्य

म्हणत आलेल्या मान्यवरांना शिवाजी चौकातून शिल्लक असलेल्या रस्त्याने श्री नीळकंठेश्वराच्या मंदिरापर्यंत कसेतरी घेऊन गेलो. पुढे पाहतो तर संपूर्ण गांवच नष्ट झालेले दिसले. अपवादात्मक एखादी भिंत उभी होती. अनेक ढिगाऱ्यातून आपले घर कोणते आहे हे त्या घराच्या मालकाला सुध्दा शोधून सापडत नव्हते. दगडा-मातीची घरे एकमेकांच्या हातात हात घालून पडली होती. चौफेर अशीच दृश्ये दिसत होती.

संबंध गाव बेचिराख झाला होता. भग्न अवशेषांखेरीज कांहीच दिसत नव्हते. रस्ता असण्याचा प्रश्नच नव्हता. तरीपण आलेल्या लोकप्रतिनिधींना भूकंपग्रस्त गाव दाखविणे जरूरी होते. ढिगाऱ्याच्या गर्दीतून मी वाट काढीत होतो. पण निश्चित असा मार्ग नव्हता. सुचेल तिकडे नेत होतो. गावकऱ्यांचा घोळका माझ्यापुढे चालून गाव दाखविण्याचे काम करीत होता. जो तो त्यांना आपली शोकांतिका सांगत होता. इकडे या साहेब, हे घर माझे आहे तर दुसरा म्हणे इकडे या साहेब, हे घर माझे आहे. अशा चढाओढीत जो तो आपल्या दुःखाची नोंद घेतली जावी म्हणून धडपडत होता. मा. मुख्यमंत्री व पालकमंत्री सर्वांचे ऐकून घेत व सांत्वन करीत पुढे जात. शेवटी एकूण झालेले नुकसान वित्तहानी व जीवितहानीची माहिती घेऊन पुढील भूकंपग्रस्त गावांना भेटी देण्यासाठी निघून गेल्याने माझ्यावरील एक दडपण कमी झाले होते.

मा. मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिगण यांना रवाना केल्यानंतर मी पोलिस स्टेशनकडे निघालो. तोच माझे वरिष्ठ सहकारी श्री मधुकर इंगळे पाटील माझ्याजवळ आले. त्यांनी माझ्या खांद्यावर हात टाकून विचारले,
" अरे तुझा ड्रेस कोठे आहे ? "

" सर, सर्व काही घरात अडकल्याने काहीच करू शकलो नाही "
त्यावर ते म्हणाले,
" ठीक आहे, मी माझा ड्रेस मागवून देतो."
दुपारी इंगळे साहेबांनी निलंग्याहून ड्रेस मागविला होता. एखाद्या पालकाने आपल्या पाल्याची काळजी घ्यावी, तितक्याच आत्मियतेने श्री इंगळे यांनी मला ड्रेस दिला होता. ड्रेस अंगावर चढवित असताना माझ्या उजव्या खांद्यावर जखम झाल्याचे माझ्या लक्षात आले. प्रलयंकारी भूकंपात मृत्यूचे थैमान माझ्यापुढे होत असताना मला माझ्या जखमेचे भान राहू शकले नाही. एवढा वेळ सामान्याप्रमाणे मीही एक होतो. ड्रेस चढविल्यावर अधिकारी बनल्यासारखे मला वाटले. पण माझ्या कामात कोठेही फरक पडला नाही.

आता दुपारचे दोन वाजले होते. काही सेवाभावी संस्थेच्या मार्फत येथे वाटपासाठी जेवणाचे साहित्य, दूध, ब्रेड इत्यादी मदत आली होती. पण लोकांची खाण्यावरची वासना उडालेली होती. जो तो प्रेतांच्या शोधात फिरत होता. मृत्यूचे थैमान सुरू होते. घराघरात प्रेते अडकली होती. दुःख अपार होते. इच्छा नसूनही पोटाची खळगी भरणे भाग होते. म्हणून आलेली मदत घेण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या होत्या. भूकंपापूर्वीची समृध्द व गरीब घरातील माणसे भूकंपानंतर मदत घेण्यासाठी एकाच रांगेत उभी होती. अनेकांना नियतीने आज लाचार व्हायला भाग पाडले. अनेकांचा ताठरपणा थोड्या वेळापुरता जागृत झाला. पण तो फार काळ टिकला नाही. शेवटी मदतीची याचना त्यांनाही करावीच लागली.

# १३

एंकदरीत मदतकार्य सुरळीत चालू होते. होमगार्डस्, पोलिस, संघटनांचे स्वयंसेवक व किल्लारीकरांचे नातेवाईक प्रत्येक ढिगारा उपसून सापडलेली प्रेते शिवाजी चौकात आणीत होते. चौकात प्रेताचा ढिग जमला होता. जिकडे पहावे तिकडे आणून टाकलेली प्रेते दिसत होती. मी स्वतः आणि सहकाऱ्यांनी प्रेते ओळखू यावीत या उद्देशाने सर्व प्रेतांना एका ओळीत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. बाहेर गावावरून येणाऱ्यांची संख्याही वाढत होती. ढिगाऱ्याखालून प्रेते शोधून आणण्याचे कार्य चालूच होते. अचानक काही काम उद्‌भवल्यामुळे मी पोलिस स्टेशनवर गेलो. तिथे बरेचसे लोक आधीच जमलेले दिसले. मला पाहताच अनेकजण विचारू लागले.

"साहेब, अमूक गल्लीत माझा नातेवाईक राहत होता. पण त्याचे घर शोधूनही सापडले नाही, त्या घरातील कोणीही अजूनपर्यंत मला भेटला नाही, त्याला कसे शोधू ?"

मी त्यांचे ऐकून घेत व त्यांना जी प्रेते ठेवली आहेत त्या रांगेत शोधायला सांगत असे.

माझ्या बोलण्यामुळे समोरच्या माणसाला गहिवरून यायचं. ते शिवाजी चौकात जाऊन प्रेतांच्या ओळीत आपल्या नातलगाचा शोध घेत. समजा तिथे जर सापडला नाही तर तो परत येऊन विचारी,

" साहेब, तेथेही नाही "

" हे पहा... सर्व लोक काम करीत आहेत, थोडा वेळ थांबा. कदाचित

नव्याने येणाऱ्या प्रेतात सापडेल "

ज्यांना आपल्या नातेवाईकाचा मृतदेह सापडत असे ते परत येऊन मला सांगत,

" साहेब... प्रेताच्या ढिगाऱ्यात आमचा नातेवाईक सापडला "

" मग आपण ते प्रेत घेऊन जाणार का ? "

त्यावेळी ते सर्व हो म्हणत. आपल्या नातेवाईकाचे प्रेत ताब्यात घेऊन कोणी गाठोडे बांधून, कोणी झोळीत टाकून तर कोणी सोबत आणलेल्या बैलगाडीतून नेत, काही जण तर चक्क पाण्यांची कावड जशी खांद्यावर ठेवतात तशी प्रेते ठेऊन नेत असत.

भूकंपात पडलेल्या घरांचे वासे, किलचन जे सापडेल ते गोळा करून दिसेल त्या मोकळ्या जागी त्या प्रेताचा अंत्यविधी पार पाडीत. गावात जिकडे पाहावे तिकडे प्रेते जळत होती. समृध्द किल्लारीचं रूपांतर एका स्मशानभूमीत झाले होते. आकाशात धुरांचे ढग निर्माण होऊ लागले.



किल्लारी गावात सर्वत्र जळणाऱ्या प्रेतांची अशी दृश्य.

महाराष्ट्रातून लोकांची रीघ किल्लारीकडे लागली. महाराष्ट्राला लागून असलेला राज्यातूनही हा विनाशकारी भूकंप पहायला लोक येत होते. आधी आलेल्यापैकी अनेकांनी ऊत्स्फूर्तपणे मदत कार्यात सहभाग घेतला. त्यांच्या कार्यात तळमळ दिसत होती. एंकदरीत मदत कार्य व्यवस्थित सुरू होते.

दुपारनंतर किल्लारी गावाला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले. जिकडे पहावे तिकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी गावात येताना दिसू लागल्या. ही मंडळी मदत करणाऱ्यांच्या भोवती गोळा होऊन प्रेक्षकाची भूमिका वठवित होती. एवढेच नव्हेतर मदत करणाऱ्यांना उगीचच उलट सुलट प्रश्न विचारून त्यांच्यात अडथळा निर्माण करीत होती.

भूकंपानंतर ढिगाऱ्याखाली दबलेल्यांना बाहेर काढण्यासाठी लोकांची गरज होती. आता एवढे लोक जमा झाले की त्यांना गावाच्या बाहेर काढण्यासाठी आम्हाला प्रयत्न करावा लागला. ही गर्दी केवळ बघ्यांचीच होती. यातही काही समाजसेवक, डॉक्टर्स, साधू, पुढारी, पत्रकार किंवा त्या गर्दित चोर लफंगेही असतील. परंतु त्यांना या अफाट जनसागरात ओळखणे शक्य नव्हते. मी स्थानिक अधिकारी असल्यामुळे मला पाहून लोक प्रश्न विचारीत. भूकंप कसा झाला ?.... किती वाजता झाला ?.... किती माणसे मेली ?.... आपण कोठे होता ? असा प्रश्नांचा भडीमार सतत होऊ लागला. नेमका कोण कोणता प्रश्न विचारतो. हे ही मला कळत नव्हते. हजारोंचे हजार प्रश्न, मी एकटा काय उत्तर देणार !

जिकडे तिकडे जळणारी प्रेते, आसमंतात दाटलेला धूर, गावात आलेला माणसांचा पूर आणि आपल्याच घराच्या ढिगाऱ्यावर बसून आक्रोश

करणारा एखादा माणूस. या माणसाचे आंतरिक दुःख प्रश्न विचारणाऱ्याला काय कळणार ? तरीपण तो विचारायचा,

" तुमच्या घरातली किती माणसे मेली ? तुम्हीच कसे काय वाचलात ? शासनानी तुम्हाला काही मदत केली काय ? "

असे निरर्थक प्रश्न विचारणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. दुःखी माणूस त्याच्या प्रश्नाचं उत्तर न देता हुंदके देत देत निघून जा बाबा...असं हाताने खुणवीत असे.

काही सेवाभावी संस्थेचे स्वयंसेवक आपल्या जिवाची पर्वा न करता माणुसकीस जागून मदत कार्यांत गुंतले होते. ढिगारे उपसून प्रेते बाहेर काढणाऱ्या एखाद्या स्वयंसेवकास बाहेरून आलेल्या बघ्यातील काही प्रश्न विचारीत,

" तुम्ही कुठले ? तुमचं नाव गाव ? आता पर्यंत तुम्ही किती प्रेते काढली ? या प्रेताचं नाव काय ? "

प्रामाणिक कार्य करणाऱ्या स्वयंसेवकास याच्या एकाही प्रश्नाचं उत्तर देण्याची जरूरत भासत नसे. शेवटी तो प्रश्न विचारणाऱ्याला म्हणे,

" दुरून काय विचारता राव, इथं जवळ येऊन या प्रेताच्या कानात विचारा की त्याचे नाव ! "

तेव्हा विचारणारा आपला चेहरा लपवत तिथून निसटत असे.

सीताराम सेवा ट्रस्ट, लातूर., मांजरा चॅरीटेबल ट्रस्ट लातूर, विवेकानंद ट्रस्ट लातूर, इ. सेवाभावी संस्थांनी वाहनातून जेवण तयार करून आणले होते. तसेच अनेकांनी आपल्याला जमेल तसे खाण्याचे पदार्थ, ब्रेड, खिचडी, भाकरी, दुधाची पाकिटे आणली होती. हे सर्व आपण भूकंपग्रस्ताला द्यावे या

शुद्ध हेतूने काहीजण आले होते. किल्लारीतील शिवाजी चौकात एखाद्या टोकाला उभे राहून भूकंपग्रस्तांना आवाहन करीत. त्यांना खरे भूकंपग्रस्त कोण, हे थोडे माहित असणार. या संधीचा फायदा घेऊन बघ्यांनी लाईनी लावल्या व मिळेल ती मदत लाटली.

प्रशासकीय अधिकारी व मोठी नेते मंडळी भूकंपग्रस्त भागाची पाहणी करून त्यांना कशाप्रकारे मदत करता येईल. या उद्देशाने आलेल्यांना आधी हे बघे लोक घेरून त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार करीत.

एकंदरीत या बघ्यांच्या रूपाने भूकंपग्रस्तावर आलेले एक नवे मानव निर्मित संकट दूर करणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे बघ्यांना पोलिसांनी गावाबाहेर काढले. या गर्दीत काही माणिक-मोतीही असतील. त्यांना या जनसागरात शोधणे शक्य नव्हते.

नातेवाईकांनी अग्नी दिलेल्या प्रेतांचा धूर ठिकठिकाणी निघताना दिसत होता. या धुराने सायंकाळ काळवंडली होती. अनेक बेवारस प्रेते शिवाजी चौकात पडून होती. त्यांना स्वीकारण्यासाठी जवळचा दूरचा असा एकही नातेवाईक आला नाही. या प्रेतांना जास्तवेळ ठेवणे अशक्य होते.

जिवंतपणी प्रत्येकाने आपल्या भोवती विशिष्ट जाती धर्मांच्या भक्कम भिंती उभारल्या होत्या. नियतीला हे मान्य नव्हते. आता या सर्व प्रेतांमध्ये कोण कोण्या जातीचा आहे, कोण कोणत्या धर्मांचा आहे किंवा कोण कोण्या संप्रदायाचा आहे हे ओळखणे शक्य नव्हते. सर्व प्रेतांची मृत्यू ही एकच जात होती.

प्रेते असंख्य होती. प्रत्येकासाठी वेगळा खड्डा करणे किंवा प्रत्येकाला स्वतंत्र जाळणेही शक्य नव्हते. सामूहिक दहन आणि सामूहिक

दफन करावे असे सर्वानुमते ठरले. खड्डा करणे पोलिसांच्या किंवा स्वयंसेवकांच्या आवाक्याबाहेरचे होते. वेळ अत्यंत कमी होता. म्हणून बुल्डोझर मागविण्यात आले व काही वेळातच एक भला मोठा खड्डा खोदण्यात आला. त्याचप्रमाणे अनेक प्रेतांना सामूहिक दहन करण्यासाठी गावाच्या शेजारी शासकीय रूग्णालयाच्या समोरील नाल्यात ट्रकद्वारे लाकडे आणून ती अंथरण्यात आली.

शिवाजी चौकातून टिप्परच्या मदतीने प्रेते स्मशानभूमीकडे नेण्यात आली. एरव्ही वाळू, सिमेंट, दगडांच्या राशी वाहून नेणाऱ्या टिप्पर मधून आज अक्षरशः प्रेतांचे ढीग नेण्यात आले. मृत्यूचा सोहळा यांच्यापैकी कोणाच्याही नशिबात नव्हता. भूकंपाने आज मृत्यूचे गांभीर्य देखील कमी केले होते.

सामूहिक दहन व दफन करताना पावसाने हजेरी लावली. लोकांना वाटले, हा नरसंहार पाहून निसर्ग रडत आहे. पाऊस थांबला. पुन्हा दहनाची आणि दफनाची प्रक्रिया सुरू झाली. ज्याला आकाशाला भिडल्या आणि आकाशातून पाऊस पडायला सुरूवात झाली. सामूहिक चिता विझली. तिकडे प्रेतांवर माती टाकतांना पावसाच्या पाण्याने खड्डा भरला. काम करणाऱ्यांचे हात थांबले. निसर्गापुढे माणूस हतबल झाला. पाऊस थांबला की परत निघालेले सर्व पुन्हा येत, पुन्हा प्रेतांवर माती टाकणे व लाकडे पेटविण्याचा प्रयत्न होत असे. हे सर्व निसर्गाला बघवले नाही. वारंवार पाऊस येतच राहिला. नियती हसत राहिली. रात्र संपली. सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबरच पोलिस आणि स्वयंसेवक स्मशानभूमीत दाखल झाले. खड्ड्यात कोणाचा पाय वर तर कोणाचा हात वर, कोणाचे डोके वर तर

कोणी अर्धवट पुरलेल्या अवस्थेत दिसू लागला. सामूहिक सरणावर जळालेल्या प्रेतात कोणाचा हात शिल्लक राहिला तर कोणाचे डोके. पुन्हा काल सूर्यास्ताच्या वेळी सुरू झालेली प्रक्रिया दुसऱ्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी पार पाडली.



एकाच चीतेवर अनेक प्रेतांना अग्नि देत असताचे दृश्य

# १४

भूकंपग्रस्तांच्या सांत्वनासाठी लोकसभेचे सभापती मा. शिवराज पाटील चाकूरकर, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते श्री. गोपीनाथ मुंढे, तसेच मंत्रिमंडळतील अनेक माननीय मंत्री श्री. पद्मसिंह पाटील, श्री. रामदास आठवले, खा. गोपाळराव पाटील, शिवाजीराव कव्हेकर, विक्रम गोजमगुंडे, आबासाहेब पाटील, मुजीबोद्दीन पटेल, पाशा पटेल, दिलीप पांडे, जितेश चापसी, माने, पप्पू गायकवाड, श्याम बियाणी, शिवाजीराव चालुक्य, रवि गायकवाड, भगवानराव नागरगोजे, बध्धराज नागराळकर, बळवंत जाधव, दिलीप देसाई, दिलीप नाडे, नाना भिसे, अशोकराव निलंगेकर, दिनकर माने, श्रीपतराव काकडे, यादगीर गोडा, श्रीशैल्य उडगे, राज्यातील व देशातील सर्व पक्षांच्या मान्यवर मंडळींनी भेटी दिल्या. तसेच अनेक ज्येष्ठ समाजसेवकांनी भेटी दिल्या.

भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी शासनाच्या अनेक खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या. आपल्या खात्याकडून त्यांना जी मदत करता येईल ती स्वतःच्या देखरेखीखाली केली.

महसूल विभागाच्या कार्यावर स्वतः जिल्हादंडाधिकारी श्री प्रविणसिंग परदेशी हे लक्ष ठेवून होते. त्यांच्या मदतीस अनेक अधिकारी होते. त्यात परिचित असणारे श्री अनिल डिग्गीकर, श्री फुलारी, श्री कमलाकर फंड, श्री शंकरराव भिसे, श्री बाळासाहेब जावळे, श्री काळम पाटील, श्री नितीन गद्रे अनेक कर्मचारी व अधिकारी मदत कार्यात व्यस्त

होते. तसेच जिल्हापरिषदेचे मुख्याधिकारी श्री नगराळेसाहेब त्याचे सहकारी, पंचायत समिती औसाची बि.डी.ओ. श्री. कदम व त्यांचे सहकारी, आरोग्य खात्याचे श्री. डॉ. माले, डॉ. गोजंमगुंडे, डॉ. हरलिया, डॉ. रामा व त्यांचे सहकारी, सार्वजनिक बांधकाम खात्याचे श्री.सु.ल.जाधव व त्यांचे सहकारी, विद्युत मंडळाची श्री. रामगिरे, देशपांडे व भुतडा व त्यांचे सहकारी तसेच कृषी खात्याचे श्री. इंगळे, आर.जे.पाटील, नाना पाटील, व त्या खात्यातील इतर अधिकारी व कर्मचारी, हे आपआपल्या परीने भूकंपग्रस्तांना मदत करीत होते.

पोलिस मदत कार्यावर स्वत: पोलिस महासंचालक, श्री. शिवाजीराव बारावकर, विशेष पोलिस महासंचालक, श्री. सुभाषचंद्र मल्होत्रा, श्री. के. के. कश्यप, श्री. आर. एस. नेगी, पोलिस उपमहानिरीक्षक श्री. घुले, श्री. निग्लोवा, पोलिस अधीक्षक श्री. बिपीन बिहारी, श्री. रामराव पवार, श्री. धिवरे, श्री. प्रभात रंजन, श्री. सोनवणे, श्री. जवाहरसिंग, श्री. अजयकुमार जैन, श्री. प्रदीप रासकर, श्री. गावीत, श्री. राजेंद्र सिंग, श्री. तायडे, श्री. जोशी व होमगार्डसचे समादेशक, एस.आर.पी. चे अधिकारी तसेच ज्ञात अज्ञात इतर अधिकारी लक्ष ठेवून होते.

उस्मानाबाद जिल्ह्यातील भूंकपग्रस्त गावांनाही पोलिस मदतकार्य चालू होते. त्या कार्यावर त्या ठिकाणी विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. अय्यंगार, पोलिस उपमहानिरीक्षक सुप्रकाश चक्रवर्ती, पोलिस अधीक्षक व्ही. डी. मिश्रा, डॉ. भारतभूषण उपाध्याय, श्री. गोणारकर व स्थानिक पोलिस उपनिरीक्षक श्री. जेम्स आंबिलढगे व इतर ज्ञात अज्ञात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मदतकार्यात स्वत:ला वाहून घेतले होते.

भूकंपामुळे गाव उद्ध्वस्त झालं. असंख्य लोक मेले. जे फारच सुदैवी होते. तेवढे जिवंत होते. त्यांच्या जिवंत राहण्यातला आनंद मावळला होता. अनेक जण आपल्याच घराच्या ढिगाऱ्यावर बसून असत. रात्री गावात स्मशान शांतता पसरत असे. कुत्र्यांच्या रडण्यामुळे एक विचित्र असा भयानक सन्नाटा जाणवत असे. रात्री-बे-रात्री गावातून फिरताना चार-दोन लोक शेकोटीभोवती बसलेले दिसत. कुत्र्यांचे रडणे ऐकून म्हणत,

" साहेब, काय हा अपशकून... पुन्हा येणार का हो भूकंप ? "

जाळाच्या लालसर उजेडात त्यांच्या चेहऱ्यावर भीती मला स्पष्ट दिसत होती. अशा भयाण काळोख्यारात्री फिरण्यातच माझी रात्र गेली.

# १८

दुसरा दिवस उजाडला. पण रम्य पहाट उगवली नाही. दुःखाचे सावट सारखेच होते. बाहेर गावावरून बघ्यांचा लोंढा येतच होता. कालच्या आणि आजच्या बघ्यांतील हा फरक माझ्या नजरेतून सुटला नाही. आज येणाऱ्यांच्या हातात वर्तमानपत्रे होती. मी सहज एका सदगृहस्थाच्या हातातील वर्तमान पत्र घेतले. त्यावर नजर टाकली असता.... पहिल्याच पानावरील शीर्षकाने गोंधळून गेलो. "भूकंपात पन्नास हजारावर लोक मृत्यूमुखी" ही बातमी वाचून मी कपाळाला हात लावला. सत्य असत्याच्या अंतरामुळे लोकांमध्ये गैरसमज निर्माण झाला होता.

भूकंप झाल्यावर बरेच जण इतर गावांना निघून गेले होते. ते आज परतले. मला भेटल्यावर त्यांचे दुःख सांगत. दुःख सांगतानाच ते माझी ख्याली खुशहाली विचारीत होते. आपल्या कुटुंबातील हरवलेल्यांना शोधण्यासाठी उपाय विचारू लागले. नियतीच्या उदरात गडप झालेल्यांचा शोध घेणे कठीण होते. हे त्यालाही कळत होते. पण बोलण्यामुळे दुःख हलके होते म्हणतात. म्हणून हा उपचार तेवढा चालू होता.

परतलेला माणूस आपल्या ओळखीतले सर्वजण मेले आहेत असा समज करून जड पावलांनी चालताना एखादा दिसला की उराउरी भेटत.

" मला वाटलं...तू मेलाच काय की ! "

हेच वाक्य दुसराही बोलत असे. आपल्या ओळखीतल्या माणसांची नावे घेऊन कोण कुठे गेला ? कोण मेला ? यावर चर्चा करीत आपला वेळ

घालवीत होते. परागंदा झालेल्यांनाही ते ढिगाऱ्याखाली मेले असावेत असा समज करून घेत. काही प्रसंगी अशी व्यक्ती कोणालातरी कुठेतरी भेटल्याची चर्चा निघत असे.

आप्तस्वकीयांच्या शोधात आलेले काहीजण आपल्या नातेवाईकांचा ठावठिकाणा शोधत असताना पडलेल्या घराखाली त्याचं प्रेतही सापडलं नाही. इकडे तिकडे फिरून खूप शोध घेऊनही प्रत्यक्ष त्याची भेटही होऊ शकली नाही. तो जिवंत आहे की मेला या संभ्रमात कित्येकजण भ्रमिष्टासारखे दिशाहीन फिरताना दिसले.

प्रचंड गर्दीमुळे प्रशासकीय यंत्रणेत अनेक अडचणी निर्माण झाल्या. तसेच मदत कार्यात बघे लोक विनाकारण अडथळे आणत होते. यावर उपाय शोधणे आवश्यक होते. नेमके काय करावे म्हणजे ही गर्दी हटेल. हा विचार सर्वच अधिकाऱ्यांच्या मनात होता. मग वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांना, लोकप्रतिनिधींना एकत्र बोलाविले. सर्वांचा विचारविनिमय झाला. बाहेरून येणारी गर्दी रोकणे हा एकच उपाय ठरू शकेल. यावर सर्वांचे एकमत झाले.

मीटिंगमध्ये ठरल्याप्रमाणे पोलिसांनी औसा टी पॉइन्ट, लामजणा पाटी, किल्लारी पाटी, कोठा पाटी, बेलकुंड पाटी, नागरसोगा पाटी, इ. ठिकाणाहून किल्लारीत प्रवेश करणारे रस्ते होते. हे रस्ते वरील ठिकाणी बंद करून तेथेच येणाऱ्यांची शहानिशा करून भूकंपग्रस्त भागात जाऊ देण्याचे ठरले होते. स्थानिक नागरिक, खरे समाजसेवक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, मान्यवर दैनिकांचे पत्रकार, खरे पुढारी, इत्यादींना चौकशीअंती किल्लारीकडे सोडावे, असे ठरले होते.

उसळलेलं पाणी बांधाला टकरावं तसा किल्लारीला भेट देणाऱ्या लोकांचा लोंढा पोलिसांच्या चेक पोस्टला पाहून थांबत असे. येणाऱ्यात सगळ्याच प्रकारचे लोक होतं. हांसे-नांसे देखील होते. काहीजण आपल्या गाडीतूंन बाहेर उतरून स्वतः बद्दलची व त्यांच्या कार्याबद्दलचा परिचय पोलिसांना देत असत. अशांचा उद्देश लक्षात घेऊन त्यांना किल्लारीला जाण्यास पोलिस सहज परवानगी देत. पण काहीजण पोलिसांच्या प्रश्नांना उत्तर न देता आपण जणू तिसमारखाँ आहोत अशा अविर्भावात बोलत. त्यांचे वागणे पाहून पोलिसांनाही आपले अधिकार वापरावेसे वाटत व ते त्यांना जाऊ देत नव्हते. कांहीजण पोलिसांना म्हणत,

" तुम्ही आम्हाला ओळखल नाही का ? कशाला अडविलेत. आमचा वेळ खराब करून नका,"

असा वितंडवाद घालून संबंधित पोलिस कर्मचारी व अधिकाऱ्यांशी अरेरावीची भाषा करून,

" तुझे नांव काय ? बघून घेऊ तुला."

अशा धमक्या देत व तिथेच आजूबाजूला उभे राहून पोलिसांबद्दल नको ते बोलून स्वतःभोवती गर्दी गोळा करीत व आपण फार मोठे लीडर आहोत असे भासवीत असत.

किल्लारीला भूकंप झाला. ही बातमी वाऱ्यासारखी गावागावात पोहंचली. कृष्णूर ता. बिलोली, जि. नांदेड. येथेही भूकंपात झालेली प्रचंड जीवित हानी कळली. कृष्णूर हे माझे जन्मगांव. मी किल्लारीला नौकरीला आहे हे गावातील सर्वांना माहिती होते. त्यामुळे माझ्या घरचे सर्वजण, माझे बालमित्र व इतर ओळखींचे लोक चिंतेत पडले. आपल्या कोंडीबाचे काय

झाले असेल ! या शंकेमुळे बेचैन झाले व लगेच किल्लारीकडे निघाले.

किल्लारीत येणाऱ्या सर्व वाटा पोलिसांनी रोखलेल्या होत्या. माझे भाऊ, मेव्हणे व इतर नातेवाईकांना औसा टी पॉईन्टवर पोलिसांनी अडविले. माझ्या काळजीने ग्रस्त असलेले माझे नातेवाईक पोलिसांना विनवणी करू लागले,

" माझा भाऊ किल्लारीत पोलिस उपनिरीक्षक आहे. त्याला भेटायला आम्ही आलो आहोत."

त्यांच्या बोलण्यावर टी पॉईन्टवरील पोलिसांनी विश्वास ठेवला नाही. त्यांना चार तास तिथे थांबावं लागलं. बिनतारी संदेशावरून जेव्हा त्यांची खात्री पटली तेव्हा त्यांना किल्लारीकडे जाण्यास परवानगी दिली. प्रश्न व्यवस्थेचा असल्यामुळे नातेवाईक असो की पुढारी, केवळ त्यांना रोखून मूळ भूकंपग्रस्तांना त्रास होऊ न देण्याचा एकमेव उद्देश यामागे होता.

एवढे करूनही बघ्ये लोक वीस ते पंचवीस किलोमीटर चिखल तुडवीत किल्लारीत पोहचत असत. नियोजनाप्रमाणे गर्दी रोखण्याचा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी होऊ शकला नाही. येणारे लोक अनेक युक्त्या लढवीत असत. जीपवाले-कारवाले आपल्या वाहनावर अमूक अमूक सेवाभावी संस्था असे बॅनर लावीत व वर मोठे खोके ठेवून यात मदत साहित्य आहे असे भासवीत. वास्तविक पाहता त्यांचे प्रवेश मिळविण्यासाठी हे निव्वळ नाटक असे. किल्लारीतील एखाद्याचे नाव सांगून त्याचे आम्ही नातेवाईक आहोत असे सांगून प्रवेश मिळवीत असत.

अशा अनेक युक्त्या करून किल्लारीत प्रवेश मिळविलेल्यांनी भूकंपग्रस्तांचे दुःख मोठ्या आनंदाने पाहिले. काहीनी सोबत कॅमेरे देखील

आणले होते. ज्यांचे संबंध कुटुंब ढिगाऱ्याखाली दबले होते अशांचे दुःख टिपण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. किल्लारीचा भूकंप या हेडखाली एखादे छाया चित्र प्रदर्शन भरवून प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्नही केला. दुःखाचा बाजार मांडणारे दलालही पुष्कळ जमले होते. कुप्रवृत्तीच्या लोकांनी तर सहलीसारखा आनंद लुटला.

# १६

अशा बिकट परिस्थितीत एकीकडे मनोरंजन म्हणून फिरणारे लोक तर दुसरीकडे पोलिस, होमगार्ड व सेवाभावी संस्थेचे कार्यकर्ते रात्रीचा दिवस करून ढिगाऱ्या खाली अडकलेल्या लोकांची प्रेतं शोधून काढण्याचा प्रयत्न करीत असत. नातेवाईकांनी दाखवलेल्या जागेवरील दगड माती बाजूला करून प्रेते बाहेर काढून त्यांच्या ताब्यात देत होती. जमिनीत गाडल्या गेलेली प्रेते बाहेर काढण्याचे काम चालू होते. प्रेतांचे नातेवाईक त्यांचा अंत्य संस्कार करण्याच्या विचारात असतानाच दण-दण पाऊस कोसळला. अनपेक्षित आलेला प्रत्येकजण आश्रयाला जाण्यासाठी धावला. पण सगळीच आश्रयस्थाने मोडून पडल्यामुळे सुरक्षित जागा कोणालाही मिळत नव्हती. आपलेच हात डोक्यावर धरून गटागटाने लोक उभे राहिले. पाऊस थांबला, लोक परत आपल्या नातेवाईकांच्या प्रेताकडे धावले. अनेकांना वाटले हा विध्वंस देवालाही बघवत नाही म्हणून तो रडत आहे. ही कल्पना कल्पनेच्या ठिकाणीच राहिली. पुन्हा पाऊस कोसळायला सुरूवात झाली. प्रेते जाग्यावर टाकून लोक इकडे तिकडे धावले.

प्रेतांच्या नशिबात अवहेलना लिहिलेली होती. असेच म्हणावे लागेल. पाऊस थांबल्यावर पाहिले तर अर्धवट गाडलेली प्रेते अधिकच घट्ट बसली. काहीना काढल्यावर सेवाभावी लोक ते प्रेत त्याच्या नातेवाईकाकडे देत. देवानेच त्याला आत्ताच आंघोळ घातली असे समजून नातेवाईक त्या प्रेताला त्याच्याच घराचा लाकूड फाटा गोळा करून तिथेच त्याला अग्नि देत

असत. किती विचित्र योगायोग आहे ! ज्या माणसाने काडीकाडी गोळा करून घर बांधलेले असते, त्याच घराखाली दबून त्याचा मृत्यू व्हावा. त्याच्याच घराच्या किलचनात त्याचे दहन करावे ! किती हे दुर्दैव!

आयुष्यभर काबाडकष्ट करून मिळविलेली सर्व संपत्ती क्षणात जमीनदोस्त झाली होती. जे काही मिळेल ते सावडण्याचे काम काही जण जड अंतःकरणाने करीत होते. जे जिवंत होते त्यांना पुन्हा नव्या जोमाने उभे राहायचे होते, जे झाले त्याला विसरून नव्या आयुष्याची सुरूवात आपल्याला करावीच लागणार. अशी जाणीव जिवंत असणाऱ्यांना होत होती. ज्या ढिगाऱ्याखालून प्रेते शोधून काढली तेच ढिगारे उपसतांना संसारउपयोगी वस्तू रडत रडत बाजूला काढून ठेवणारे अनेकजण ढिगाऱ्याढिगाऱ्यावर दिसत होते. या प्रसंगी बाहेर गावचा कोणी नातेवाईक आलाच तर गळा काढून रडत रडत आपले दुःख कमी करत असे.



उध्वस्त घरातून शिल्लक राहिलेले सामान गोळा करतांनाचे एक चित्र

" देवाने मला उगीच जिवंत ठेवले, मीही भूकंपात मेलो असतो तर फार बरे झाले असते. कुणाची समसम कोणाला राहिली नसती." रडत रडत एखादा चांगल्या स्थितीतला झाडू झटकून बाजूला ठेवीत असे. अशा गोळा केलेल्या वस्तूचे गाठोडे घेऊन ते शिवाजी चौकात ठेवीत व त्यावर बसून आपल्या कोसळलेल्या घराकडे शून्य नजरेने पाहत बसत. अशा अनेक बेघरांना निवाऱ्याची व्यवस्था शासनातर्फे करण्यात आली होती.



**बेचिराख झालेल्या घरातून मोडतोड झालेले सामान घेऊन जाण्यासाठी वाहनांच्या प्रतिक्षेत असलेले एक कुटुंब लेखकाच्या सोबत**

# १७

तंबू व टिनाचे शेड उभारून भूकंपग्रस्तांच्या निवाऱ्याची तात्पुरती व्यवस्था झाली होती. एका तंबूत तीन-चार कुटुंबे राहू लागली. जागा अपुरी. ज्याचे गाठोडे मोठे तेवढी त्याला जागा. आपल्या जागेपुरते आपले स्वतंत्र विश्व निर्माण करण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करीत असे. पडद्यांच्या भिंती बांधून वेगवेगळी घरं एकाच तंबूत बांधली गेली. तंबू म्हणजे चार घराचे गाव होतं. सर्व जाती-धर्मांचे लोक तिथे राहत होते. एखाद्या कुटुंबात खट्ट झाले की आवाज तंबूभर पसरत असे. कोणाला किती स्वास्थ्य लाभत असेल याची चर्चा न केलेली बरी. प्रत्येकाचे मानसिक संतुलन बिघडले होते. तंबूच्या आत आणि बाहेर सारखाच चिखल होता. प्रत्येकजण उध्वस्त झाला होता. यातूनच विकृतीने जन्म घेतला आणि अनेकजण दारूच्या गुत्त्याकडे वळले.



भूकंपग्रस्तासाठी तात्पुरता बांधलेला तंबू

तंबूत किंवा शेडमध्ये राहणाऱ्यांचे पूर्वीचे मानसन्मान शून्य झाले होते. मदतीचे वाहन आल्यावर सगळेजण लाईनीत उभे राहत. 'सुंब जळालं तरी त्याचा पीळ काही उकलत नाही' या उक्तीप्रमाणे त्यापैकी काहीच्या मनातील पीळ कायम होता. अशा लोकांचे मन लाइनमध्ये जाण्यासाठी चटकन तयार होत नसे परंतु निसर्गाने कोणाचाच पीळ कायम ठेवला नाही. भूक सर्वांचीच सारखी असल्यामुळे प्रत्येकालाच भाकरीच्या मागे धावण्यावाचून गत्यंत्तर नव्हते.



**मदत साहित्य घेण्यासाठी रांगेत उभे राहिलेल्या भूकंपग्रस्तांचे एक चित्र**

उद्वस्त किल्लारीकरांच्या अन्न वाटपाच्या रांगेत बाहेरून आलेलेही सामील होत. येथे खाण्यास काही उपलब्ध नसल्यामुळे किंवा काय मिळतं ते बघू हे पाहण्यासाठी रांगेत उभे राहत. प्रत्यक्ष भूकंपग्रस्तांपेक्षा मदत घेणाऱ्यांच्या रांगा जास्त कशा, असा प्रश्ना मदत देणाऱ्यांपुढे उभा राहत

असे. आमच्यावर निसर्गाने अवकृपा केली आणि आमच्यासाठी ज्यांनी अन्न आणले आहे त्यात भागीदार होणारे हे कोण ? असा विचार करून लाईनीत घुसलेल्या उपट शुंभाना बाहेर काढण्यास प्रसंगी धक्काबुक्कीही करीत. नाहीतर त्याच्या बकोटाला धरून त्याला पोलिसाकडे खेचून आणत. याठिकाणी खायला काहीच मिळत नाही म्हणून मी लाईनीत उभा राहिलो किंवा गावातील अमक्याचा मी जवळचा नातेवाईक आहे, म्हणून मी येथे आलो व नाईलाजाने लाईनीत उभा राहिलो. अशी कबुली देत. आम्हीसुद्धा त्याच्याकडे सहानुभूतीने बघून प्रकरण मिटवून टाकीत असत.

मान्यवर लोकांचे किल्लारीला भेट देणे चालूच होते. त्यानिमित्ताने त्यांना भूकंपाबद्दल माहिती देणे. बेचिराख झालेल्या गावात सर्वत्र फिरून गांव दाखविणे, ही जबाबदारी मी स्थानिक पोलिस अधिकारी असल्याने माझ्यावरच असे. थोड्या थोड्या अंतराने नेते मंडळी किंवा अधिकारी येत. त्यामुळे प्रत्येक वेळेला त्यांच्यासोबत गावात जाऊन गाव दाखऊन माहिती देत असे. माहिती सांगताना समोरची व्यक्ती भूकंप कसा झाला ? आवाज कसा आला ? किती लोक मेले ? पूर्वी गावात लोक कसे होते ? इत्यादी त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती सांगत सांगत आम्ही फिरत असू. दिवसातून दहा-पंधरा वेळ तरी माझे फिरणे होत असे. माहितीचा एवढा सराव झाला की कोणीही आलं की टेपसारखी मी माहिती सांगत असे. थोडक्यात सांगायचं म्हणजे भूकंप गाईड म्हणून मी पूरक काम करीत असे.

पोलिस खात्यात आल्यानंतर अशा प्रकाराचे काम करावे लागेल याची अजिबात कल्पना नव्हती. निसर्गानेच मला भूकंप गाईड बनण्याची संधी दिली होती.

# १८

दोन दिवस अथक काम करून आम्ही पुरते दमून गेलो होतो. पर्याय नसल्यामुळे काम करणे भाग होते. रात्री अंग टेकल्या टेकल्या गाढ झोप लागायची. असाच तिसराही दिवस उगवला. थंड झुळूक आल्याने थोडसं बरं वाटलं. परंतु या हवेतून विचित्र असा वास सगळीकडे पसरला होता. कशाची दुर्गंधी होती ही कल्पना कल्पनाही करता आली नाही. आम्ही व्यवस्थेच्या दृष्टीने गावात निघालो. नाकाला रूमाल लावून येताना काही लोक दिसले.

" आपण कशामुळे नाकाला रूमाल लावलात ? "

" सडल्याचा वास घुमतो आहे. "

जमिनीखाली किंवा किलचनाखाली दबलेल्या प्रेतांचा वास सुटला आहे. हे माझ्या लक्षात आले.

आरोग्य खात्याचे लोक प्रेतांची दुर्गंधी कमी करण्याचा औषध फवारून प्रयत्न करीत होते. पण सडलेल्या प्रेतांची दुर्गंधी या औषधालाही दाद देत नव्हती. अशाही कठीण परिस्थितीत स्वयंसेवक, भारतीय जवान होमगार्डस्, नातेवाईक, एन.सी.सी.कॅडेट व पोलिस ती दबलेली प्रेते शोधून काढण्याचा प्रयत्न करीत होते. अनेकांनी वास सहन न झाल्यामुळे नाकाला रूमाल लावले होते. जे उत्साही स्वयंसेवक होते त्यांना मात्र हा वास सहन झाला नाही व ते निघून गेले.

मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी राख सावडण्याची परंपरा आहे.

किल्लारीतील सर्वांचे नातेवाईक बाहेर गावावरून आले होते. आपला नातेवाईक जो किल्लारीचा रहिवाशी आहे. तो जिवंत आहे की मेला याची माहिती नसतानाही दूरदूरचे पाहुणे आले होते. जिवंत असलाच तर आनंदच आणि नसला तर राख सावडू या अपेक्षेने लोक आले होते. जी नातेवाईक मंडळी भूकंप झाल्याझाल्या आली व ज्यांना आपल्या नातेवाईकांची प्रेते सापडली त्यांनी तिथेच मिळेल त्या जागी अग्निसंस्कार केला. तिसऱ्या दिवशी आल्यानंतर त्यांनाच नेमकी जागा सापडत नव्हती. जिकडे तिकडे राखेचेच ढिगारे दिसत होते. फारसी शहानिशा न करता एखाद्या ढिगातली राख उचलून सावडल्याचे समाधान ते मानीत होते.

आपला नातेवाईक मृत पावला हे नक्की आहे परंतु त्याचे दहन नेमके कोठे झाले हे माहीत नाही. अशांनी सामूहिक दहनाच्या ठिकाणी धाव घेतली. ढिगाऱ्यात कोठेतरी आपल्या नातेवाईकांचा अंश अशी मनाशी समजूत करून त्या जागेवरील राख सावडून विधी पूर्ण केला. ह्या सामूहिक राख सावडण्याच्या कार्यक्रमातून ज्या कोणाचे नातेवाईक आले नसतील किंवा ज्यांचा वंशच बुडाला असेल अशा मृत व्यक्तींची राख सावडून धार्मिक विधी आपोआप संपन्न झाला. ह्या ठिकाणी परकेपणा पूर्णपणे लोप पावला होता.

या ठिकाणी काही लोक चिंताग्रस्त होऊन आकाशाकडे खिन्नपणे पाहत स्तब्ध उभे होते, कारण ज्यांना त्यांच्या नातेवाईकाबाबत तो मृत झाला की जिवंत आहे ? की गाव सोडून अन्य ठिकाणी गेला आहे, याचा शोध लागत नसल्याने ही मंडळी कोणताही तर्क करू शकत नव्हती. आता त्याच्या नावाने राख सावडावी अन् जर तो जिवंत असेल तर ! जिवंत पणे

एखाद्याची राख सावडावी, हे अपशकून आहे आणि जर सावडली नाही तर मरणाऱ्याला मोक्ष मिळण्यापासून वंचित ठेवल्यासारखे होईल. अशाप्रकारे मंडळी बेचैन होती.

राख सावडण्याचा विधी पूर्ण होत असतानाच मदतीचे साहित्य घेऊन धडकले. आपल्याला मदत मिळेल की नाही या विचारात लोकांनी शिवाजी चौकात गर्दी केली. त्याचवेळी दूधाचा शासकीय टँकर आला. प्रत्येकजण टँकरमागे धावू लागला. कोणी ग्लास, कोणी तांब्या, कोणी बकीट घेऊन धावले. अनेकजण अघाशीपणे तिथेच दूध पिऊ लागले. ज्यांच्याकडे भांडे नव्हते अशांना आपले दूध पिणे संपले की दुसऱ्यास देत. सर्वत्र आरडाओरड चालू होती. या गलबल्यात बायका मुलांना ओरडून सांगत,

"अरे, चरवी आण लवकर ! दूध संपून जाईल !"

असा एकच गोंधळ सुरू होता. अनेकांनी पिऊन पिऊन वर दूध सोबत घेऊन गेले. असाच प्रकार अनेक मदत वाटपाच्या प्रसंगी होत होता.

अस्थी सावडण्याचा विधी संपल्यामुळे त्यांच्या मनावरील ताण कमी झाला होता. नव्याने उभे राहण्यासाठी आता प्रत्येकाची धडपड चालली होती. ढिगाऱ्यातून मिळेल ते सामान काढून घेऊन पुन्हा नव्याने संसार सुरू करायचा प्रयत्न अनेकजण करीत होते. अनेकांची दुकाने कोसळली. सर्व सामान ढिगाऱ्यात दबले. काहीनी मिळेल तेवढे सुरक्षित सामान काढून त्यावरच नव्याने व्यवसाय सुरू करण्याच्या विचाराने प्रेरित होऊन वस्तू काढू लागले. सामान्यपणे त्यांच्यातून नव्याने जीवन जगण्याची धडपड सर्वत्र दिसू लागली.

शेतकऱ्यांच्या समस्या वेगळ्याच होत्या. प्रसंगी मढे घरात ठेवून

शेतकरी लोक पेरणी चुकवत नाहीत. हाच अनुभव थोड्याफार फरकाने येथे आला. तीन दिवसाच्या दुःखानंतर शेतकरी सर्व दुःख दूर सारून शेताकडे निघाले होते. टुकार मंडळी कोणतेही काम शिरावर न घेता मदत मिळण्याची वाट बघत किल्लारी पाटी ते शिवाजी चौक अशा चकरा मारीत असत. या टुकारात बघेही सामील झालेले होते. काम नसल्यामुळे व काम करण्याची प्रवृत्ती नसल्याने ही मंडळी दारू पिऊन मदतीच्या प्रतिक्षेत दिसत होती.

मदतीचे वाहन येताच काहीजण धावत पुढे जात व ड्रायव्हरला विचारीत,

" काय आणले ?"

" खिचडी आणली... !"

" काय प्रत्येकजण खिचडी आणायलं, काहीतरी पुरीभाजी, तेजदार आणा की !"

ज्यांना पहिल्या दिवशी अन्नाचा कणही खाण्याची इच्छा नव्हती किंवा मिळेल त्यावर समाधान मानले होते. अशापैकीच आज काहीतरी विशेष खायला मिळावे या अपेक्षेने स्पष्ट सांगताना दिसू लागले. त्यांच्या प्रवृत्तीत जाणवलेला बदल विचित्र होता. त्यांच्यातील स्वार्थ बळावला होता. गरजेपेक्षा जास्त मिळविण्यासाठी प्रसंगी भांडण्याची तयारी तो करीत असे.

रिकामटेकड्या लोकांनी व बघ्यांनी एक नवीनच अभियान सुरू केले होते. जी नेते मंडळी किल्लारीत यायची त्यांना गराडा घालून,

" फार बरं झाल साहेब तुम्ही आले, आमच्यावर तर आभाळ कोसळले...! घराघरातून माणसं ढिगाऱ्यात दबून मेले "

हे सांगताना कांहीजण रडण्याचे बेमालूम नाटक करीत होते. असे नाटक

सादर करीत असताना या घोळक्यातून मदिरेचा वास पुढाऱ्यापर्यंत पोहचायचा. त्यांच्या सर्व लक्षात यायचे, मग ते पोलिस अधिकाऱ्याकडे पाहून यांना थोडे बाजूला हटवा असे डोळयानेच सांगत असत. आम्ही पोलिस जेव्हा समोरची गर्दी हटवायचो तेव्हा काहीजण उसळून तक्रार करायचे.

" साहेब, बघा बघा आम्हाला हे पोलिस तुमच्याशी बोलू सुद्धा देत नाहीत."

बोलणाऱ्याला खोटी सहानुभूती दाखवत ते पुढे निघून जात. एखादा स्थानिक चांगला माणूस व्यवस्थित बोलण्याचा प्रयत्न करीत असेल, तर त्याला

" चुप रे...तुला काय कळते ? आम्ही काय खोटं सांगायलो काय ? आम्हीबी इथलेच हौ की...."

खरा बिचारा हिरमुसून जायचा.

भूकंपामुळे अनेकांना भूकंपग्रस्तांना मदत करण्याची भावनिक प्रेरणा निर्माण झाली. जमेल तसे सहकार्य करण्याचा प्रयत्न जिकडे तिकडे दिसू लागला. समजा एखादा दानशूर चादरी घेऊन आला, वाटपास सुरूवात झाली. वाटता वाटता चादरी संपल्या व थोडीफार रांग शिल्लक राहिली, तर तिथे उपस्थित असलेले तळीराम त्या दानशूराचे कौतुक न करता अपशब्द उच्चारून त्याची मानहानी करीत होते.

" अहो मदतच करायची होती तर जरा जास्ती चादरी का नाही आणल्या ? उगीच मदतीच सॉग कशासाठी करता ? "

उदात्त भावनेने आलेल्या दानशूराचा भ्रमनिरास व्हायचा. तळीरामांचा हा एकच उद्योग चालू होता. नशा उतरली की किल्लारीपाटीवर जाऊन पिऊन परत येणे व आलेल्या पाहुण्यांना नको ते बोलणे व नशेचे सातत्य टिकून ठेवत.

## १९

निसर्गाची अवकृपा झालेल्या किल्लारीतील लोकांचे दशावतार अजून संपले नव्हते. ढिगाऱ्याखाली दबून मेलेली, वर काढता काढता भूकंपाचा आवाज येऊन परत काहीतरी अंगावर पडून मेलेले अगणित होते. बाहेरून आलेले स्वयंसेवक ढिगाऱ्यातून प्रेते काढीतच होते. दुर्गंधीची पर्वा न करता त्यांचे कार्य चालू होते. जे जगले वाचले ते मदतीच्या अपेक्षेने चौकात फिरू लागले. ढिगाऱ्याखाली दबलेल्यांचा वास घुमू लागला.

स्वयंसेवकांना नेमकी जागा सापडत नव्हती. मृताचा नातेवाईक एखादी जागा दाखवायचा, स्वयंसेवक तो ढिगारा उपसायचे पण तेथे काहीच न सापडल्याने पुन्हा त्यास विचारायचे,

" रात्री हा कुठे झोपला होता ?"

सगळीच घरे पडल्यामुळे दिशा आणि चिन्हांचा थांगपत्ता नव्हता. रस्ता हरवला होता. कोणती खोली कुठे हे ज्याने घर बांधले त्यालाही कळत नव्हते. दबलेला नातेवाईक बाहेर काढून त्याला सद्‌गती देण्यासाठी तो स्वयंसेवकांना जवळपासची जागा दाखवीत असे. त्याप्रमाणे स्वयंसेवक ढिगारा उपसण्याचे कार्य चालू ठेवत. एखादे वेळेस सापडलेल्या प्रेतांना बाहेर काढता काढता त्याचे सडलेले मासच हातात यायचे. सततच्या पावसामुळे त्याचे शरीर कुजून जायचे. त्याही अवस्थेत सांगाडा का होईना स्वयंसेवक तो बाहेर काढीत व पुन्हा इतराच्या मदतीला धावून जात. कुजलेला देह उचलून नेण्याच्या अवस्थेत रहात नसे. अशावेळी तिथलंच एखादं लाकूड

किंवा नाट जाळून त्यावर त्या कुजलेल्या देहाची हाडं ठेवली जात. हवेत साचलेली दुर्गंधी काही कमी झाली नाही. म्हणून कुठेतरी दबलेल्या प्रेतांचा शोध लावण्यासाठी मुंबईच्या एका सेवाभावी संस्थेने फ्रान्सचे पथक बोलविलं



दगडामातीच्या खिडाऱ्यात प्रेताचा शोध घेत असताना त्यांचे नातेवाईक

त्या पथकात पंधरा ते वीस तज्ञ होते आणि त्यांच्या सोबत चार कुत्र्यांचे प्रशिक्षित श्वान पथक होते. शिवाय प्रेत शोधक यंत्रे होती. हे पथक किल्लारीला पोहचताच त्यांचे कार्य सुरू झाले. तज्ञ व प्रशिक्षित कुत्रे ढिगाऱ्यावर फिरत, काहीजण यंत्र ढिगाऱ्यावरून सर्वत्र फिरवीत, ज्या ठिकाणी खोलवर प्रेत असेल त्याठिकाणी यंत्र नेताच विशिष्ट प्रकारचा ध्वनी यंत्रातून बाहेर पडत असे. काही प्रसंगी प्रशिक्षित कुत्रे नेमकी जागा दाखवित

असत. त्याठिकाणी स्वयंसेवक खोदताच आत प्रेत सापडत असे.

भूकंपाच्या धक्क्याने ज्या ज्या गावात जीवित हानी झाली, त्या त्या गावी हे फ्रान्सचे शोधपथक गेले. भूकंपानंतरच्या चौथ्या दिवशी हे पथक मंगरूळ येथे गेले. तेथे प्रेताचा शोध घेता घेता एका ढिगाऱ्याजवळ आले. ढिगाऱ्याखाली मानवी देह असल्याचे यंत्राने दाखविले. स्वयंसेवकांनी लगेच ढिगारा उपसला. त्यांना एक पलंग सापडला व खालच्या पोकळीत एक लहान मुलगी आढळून आली. तो मृतदेह आहे असे समजून तिला वर काढले. एकाच्या लक्षात आले की तिचे हृदय चालू आहे. त्यावेळी कोणीतरी धावपळ करून डॉक्टरांना आणले. त्यांनीही मुलीला पाहिले.

" मुलगी जिवंत आहे, परंतु तिला शुद्धीवर आणण्यासाठी ताबडतोब लातूरला न्यावे लागेल."

लगेच तिला लातूरला नेण्यात आले. डॉक्टरांनी उपचार करताच ती मुलगी शुद्धीवर आली व उपस्थितांचे चेहरे उजळून निघाले.

' ही मुलगी कोणाची ?"

हा नवा प्रश्न सर्वांच्याच पुढे उभा राहिला. कोणीतरी म्हणाले, ही मुलगी व्यंकट जवळगे नावाच्या व्यक्तीची आहे. वास्तविक भूकंप होऊन चार दिवस लोटले होते. ह्या चार दिवसात निर्सगाचे कोप देखील चालूच होते. ह्या मोठ्या संकटात भले भले वाचू शकले नाहीत. त्याठिकाणी निसर्गाने आपला एक अनोखा असा चमत्कार दाखविला. विना अन्न पाण्याचे चार दिवस लोटल्या नंतरही अडीच वर्षाची मुलगी जिवंत राहिली, हा प्रसंग हजारो लोकांनी पाहिला. त्या सर्वांच्या डोळयात आनंदाश्रू वाहू लागले, प्रत्येकाच मन म्हणू लागलं, 'देव तारी त्यास कोण मारी'

व्यंकट जवळगे हे पण उपचार घेत असल्याचे समजले. शेवटी मुलीचे नाव काय आहे या बाबत गावातील लोकांकडे विचारपूस केली असता त्यापैकी एकाने त्या मुलीचे बारकाईने निरीक्षण करून आठवल्यागत सांगितले, "अरे ही तर व्यंकट जवळगेची राणी आहे."

एकीकडे चार दिवस अन्नपाण्याशिवाय अडीच वर्षाची बालिका वाचते तर दुसरीकडे वाचलेले लोक आपला जीव वाचला म्हणून दुसऱ्या गावी स्थलांतर करण्याच्या दृष्टीने एका खाजगी ट्रकने किल्लारी सोडून जात असताना व ठरलेले गाव जवळ येताच 'काळाने' त्यांना सुरक्षित पोहचू दिले नाही. त्या ट्रकला सोलापूरच्या जवळ अपघात झाला. त्यात ते ठार झाले.

तसेच किल्लारीचे काही लोक उदरनिर्वाहासाठी ठाणे येथे गेले होते. त्यांना वाटले बरं झाल आपण किल्लारी सोडून इकडे आलो, देवानेच बुद्धी दिली. एक आनंद त्यांच्या चेहऱ्यावर तरळून गेला पण तो क्षणिक ठरला. दि. २.१०.९३ रोजी ठाणे-आग्रा या महामार्गावर रसायनाने भरलेला एक ट्रक चालता चालता उलटला व ट्रकातील रसायनाने पेट घेतला. आगीच्या ज्वाला आभाळाला भिडू लागल्या. हवेने ज्वालांना मदत केली आणि बाजूला वसलेली झोपडपट्टी या जाळाने आपल्या कवेत घेतली. क्षणापूर्वी भूकंपातून वाचलो या आनंदात असणारे चौदा किल्लारीकर आगीत जळून मेले. नियतीची अवकृपा किल्लारीकरांवर होती. मृत्यू अटळ होता. फक्त ठिकाण बदलेले. शेवटी नियतीच्या मनात काय आहे हा अनाकलनीय प्रश्न आजपर्यंत अनुत्तरित आहे.

राणी व्यंकट जवळगे ही अडीच वर्षाची मुलगी चार दिवसानंतरही ढिगाऱ्याखालून जिवंत निघाली. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. हा

विषय चर्चेचा झाला. राणीला पाहण्यासाठी प्रचंड गर्दी उसळली. तसेच फ्रान्स मधून आलेल्या पथकाला बघण्यासाठी लोक गर्दी करू लागले. कारण या पथकातील लोकांनी राणीला शोधले होते. पथक या गावावरून त्या गावाला जाऊ लागले. त्या त्या गावातील ढिगाऱ्याखाली दबलेल्या प्रेतांचा शोध त्यांना घ्यायचा होता. भूकंप पाहण्यासाठी येणारे लोक त्या पथकाच्या मागोमाग जाऊन त्यांची कार्याची पद्धत पाहण्याचा प्रयत्न करू लागले. यंत्राने अपेक्षित जागा दाखविल्यानंतर स्वयंसेवक लगेच ढिगारा बाजूला सारून आतले प्रेत बाहेर काढण्याच्या प्रयत्नात लागत असत. त्यांचे कार्य पाहता पाहता आपणही काम केल्याचे दिसावे म्हणून बघे लोक तिथे उपस्थित असलेल्या फोटोग्राफरला आपला फोटो काढण्यासाठी सांगत. मग तो पुढे घुसून एखादा दगड किंवा ढेकूळ हातात घेऊन फोटोग्राफरकडे पाहून आपला फोटो काढण्यासाठी पोज देत असे.

येथे माणसांच्या दोन प्रवृत्ती पाहण्यास मिळाल्या. एकीकडे दुर्गंधीस न जुमानता जीवाचे रान करून प्रेते काढणारी माणुसकीची एक प्रवृत्ती व दुसरीकडे काही न करता प्रसिध्दीसाठी फोटो काढून मिरवणारी दुसरी प्रवृत्ती दिसली.

# २०

'सर्व दुःखावर काळ हा रामबाण उपाय असतो' असे म्हणतात. जसजसे कालचक्र मिनिटाने, तासाने, दिवसाने पुढे पुढे गती घेत होते. तसतसे येथील लोकांच्या वागण्यात बोलण्यात व मनोवृत्तीमध्ये बदल होत चालला होता. काही लोक आता पूर्वीसारखे वागताना, बोलताना दिसत नव्हते, तर ते आता किरकोळ बाबतीत ही चिडचिड, भांडणतंटे करीत. तर काही लोक आपले दुःख बाजूला ठेवून आपआपल्या उद्योगाकडे वळले होते. त्यानंतर काही व्यापारी लातूर, उमरगा, औसा येथे गेले. तर काहींनी 'किल्लारी पाटीवर' मिळेल तेथे आपली दुकाने थाटली. कोसळलेल्या संकटांना तोंड देत देत आपला व्यवहार पूर्वपदावर आणण्यासाठी धडपडत होते. भूकंपानंतर अफवांचे पेव फुटले होते. कधी कोणती अफवा पिकेल याचा नेम नव्हता. अफवेमुळे क्षणात लोकांची मानसिकता बदलत असे. अशावेळी आपण कितीही समजावून सांगितले तरी आपल्याकडे कोणीही लक्ष देत नव्हते. असे विचित्र अनुभव येत असताना एके दिवशी एका नव्या अफवेने जन्म घेतला.

मी नेहमीप्रमाणे पोलिस मदत केंद्रात बसलो होतो. भूकंपातून आता लोक बरेच सावरल्यासारखे दिसत आहेत अशी चर्चा माझ्या सहकाऱ्याबरोबर चालू होती. तेवढ्यात श्री सुदर्शन पाटील मदत केंद्राकडे येताना दिसले. माझे लक्ष त्यांच्याकडे जाताच त्यांनी नमस्कार केला व ते माझ्यासमोर येऊन उभे राहिले. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव वाचून मी त्यांना विचारले,

" काय पाटील आमच्याकडून काही मदत पाहिजे का ?"

" मदतीच काय घेऊन बसलात साहेब... मोठा चमत्कार झाला की हो... "

" काय ?" मी आश्चर्याने त्यांच्याकडे बघत राहिलो.

" साहेब...आज पहाटं शेताकडं गेलो होतो, सहज विहिरीत पाहिलं तर पाणी आटलेलं ! भूकंपाच्या आधी अर्धी विहीर भरलेली होती. एकाएकी पाणी गडपच झालं "

त्यांच्या चेहऱ्यावर गांभीर्याचा भाव तरळून गेला. पाणी नसेल तर भविष्य नाही. अशी काळजीची छटा मला स्पष्ट जाणवली. अधिक जाणून घेण्यासाठी मी त्यांना विचारले,

" अजून काय फरक दिसला ?"

" साहेब... विहिरीच्या आजूबाजूला जमीन फाटलेली दिसली. जिकडे तिकडे भेगाच दिसायल्यात. काय असेल ते असो "

सुदर्शन पाटलाच्या शेतात जाऊन निसर्गाने तिथे कोणता नवा चमत्कार घडवला हे पाहण्यासाठी जायचं मी ठरवलं. सुदर्शन पाटलाने सांगितल्याप्रमाणे हीच गोष्ट मी आमच्या अधिकाऱ्यांच्या कानावर घातली, तेही माझ्याबरोबर लगेच यायला निघाले.

आम्ही तिथे पोहचायच्या आधीच प्रचंड गर्दी जमलेली होती. ते सर्वजण आमच्याकडे बघू लागले. आम्ही थोडं बारकाईने निरीक्षण केलं. तेव्हा सुदर्शन पाटलाने सांगितल्याप्रमाणे जमिनीला भेगा पडल्या होत्या व विहिरीचं पाणी गायब झालं होतं. विहिरीतले मासे कपारीवर मरून पडलेले दिसले.

आम्ही गावात परत आलो. गटागटाने लोक आपआपसात चर्चा करताना दिसले. अनेक भूकंपग्रस्तांचे चेहरे चिंताग्रस्त दिसले. पाटलाच्या

शेतात पडलेल्या भेगावरच सर्वजण आपआपला तर्क-वितर्क लढवू लागले. एकजण म्हणाला, आधीचा भूकंप झाला त्यापेक्षाही हे संकट फार मोठे दिसत आहे. पाटलाच्या शेतातली भेग वाढत वाढत जाईल, कदाचित आपल्या गावापर्यंत येईल. त्यातून लाव्हारस कारंजासारखा उडेल आणि त्यातच जेवढे जिवंत राहिले तेही मरतील !

काहींनी आपल्या तर्कज्ञानाने नवे भविष्य वर्तविण्यासाठी सुदर्शन पाटलाची विहीर भूकंपाचा केंद्र बिंदू ठरवून यापुढेही आपल्याला भूकंपाचे धक्के बसणार असल्याचे तारीखवार वेळापत्रक तयार केले. हे वेळापत्रक कोणीतरी उत्साही माणसाने छापून आणले व पत्रके गावोगाव वाटली. यामुळे ज्या ज्या गावातून भूकंप झाला होता, त्या त्या गावात चिंतेचे सावट पसरले. नेमकेच लोक हिम्मत बांधण्याच्या तयारीत असताना मानसिकदृष्ट्या कोसळताना दिसले. या अफवेमुळे लोक पुन्हा भीतीने बिथरले गेले.

ह्या तथाकथित वेळापत्रकात दर्शविलेल्या दिवशी भूंकप होणार. या भीतीपोटी लोक रात्रभर जागे राहत. ह्यामुळे सर्वत्र बेचैनी वाढली होती. ह्यावर उपाय म्हणून प्रशासनाने वर्तमानपत्रातून व प्रसार माध्यमांतून हे सर्व खोटे आहे असे वैज्ञानिक निर्वाळा देऊन खुलासा केला. लोकांनी ह्या अफवेवर अजिबात विश्वास ठेवू नये असेही जाहीर आवाहन केले. तरीपण लोक प्रशासनावर फारसा विश्वास ठेवत नव्हते.

# २१

भूकंपामुळे किल्लारीतील लोकांचे भवितव्य अंधकारमय झाले होते. रक्ताची नाती ढिगाऱ्याखाली गाडली गेली होती. जवळची माणसं डोळ्यासमोर नष्ट होताना पाहिली व त्यांच्या जगण्याच्या आशाही अंधूक झाल्या होत्या. प्रत्येकजणच भ्रमनिराश होऊन शून्य नजरेने फिरताना दिसे. अशांचे नातेवाईक तिथे येऊन त्यांना सावरण्याचा अनेकांनी यशस्वी प्रयत्न केला. काहीजण भूकंपग्रस्तांच्या सांत्वनासाठी आले आणि तिथलेच झाले. बाहेरून येणाऱ्या मदतीचे ते दावेदार म्हणून वावरू लागले. मदतीच्या लालसेने माणसे बदलल्याचे हे एक उदाहरण होते. काहीजण भूकंपग्रस्तांचे आम्ही जवळचे नातेवाईक आहोत असे भासवीत नवे नाते निर्माण करून आलेल्या मदतीत भागीदार होऊ लागले. बाहेर गावावरून आलेल्या नातेवाईकांनी आपल्याला मानसिक आधार दिल्याचे समाधान भूकंपग्रस्तांना वाटून ते त्यांना तिथच राहण्यासाठी आग्रह धरू लागले. पाहुणा चार दिवसाचा असतो पण येथे तो दीर्घकाळ राहू लागला. कारण त्याला जगण्यासाठी ज्या वस्तू लागत होत्या ते सर्व शासन देत होतं. 'हिंग लगे ना फिटकडी' असाच एकूण प्रकार होता.

कधीतरी पोटाच्या मागे धावत किल्लारीतील अनेक लोक फार पूर्वी किल्लारी सोडून कुठेतरी दूरच्या गावी गेले आणि तिथलेच झाले. त्यांना किल्लारीशी फारसे देणे घेणे देखील उरले नव्हते. भूकंप झाला. त्यात अनेक जण मेले हे कळल्यावर कधीतरी किल्लारी सोडून गेलेल्यांना उमाळा

फुटला व त्यांचे पाय परत किल्लारीकडे वळले. त्यांच्या मनात एकाएकी झालेला बदल आणि किल्लारी बद्दलचे प्रेम उफाळून आल्याचे दिसू लागले. याचे कारण देखील मोठे मजेशीर आहे. ज्या ज्या भागावर आसमानी संकट येतात त्या भागात सरकार मदतीची गंगा नेत असते. या वाहत्या पाण्यात आपणही आपले हात धुऊन घेण्यासाठी दूर गेलेल्यांच्या मनात नव्याने व नकली आपुलकीची भावना निर्माण झाली.

किल्लारीवर भूकंपानंतर प्रेम करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. आजूबाजूच्या गावात, शहरात असणाऱ्या भिकाऱ्यांना देखील किल्लारीला जाण्याचा मोह निर्माण झाला. तेथे शासन व सेवाभावी संस्था नित्य नव्या खाद्य पदार्थांची रेलचेल करीत असे.



सेवाभावी संस्थांनी भूकंपग्रस्तांना घातलेला घास

किल्लारीच्या भूकंपामुळे आजूबाजूच्या शहरातील व खेड्यातील टुकारांना सुवर्णसंधी प्राप्त झाली होती. कुणाचेतरी नातेवाईक आहोत असे भासवीत अनेक निरूद्योगी बेकार व टुकार किल्लारीत आले. अनेक छावण्यांनी त्यांना आश्रय दिला व त्यांच्या पोटाची व्यवस्था लावली. मिळालेल्या मदतीचाही काहीनी व्यापार करून आपला स्वार्थ साधला.

किल्लारीतील प्रचंड नरसंहारामुळे काही टुकारांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या. नवा धंदा त्यांच्या मनात बहरू लागला. त्यांनी किल्लारी कधी पाहिली नव्हती. किल्लारीशी सुतराम संबंधही नव्हता. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे टुकारांनी आपला व्यवसाय सुरू केला होता. ते गावोगाव हिंडून तेथील लोकांना

" आम्ही किल्लारीचे असून भूकंपात आमचं सगळ काही गेलं."

सांगताना डोळ्यात पाणी आणायचे व लोकांची सहानुभूती मिळवायची. ही सहानुभूती पैशाच्या रूपाने त्यांच्या खिशात खुळखुळत राहायची. मुडद्यांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या अशा प्रवृत्ती ठिकठिकाणी दिसू लागल्या.

किल्लारीत आगंतुक व नकली भूकंपग्रस्तांचा एवढा भरणा झाला खरे भूकंपग्रस्त मदतीवाचून वंचित राहू लागले. ही वेदना प्रशासनाच्या लक्षात आली. बोगस भूकंपग्रस्तांना हाकलणेही अवघड होऊन बसले. यामुळे खऱ्यांना पांढरे कार्ड ओळख म्हणून देण्यात आले व असे कार्ड पाहूनच मदत कर्त्याने मदत द्यावी. असे आवाहन केले. यातूनही टग्यांनी युक्त्या लढवल्या व आपले उखळ पांढरे करून घेतले.

# २२

भूकंपामुळे जनजीवन ढवळून निघाले. दुःखाच्या गर्तेत बुडालेली माणसं नव्या उमेदीने उभी राहिली. मात्र त्यांच्या भावभावनात अमुलाग्र असा बदल दिसू लागला. प्रेमळ असणारे उद्दाम झाले. या वृत्तीचे दर्शन मला पदोपदो येऊ लागले.

पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहरावजी भूकंपग्रस्त भागास भेट देण्यासाठी आले होते. त्यांना उतरण्यासाठी किल्लारीच्या जवळ खास हेलीपॅड तयार करण्यात आले होते. हेलीकॅप्टरमधून उतरून ते थेट गावात आले. त्यांनी पायी फिरून पाहणी केली व परत निघाले. त्यावेळेस गावातील काही लोक व तळीराम मंडळी 'श्री. नीळकंठेश्वर' च्या मंदिराजवळ मा. पंतप्रधान येतील ह्या अपेक्षेने थांबली होती पण मा. पंतप्रधान हे तिकडे न जाता परतीच्या प्रवासासाठी कारमध्ये बसले. मी स्थानिक अधिकारी असल्याने त्यांच्या सोबतच होतो. ही गोष्ट लोकांना कळली. मा. पंतप्रधान आम्हाला न भेटता गेलेच कसे... असा जाब विचारण्यासाठी जवळपास शे-पाचशे लोकांचा समुदाय पोलिस चौकीवर आला व त्यांनी अधिकार वाणीने विचारणा केली. या प्रश्नाचे उत्तर पोलिस अधिकाऱ्याच्या आवाक्यावाहेरचे होते. त्यांचा रोष पोलिसांवर जास्त होता. लोकांचा प्रक्षोभ लक्षात घेऊन ही बाब बिनतारी संदेशाद्वारे पोलिस अधीक्षकांना कळविली. या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. पोलिस अधीक्षकांनी मला सांगितले, की तुम्ही लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करा.

त्यांच्या सूचनेप्रमाणे मी तावडतोब पोलिस स्टेशनकडे आलो. पाहतो तर जमाव अनावर झाला होता. परिस्थिती गंभीर वळण घेण्याच्या बेतात असल्याचे दिसून येत होते. त्यांच्या प्रक्षुब्ध भावना पुन्हा मी पोलिस अधिक्षकांना कळविल्या. परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ नये व लोकांची इच्छा प्रंतप्रधानांना भेटण्याची आहे असा संदेश त्यांनी मा. पंतप्रधान मंत्र्यांपर्यंत पोहचविला. शिष्ट-मंडळास भेटण्याची त्यांनी संमती दिल्याचे बिनतारी संदेशावरून मला कळविले.

" नावंदे... कुछ मुख्य लोगोंका डेलीगेशन लेकर हेलिपॅडपर जल्दी आना।"

डिलेगेशनमध्ये दहा-पाच निवडक लोक माझ्याबरोबर यावेत असे जमावाला सांगताच शेकडो हात वर झाले. जो तो मला शिष्टमंडळात घ्या असा आग्रह धरू लागला. शेवटी मी पुढाकार घेऊन निवडक सात-आठ जणांना जीपमध्ये बसवून नेले. नेलेल्या शिष्टमंडळाशी मा.पंतप्रधानांनी भेट दिली. सर्व भूकंपग्रस्तांचे त्यांनी सांत्वन केले व पुढील नियोजित दौऱ्यास निघून गेले. मी नेलेल्या प्रतिनिधींना परत आणून सोडले. त्यांनी मा. पंतप्रधानांशी झालेला संवाद सांगितला, त्यांच्या भावनाही सांगितल्या. जमलेल्या लोकांचे समाधान होऊन लोक पांगले.

भूकंपग्रस्तांच्या सांत्वनासाठी देशातील मोठमोठे नेते येतच होते. असेच एकदा माजी पंतप्रधान श्री. चंद्रशेखरजी किल्लारीस आले. त्यांनी किल्लारी पाटीवर जेथे तात्पुरते निवारे उभारण्यात आलेले होते त्याठिकाणी उपस्थित असलेल्यांची भेट घेतली व नियोजित दौऱ्याप्रमाणे ते 'उमरगा' या गावी जाणार होते. रोडवरील जमलेली लोकांची गर्दी बाजूस हटविण्याचे काम पोलिस अधिकारी व कर्मचारी करीत होते. माणिक लोहार नावाचे

ग्रामपंचायत सदस्य त्याठिकाणी उपस्थित होते. चंद्रशेखरजींना पाहून त्यांच्यातला पुढारी जागृत झाला. मा. चंद्रशेखरजी समोरच्या एका निवाऱ्यातील लोकांशी बातचीत करीत होते. मा. चंद्रशेखरजींनी माझ्या या शेडकडे येऊन मला भेटलेच पाहिजे. मीही या गावचा पुढारी आहे. मला न भेटता ते कसे जातात हेच मी बघतो...असं तो इतरांना सांगत होता. तेवढ्यात पोलिस निरीक्षक श्री डोईजड 'यांनी त्यास बाजूस होण्याबाबत विनंती केली. पण त्याने ऐकले नाही. तो आरडाओरडा करू लागला. त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण तो ऐकतच नव्हता. श्री.डोईजड यांनी ही गोष्ट पोलिस अधिक्षकांना सांगितली. त्यांनी या बाबतीत तेच मला सांगितले. मी जमलेल्या लोकांकडे वळलो. इतर लोक माणिक लोहारला प्रोत्साहन देऊ लागले. ' माणिकराव म्हणतात ते बरोबर आहे.' असे म्हणून त्याच्या बोलण्यास प्रतिसाद देत होते. शेवटी पोलिस अधिकाऱ्यांनी लोकांच्या भावना चंद्रशेखरजींना कळविल्या. मा. चंद्रशेखरजींनी त्या ठिकाणी थांबून लोकांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. त्यांचे सांत्वन केले व नंतरच नियोजित दौऱ्यावर ते निघून गेले. माणिक लोहार फार मोठी लढाई जिंकल्याच्या आविर्भावात आमच्याकडे पाहू लागला.

अशा विचित्र मानवी प्रवृत्तीचा प्रत्यय दररोज येतच होता. असेच एकदा पोलिस आपल्या जीपने चालले असताना किल्लारी वाडीचे बाबू वाडीकर हे गृहस्थ रस्त्यात जीपसमोर आडवे झाले. त्यांना पोलिसांनी बाजूस होण्यास सांगितले. असे सांगताच त्यांनी 'बाजूस हो' ह्या शब्दाचे मोठे भांडवल केले. त्याने जोरजोरात ओरडून गोंधळ घातला.

" आधीच भूकंपात माझा मुलगा मेला, घर पडले, माझ्यावर आभाळ कोसळले, ह्या सर्व दुःखात मी असताना पोलिस मला शिव्या देत आहेत." असा त्याने 'ध' चा 'मा' केला. जवळपास पाचशेच्यावर लोक गोळा झाले. या ठिकाणी लोक गोळा होणे फार कठीण नव्हते, कारण हाकेच्या अंतरावर बरेच लोक मदतीच्या प्रतीक्षेत सतत पाटीवरच बसलेले असत, त्यामुळे थोड्या मोठ्या आवाजात कोण्या न कोण्या निमित्ताने कोणीही आरडाओरड केला तर लोक लगेचच गोळा होत.

लोक गोळा झाले तेव्हा तेथे हजर असलेले पोलिस अधिकारी श्री. डोईजड यांनी त्यांना समजावून सांगून शांततेने पांगवले. जेव्हा मी पोलिस स्टेशनला आलो त्यावेळेस झालेला प्रकार श्री. गावीत साहेब यांनी मला सांगितला. त्यावर आता येतो सर म्हणून मी जीप घेऊन बाबूची चौकशी करण्यासाठी त्याच्या पानटपरीवर गेलो. तो तेथेच होता. मला पाहताच त्याने पुन्हा तीच कॅसेट घासली. त्याच्याशी वितंडवाद न करता "बाबूराव जरा इकडे या" म्हणून त्याला जवळ बोलावून जीपमध्ये टाकले व पोलिस स्टेशनला आणले. लगेच पाहतो तर आमच्या पाठोपाठ गावातील सुमारे हजाराच्या वर लोक पोलिस स्टेशन समोर गोळा झाले. त्यांच्यासमोर बाबूस विचारले,

" अरे... कोणतेही निमित्त नसताना विनाकारण कशाला गोंधळ करून लोक गोळा करतोस !"

त्याला पोलिसी खाक्या दाखविला व चिडून त्यास म्हणालो,

" तुमचे लाड जास्त झाले आहेत... विनाकारण पोलिसांना त्रास देण्याची तुम्हाला सवय लागली. तुम्हाला वाटत असेल की पोलिस आपलं काहीच

करणार नाहीत. पण लक्षात ठेवा यापुढे तुमचे लाड चालणार नाहीत.... खूप झाले आता लाड. असे कोणी केले तर आम्ही त्यास सोडणार नाहीत."
असा सर्वांच्या समोर मी बाबू वाडीकरला पोलिसी दम दिला.

अशा छोट्या मोठ्या अनेक प्रसंगातून नित्याचा अनुभव येत होता त्यामुळे आता लोकांच्या मानसिकतेचा अंदाज व वेध घेण्याचा मला सराव झाला व उद्‌भवणाऱ्या उपद्रवांना सहज आळा घालू लागलो.

तात्पुरत्या उभारलेल्या निवाऱ्यात भूकंपग्रस्त राहू लागले. निवाऱ्यात अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या. अशा समस्यांना घेऊन दररोज नवेच नेतृत्व उदयास येत होते. ते आपला स्वतंत्र गट निर्माण करून रस्ता रोको तर कधी घेराव तर कधी उपोषणासारख्या मार्गाचा अवलंब करून शासनासमोर अडचणी मांडू लागले.

एकदा शेडमधल्या समस्यांना घेऊन देविदास भोसले याने रस्ता रोको आंदोलन केले. थोडा वेळ रस्ता अडवून वाहतूक ठप्प केली. मी व पोलिस उपनिरीक्षक बालाजी इंगेवाडनी सर्वांना रस्ता मोकळा करण्यासाठी वारंवार विनंत्या केल्या परंतु त्याने प्रतिसाद दिला नाही. शेवटी आंदोलन कर्त्यांना आम्ही पोलिस स्टेशनमध्ये घेऊन आलो. यांना पोलिसांनी अटक केली अशी अफवा उठली, म्हणून काही प्रतिष्ठित पोलिस स्टेशनमध्ये येऊन हुज्जत घालीत बसले. त्याचे म्हणणे एवढेच की आमच्या मुलांची काय चूक आहे. त्यांना तात्काळ सोडा. जर आपण त्यांना नाही सोडले तर आम्ही सर्वजण रस्त्यावर बसून राहू.

पूर्वीच्या अनुभवातून एक लक्षात आले होते की जेव्हा केव्हा या भागातून मोठे पुढारी जात. तेव्हा तेव्हा ही मंडळी कोणते न कोणते निमित्त

करून त्यांची भेट व्हावी म्हणून किरकोळ व साध्या प्रकरणाला वेगळे वळण देत असत. त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असे.

त्याच दिवशी लोकसभेचे सभापती मा. शिवराज पाटील चाकूरकर हे हैद्राबादहून लातूरकडे याच रस्त्याने कारने येणार.. अशी पूर्वकल्पना लोकांना असल्याने त्यांनी या मार्गावर परत आंदोलन उभे केले. यामुळे पोलिसांपुढे पुन्हा एक नवी समस्या निर्माण झाली. आंदोलनकर्त्यांना पोलिसांनी व स्थानिक पुढाऱ्यांनी रस्ता मोकळा करण्याबाबत विनंत्या केल्या पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

अशा लहानसहान प्रकरणांमुळे पोलिसांच्या पुढे समस्या निर्माण होत असत. यातून मार्ग काढण्यासाठी बळाचा वापर करणे योग्य ठरत नसे, कारण भूंकपग्रस्त या सदराखाली त्यांच्यावर पोलिसांनी अन्याय केला अशी आरडाओरड संबंध महाराष्ट्रभर होण्याची शक्यता असे. आंदोलनकर्त्यांना रस्त्यावरून बाजूला करण्यासाठी काय उपाय करावा, या विचारात सर्वजण हरवून गेले.

आंदोलनकर्त्यांना मा. शिवराज पाटील चाकूरकर साहेब हे नेमके केव्हा येणार यांची कल्पना नव्हती. त्यांना तिथेच बसवून ठेवण्यासाठी नव्या पुढाऱ्यांनी शेजारच्या हॉटेलमधील टेबल आणून ठेवला. त्यावर उभे राहून एक-एक जण भाषणे देत होता. लोक रस्त्यावर बसल्यामुळे साहजिकच वाहतूक ठप्प झाली. शेवटी मी थोडासा विचार करून त्या जमावात जाऊन मिसळण्याचे ठरविले. दोन तीन पुढाऱ्यांची भाषणे झाल्यावर मीही टेबलवर चढलो. लोकांना शांतपणे माझे मनोगत ऐकण्याची मी विनंती केली. लोक आपआपसांत कुजबुजू लागले. माझ्या येण्यामुळे लोकांच्या मनात

चलबिचल झाली. मी हातवारे करून शांत बसण्यासाठी आवाहन करीतच होतो. त्यावेळेस गर्दीतून काही लोकांचे आवाज येत होते,

" आम्हाला तुमचं काही ऐकायचं नाही... येथून आम्ही उठणार नाही."

दोघा तिघांचे कोरस आवाज माझ्या कानावर आले. मी थोडासा गोंधळून गेलो. पण समोरच्या जमावात काहीजण बोलले" ऐकून तर घ्या, काय म्हणायलेत ते... ऐकायला काय तुमच्या बापाच चाललं होय..." जमाव शांत झाला. मलाही थोडा धीर आला. त्यांना काय सांगायचे याची मी मनात जुळवाजुळव करू लागलो. एवढ्यात एक तळीराम उठला.

" बस झालं... काही सांगू नका साहेब... मला माहीत आहे, तुम्हाला काय सांगायचं ते...आज आम्ही येथून उठणार नाही... बसून रहा रे सगळे "

तळीरामाच्या आदेशाला इतर तळीरामांनी उस्त्फूत प्रतिसाद दिला. पण मी रेटून सांगायचे ठरविले. शांत रहा म्हणून बोलायला सुरूवात केली. वाढू लागलेला आवाज हळूहळू शांत झाला.

" मित्रहो,... तुम्ही सर्व भूकंपग्रस्त आहात. तुमची सगळी दुःखं मी जवळून पाहिली आहेत. तुमच्यावर कोसळलेल्या संकटांची मला पूर्ण माहिती आहे. तुमच्यावर आलेल्या संकटात तुम्हाला होईल तेवढी मदत मी केली आहे."

" होऽ...होऽ... "

अनेकांच्या माना हलत होत्या. मी माझे सांगणे पुढे चालू ठेवले.

" संकटात मी तुमच्या मदतीला धाऊन आलो... माझ्यावर कोणते संकट आले याची तुम्हाला माहिती आहे काय ? मी काय तुमच्या गावचा नाही... नोकरीमुळे तुमच्या गावात आलो... होईल तशी मदत केली... माझ्यावर कोणते संकट आलं याची कोणी

विचारपूस केली का ? "

समोरचा जमाव एकदम शांत झाला. माझ्या परिचयाचे चेहरे खाली झुकले. अनेकजण पायाच्या अंगठ्याने जमीन उकरू लागले. मी पुढे म्हणालो,

" मीही तुमच्यासारखाच आहे. नशीब होतं म्हणून वाचलो... हे सर्वांना ठाऊक आहे. मलाही वाटते की कोणीतरी येऊन मला धीर द्यावा. पण असं कधी झालं का ? तुम्हाला सर्व ठाऊक आहे."

" बरोबर आहे...तुम्ही आमचेच आहेत...ऐकून घ्या रे सगळेजण ! "

एक तळीराम मध्येच उठला आणि स्वतःभोवती गोल फिरत त्याने लोकांना सांगितले आणि नशेत असल्यामुळे पटकन खाली बसला. क्षणभर थांबून मी परत बोलायला सुरूवात केली.

" मित्रहो... मी ही तुमच्यासारखाच आहे. तुमच्यासारखाच मीही पत्राच्या शेडमध्ये राहतो. जे भोग आहेत. ते भोगायलाच पाहिजेत. त्यातून आपली सुटका होणार नाही. अशा वेळी आपण दुसऱ्याला त्रास देण्याचा प्रयत्न करणे योग्य राहील का ?"

" नाही... नाही... " कोरसमध्ये आवाज घुमला.

" आता सांगा... वाहतूक बंद ठेवायची का ? "

" नाही साहेब...नाही साहेब... " म्हणत सगळेजण उठले व रस्ता सोडून बाजूला उभे राहिले. मी स्वतःला धन्य समजलो. त्यांचे आभार मानले आणि म्हणालो,

" मा. शिवराज पाटलांना भेटायचं आहे ना.. ! मी तुमची भेट घालून देतो. काही काळजी करू नका."

मी दिलेल्या आश्वासनावर लोकांनी विश्वास ठेवला. सध्यांकाळी मा.

शिवराजजी पाटील आले. त्यावेळेला मी त्यांची जमलेल्या भूकंपग्रस्तांशी भेट घालून दिली.

संध्याकाळी बंदोबस्त संपल्यानंतर आम्ही थकून भागून पोलिस स्टेशनसमोर येऊन बसलो. रस्ता रोको रद्द झाल्यामुळे आमच्या मनावरचा ताण बराचसा कमी झालेला होता. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. जाधव साहेब हसत हसत म्हणाले,

" नावंदे... तू नोकरी सोड आणि भूकंपग्रस्तांचं पुढारीपण कर ! "

तिथे असलेले सर्वजण मोठ्याने हसले. मीही त्यांच्यात सामील झालो. हसता हसता माझे मन भूतकाळात गेले. मी जेव्हा किल्लारीला आलो होतो. तेव्हा या गावातील लोक पोलिस स्टेशनकडे फिरकतही नसत. साक्षीलासुध्दा माणूस मिळत नसे. अशी ही आपल्याच कामात मग्न असणारी माणसं भूकंपानंतर मात्र पूर्णपणे बदलून गेली. शांतताप्रिय माणसे आंदोलन उभी करून घडीघडीला पोलिस स्टेशनवर हल्ला केल्यासारखे येऊ लागले... असा कोणता बदल यांच्या बुध्दीत झाला. असा एक विचित्र प्रश्न माझ्या समोर नाचू लागला. लोकांची मानसिकता निसर्ग बदलू शकतो या विधानाशी मी हळूहळू सहमत होऊ लागलो.

# २३

भूकंपामुळे सर्व दैंनदिन जीवन विस्कळीत झालेच होते त्याचा परिणाम शालेय शिक्षणावरही झाला. भूकंपामुळे शाळा भुईसपाट झाल्या. मुलांच्या मनावरही भूकंपाचा परिणाम झाला. कोणाचे वडील गेले, कोणाची आई गेली, कोणाचे काका, मामा गेले. प्रत्येक मुलाचे कोणीना कोणी नातेवाईक ढिगाऱ्यात दबून मेला. लहान मुलांच्या नशिबी हा प्रलयकारी भूकंप लिहीलेला होता. आता मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविणे भाग होते. पुढील पिढी सुसंस्कृत करण्याची जवाबदारी शासनाची होती. म्हणून नव्याने कोठेतरी शेडमध्ये शाळा भरू लागल्या. भूकंपातून वाचली जगलेली मुले शाळेत येऊ लागली. काही मुलं अनाथ झाली होती. कोवळया वयात आपल्या डोळ्यासमोर आईबापाचा मृत्यू त्यांनी पाहिला. या धक्यातून सावरणे कठीण होते. अशी मुलं कुठंतरी शुन्यात हरवल्यासारखी एकटक बघत असत.

काही सेवाभावी संस्थांनी अशा अनाथ मुलांना दत्तक घेतले. त्यांना जीवनात समर्थपणे उभे राहण्यासाठी खास शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे नवे जीवन सुरू केले.

काही मुलांचे संगोपन करण्यासाठी त्यांचे नातेवाईक पुढे आले. तर कांही नातेवाईक अशा अनाथांना मिळणाऱ्या मदतीच्या अपेक्षेने व यापुढे सरकार त्यांना ज्या सवलती व सुविधा देईल त्या सर्व आपल्याला मिळतील या अपेक्षेने कांही अनाथ मुलांचे पालकत्व स्विकारल्याचे जाहीर केले होते.

त्यांची दृष्टी जरी प्रेमळ असली तरी मनात मात्र स्वार्थ उफाळून येत होता.

आपल्या महाराष्ट्रात निस्वार्थपणे सेवा करणारी कांही थोर माणसं आजही आहेत. सगरोळीच्या देशमुखांचा या नामावलीत उल्लेख करावासा वाटतो. नांदेड जिल्ह्यातील व बिलोली तालुक्यातील सगरोळी हे गांव आहे. येथे श्री छत्रपती शिक्षण संस्था आहे. श्री देशमुख यांनी आपलं सर्व आयुष्य या संस्थेला आकार देण्यात घालविले आहे. विविध ठिकाणांहून मुले सगरोळीच्या माळरानावर शिक्षण घेण्यासाठी येतात. मुलांच्या साह्याने ही माळराने बहरलेली दिसतात. या संस्थेने किल्लारीतील अनाथ मुलांचे संगोपन करण्याची तयारी दर्शविली होती. अशा मुलांच्या शोधात अध्यक्ष श्री देशमुख किल्लारीस आले. अधिकृत माहिती मिळविण्यासाठी ते पोलिस स्टेशनमध्ये आले. त्यांनी मदत केंद्रात येताच स्वतःचा परिचय देऊन उद्देश सांगितला. मी काहीतरी कामात गुंतलेलो होतो. त्यांचे बोलणे ऐकून ' ठीक आहे ' म्हणत मी वर पाहिले. श्री देशमुखांकडे पाहताच माझे मन भरून आले. लगेच मी खुर्चीवरून उठून नमस्कार करीत म्हणालो,

" सर... बसा ! "

या बोलण्यावर ते आश्चर्यचकित होऊन ठीक आहे म्हणत माझ्या बाजूच्या खुर्चीवर बसले. तेव्हा त्यांना मी सांगितले,

" सर... माझं शिक्षण आपल्या संस्थेत झालं आहे. "

हे ऐकताच त्यांनी स्मितहास्य केले. क्षणभर शांत बसले व नंतर मोठ्या आस्थेने माझी सर्व चौकशी केली. त्यांनी माझ्या पाठीवरून प्रेमाचा हात फिरविला तेव्हा त्यांच्या हाताचा हा मूक स्पर्श मला सर्व काही सांगून गेला. मी कृतकृत्य झालो.

# २४

भूकंपाच्या कराल दाढेत संबंध समाजजीवन भरडले गेले. नियतीने प्रत्येकाच्याच पदरात दुःखाचे माप टाकले होते. मानसिक विकलांग झालेली माणसे पुन्हा उभे राहण्यासाठी धडपडत होती. तर काही पुन्हा पुन्हा कोसळत होती. काही कुटुंबातील तर सर्वच जण भूकंपाने गिळंकृत केले. वंश बुडाला.

कोणाची किती हाणी झाली याची मोजदाद नव्हती. निदान ओळखीच्या लोकांची तरी चौकशी करावी. या उद्देशाने मी शिवाजी चौकात आलो. एका कोपऱ्यावर मुळजे तलाठी उभा असलेला दिसला. मी त्याला बोलावून घेतले.

" काय मुळजे साहेब... अशात भेटच नाही... भूकंपाने फार कहर केला "

" हो साहेब...मी सुध्दा खूपच कामात आहे. मयतांच्या याद्या व लोकांची वित्त हानी याच्या नोंदीतच परेशान आहे."

" नक्की किती मेले माहीत आहे का ? " माझा प्रश्न.

" अजूनतरी नेमका आकडा कळलेला नाही... साहेब तुम्हाला व्यंकट बाबळसुरे माहीत आहेत का ? "

" नाही ! " मी आश्चर्याने उद्‌गारलो व तो काय सांगतो याची वाट पाहू लागलो.

तो एकदम गंभीर झाला आणि सांगू लागला.

" बाबळसुरेच्या घरातलं कोणीही जिवंत राहिलं नाही. "

" अरेच्चा... हे मला माहीतच नव्हतं ! " मी सहज बोललो.

" अजून कोणाचे असे झाले काय ? " मी त्याला विचारले.

" तळणीचे सिद्राम कांबळे यांचेही असेच झाले. वंशाला दिवा राहिला नाही. "

एक क्षणभर विचारात पडलो. माणूस वंशवेल वाढावी म्हणून जिवाचा आटापिटा करीत असतो. आपले नाव दीर्घकाळ पर्यंत रहावे, आपण राहिलो नाही तरी चालेल. असा समज प्रत्येक घराण्यात दृढ झालेला असतो. भांडणात कुणी वंश बुडो, असा साधा शाप जरी दिला तरी कित्येक दिवस माणसाला करमत नाही. पण निसर्गाने असा दीर्घकाळचा विचार करण्याची संधी कुणालाच दिली नाही. धरती डगमगली आणि कित्येकांचे वंश समूळ नष्ट झाले.

मुळजे माझ्या चेहऱ्याकडे शांतपणे पाहतो आहे हे माझ्या लक्षात आले, मी स्वतःला सावरले आणि म्हणालो,

" आले देवाजीच्या मना। तिथे कोणाचे चालेना।। " म्हणत मी त्याचा निरोप घेतला.

२५

भूकंपाच्या धक्क्याने केवळ वित्तहानी व जीवितहानी झाली, असे नाही. तर लोकांच्या मानसिकतेतही प्रचंड बदल झालेला दिसून येत होता. किल्लारीत छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांची बरीच संख्या होती. प्रत्येकाकडे चार-दोन नोकर सतत कामाला असत. दुकानावर काम करून आपला उदरनिर्वाह भागविण्याची या नोकरांची वृत्ती असे. भूकंपानंतर दुकान व दुकानातील माल नष्ट झाला. त्यासोबतच मालक आणि नोकरांचे भावबंधही संपुष्टात आल्यासारखे दिसू लागले. प्रत्येकालाच फिनीक्स व्हायचे होते. पुन्हा जीवनात नवा सूर्योदय आणायचा होता. या उद्देशाने जमेल तशी दुकाने उभी करण्याचा काहींनी प्रयत्न केला. मदतीसाठी नोकरांना बोलावले. पण कोणी आले नाही. मालकानेच नोकराची काम केली व दुकान थाटण्याचा प्रयत्न केला.

उदरनिर्वाहासाठी दुकानावरच्या नोकरांना परत मालकाकडे जाण्याची गरज भासली नाही. आवश्यकतेपेक्षा जास्त मदत मिळाल्याने काम करण्याऐवजी गप्पा मारण्यात वेळ घालविणे त्यांनी पसंद केले होते.

किल्लारी गावात सधन शेतकऱ्यांची संख्या जास्त होती. प्रत्येकाकडेच अनेक शेतमजूर पिढ्यानपिढ्या शेतकऱ्याच्या शेतीवर राबत असत. मजुरांचे शेतमालकाचे संबंध जिव्हाळ्याचे होते. शेतमजुरांच्या मेहनतीमुळे व काळ्या आईच्या आशीर्वादाने सधन शेतकऱ्यांकडे ऐश्वर्य ठायीठायी नाचत होते. भूकंप आला. सगळं संपल. गरीब-श्रीमंत, शेतमालक

शेतमजूर हा भेदही संपला. या धक्क्यातून सावरल्यावर पुन्हा शेतीत नव्या जोमाने जाण्यासाठी शेतकरी तयार झाले. आपल्याकडे असलेल्या शेत मजूरांच्या घरी जाऊन परत कास्त करण्यासाठी सांगू लागले. शेतात कष्ट करण्यापेक्षा दिवसभर मदतीच्या रांगेत बसून जास्त मदत मिळत असे व मोफत जेवणामुळे पोटाचा प्रश्न सुटत असे. तर कष्टाची कामं तरी कशाला करायची या हेतूने शेतमजुरांनी शेतात जायचे नाकारले. सगळेच मार्ग खुंटल्यामुळे शेतकऱ्यांना नाइलाजाने नांगर खांद्यावर घ्यावा लागला.

एका धक्क्याने सर्वच बदलले होते. आदरभावही संपला होता. शेतमालक शेतमजुराला विनंती करू लागले. त्यांच्या विनंतीला धुडकावण्याचे सामर्थ्य त्यांच्यात केवळ भूकंपामुळे आले. कित्येक वर्ष सोबत राहिल्यामुळे एकदम टाळता येत नव्हते म्हणून काहीतरी बहाणा करण्याचे कसब निसर्गाने त्यांच्यात निर्माण झाले. थोडे अंतर मालकासोबत चालून, काहीतरी आठवल्यासारखे करत ते मागे फिरत,

" मालक घरी पाहुणे बसलेत... उद्या येतो " म्हणत मागच्या पावली परतत. शेतमालक त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे शून्य नजरेने बघून शेताची वाट धरत. दुसऱ्या दिवशी परत शेतमालक व मजूर शेताकडे निघत. पुन्हा तोच बहाणा,

"मालक भूकंपात पायाला मार लागला... आत्ता जाऊन पट्टी करून येतो" म्हणत मागच्या पावली निघून जायचा तो परत न येण्यासाठीच. कधी तहसीलदार येणार तर कधी तलाठ्याकडे नाव नोंदवायचे तर कधी पुनर्वसनात जागा मिळणार असे अनेक बहाणे करून शेतमजुरांनी शेतांकडे पाठ फिरवली होती. तर शेतमालक नाइलाजाने श्रमिकाची भूमिका इमाने

इतबारे वठवू लागले. कारण जमिनीतूनच त्यांना गेलेले ऐश्वर्य पुन्हा मिळवायचे होते.

मदतीवर बांडगुळासारखे जीवन जगणाऱ्या लोकांना अलीकडे या ऐदी आयुष्याचा कंटाळा येऊ लागला. त्यांच्या शरीरातील उमेदीना नवे धुमारे फुटू लागले. स्वकष्टाने भाकरी मिळवण्यासाठी प्रत्येकाचे हात व मन नव्याने तयार होऊ लागले.

" साहेब... ही मदत आता कधी बंद होणार हो ? "

" सध्यातरी नाही " असे महसूल अधिकारी सांगत व मदत घ्या म्हणून म्हणत असे. मदतीसाठी चटावलेले मन पांगुळगाड्यासारखे आता मागे मागे राहू लागले.

हवेच्या झोताबरोबर आभाळातले रंग बदलावे तशी भूकंपग्रस्त माणसांची मने पुढे बदलत गेली.

# २६

भूकंपानंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून बंदोबस्तासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिस अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड, राज्य राखीव पोलिस दलाचे जवान आले होते. येथे आल्याआल्या सर्वांनाच कमी अधिक प्रमाणात मुडदे काढण्याचं काम करावं लागलं. भूकंपाग्रस्तांच्या पुनर्वसनात सहकार्य करीत असताना दिवस केव्हा निघून जायचा हे कोणालाही कळत नसे. मात्र रात्र खायला उठत असे. दिवसभर काम करून शरीर थकून जायचं. आपण जमिनीला केव्हा पाठ टेकतो, असे प्रत्येकालाच वाटायचे. पण अंथरूणात पडल्यावर झोप लागत नसे. ते शरीराने किल्लारीत असले तरी त्यांचं मन मात्र आपल्या कुटुंबाकडे धाव घेई. बायकामुलांच्या काळजीने मन पोखरून निघायचं. किल्लारीला आल्यानंतर परत कसलाच निरोप त्याच्यापर्यंत पाठवू शकत नाही. ते आपल्याबद्दल किती काळजीत असतील ! या भूकंपाच्या धामधुमीत आपल्याला तिकडे जाता येत नाही. असे अनेक विचार रात्रभर भंडावून सोडायचे. आपण पोलिस जरी असलो तरी कौटुंबिक जबाबदाऱ्या नाकारून कसे चालेल ? बाजूचा झोपला का ? हे पाहण्यासाठी मान वळवली, तर तोही आपल्या सारखाच टक्क डोळे उघडून वर बघत असलेला. मग एकजण दुसऱ्याला विचारे,

" का रे झोपला नाहीस का ? "

" कसली येते झोप...मी इकडे यायच्या दिवशीच मुलीला बघायला पाहुणे

येणार होते... आले की नाही माहीत नाही. माझ्या घरी लक्ष द्यायला दुसरं आहे कोण ! " सांगता सांगता वर बघत असलेल्या डोळयांतून हळूच एखादा अश्रू उशीवर ओघळत असे. असेच अनेकजण रात्र डोळयात जागवीत असत.

रात्री दूरवर भुंकणाऱ्या कुंत्र्यांचे आवाज सोबतीला असत. झोप लागत नसे. केव्हातरी सकाळी सकाळी डोळा लागलेला असे. सूर्य वर येतो न येतो तोच उठून पुन्हा भूंकपग्रस्तांच्या मदतीसाठी जावे लागत असे. रात्रीचे सगळेच विचार उशीखाली ठेवून दिनचर्येला सुरूवात व्हायची. दिवसभर सारखी धावपळ असे. भूकंपग्रस्तांना निदान एका ठिकाणी बसून तरी जेवता येत असे. तेवढीही उसंत पोलिसांना मिळत नसे. दुसऱ्या क्षणाला कोणता प्रसंग उद्भवणार याची कल्पना नसायची. डोक्यावर सारखे टेन्शन असायचे. मनाला कुठलाच विरंगुळा नसल्यामुळे सर्वांचीच मनं बेचैन होती.

पोलिस अधीक्षक श्री मधुकर गावीत हेही इतर पोलिसांसारखेच सतत काम करीत असत. अधिकारी असून देखील त्यांनी स्वतःला कधी वेगळं मानलं नाही. संध्याकाळी इतर पोलिसांसोबत ते मित्रासारखे राहत असत. पोलिसांच्या व्यथा त्यांना कळायच्या. प्रत्येकाशी शांतपणे बोलून त्यांची व्यथा गाऱ्हाणे, अडचणी ऐकून घेऊन त्यांचे मनोधैर्य वाढविण्याचा ते सतत प्रयत्न करीत असत. रात्री उशीरापर्यंत शेकोटी भोवती साध्या पोलिसांसमवेत वेळ घालवून त्यांच्यात समरस होणारे एक अनोखे व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. मधुकर गावीतांचा उल्लेख करावा लागेल. माणसाला भाकरी इतकेच महत्त्व करमणुकीलाही द्यावे लागते. ही वस्तूस्थिती लक्षात घेऊन गावीतांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना भजन

संतुलन ठेवणे गरजेचे आहे हे लक्षात घेवून श्री. डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी आपल्या कामाशिवाय उरलेल्या वेळात खेडोपाडी जाऊन प्रवचनाद्वारे प्रबोधन केले व लोकांच्या मनातील भूकंपाची भीती व ताण कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.



# २७

ज्यावेळेस एखादे नैसर्गिक संकट समाजावर कोसळते त्यावेळी त्यांच्या मदतीला पहिल्यांदा पोलिस जात असतात. किल्लारी व परिसरातील भूकंपग्रस्तांच्या सेवेत आपलं सर्वस्व विसरून काम करणाऱ्या पोलिसांचे मनोबल वाढविण्याचे काम तत्कालीन विशेष पोलिस महानिरीक्षक श्री सुभाषचंद्र मल्होत्रा साहेब ठिकठिकाणी जाऊन करीत होते. ढिगाऱ्याखालीची प्रेते पोलिस काढीत असताना त्यांना इतर कशाचेही भान राहत नसे. श्री मल्होत्रा साहेब चिखल तुडवीत ठिकठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करीत असत. पोलिस कामात व्यग्र असतानाच कोणीतरी सांगायचे, मल्होत्रा साहेब आले म्हणून. शिरस्त्याप्रमाणे अधिकाऱ्यांना सॅलूट करण्यासाठी पोलिसांची धडपड त्यांच्या लक्षात यायची. तुमचं काम चालू द्या, असं ते डोळ्यांनेच सांगत व अडचणीच्या ठिकाणी जाऊन आपल्या पोलिस शिपायाच्या पाठीवर हात मारून म्हणायचे,

" शाब्बास... चलने दो "

काम करणारा पोलिस साहेबांनी बोललेल्या शब्दामुळे त्याच्या मनावर असलेला सगळा ताण नष्ट व्हायचा व नवी प्रेरणा मिळून तो अधिक काम करू लागला.

मा. सुभाषचंद्र मल्होत्रा साहेब भूकंपग्रस्त भागात फिरत असताना भूकंपग्रस्ताच्या पाठीवर हात फिरवून त्याचे सांत्वन करीत असत. त्याच्या अडीअडचणी लक्षात घेऊन लगेच त्या कमी करण्यासाठी प्रयत्न करीत

असत. जनसामान्यात समरस होण्याची त्यांची पध्दत अनोखी होती. दुःखाची भाषा त्यांना कळत होती. इतरांच्या दुःखात सहजतेने सामील होणारे असे अधिकारी विरळेच.

मा. आर. एस. नेगी साहेब त्यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक, राखीव पोलिस दल या पदावर कार्यरत होते. भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी राखीव पोलिस दलाच्या तुकड्या किल्लारी परिसरात येऊन दाखल झाल्या. यातील जवानांनी ढिगारे उपसण्यात पुढाकार घेतला. श्री नेगी साहेबांच्या कुशल मार्गदर्शनाखाली त्यांचे काम सुरू होते. काम करणाऱ्या जवानांचे मनोधैर्य राखण्यासाठी ते स्वतः पोलिसांजवळ जाऊन प्रोत्साहन देत होते. एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असा त्यांचा उल्लेख करावा लागेल. आपले अधिकार पद विसरून सर्वांत मिसळून वागण्याचे त्यांचे तंत्र होते. स्थानिक अधिकारी म्हणून मी त्यांच्या बरोबर होतो. एकदा भेटी देत देत मंगरूळ गावी आम्ही गेलो असताना पोलिस मदत केंद्राला भेट दिली. तेथे राखीव पोलिस दलाचे जवान काम करून थकवा घालविण्यासाठी चहा पिण्याच्या तयारीत होते. त्यांच्यापैकी एकाने भीतभीत नेगी साहेबांना विचारले,

" साहेब आपण चहा घेणार का ?"

" क्यों नही...आपके साथ जरूर चाय पियेंगें। "

सर्वांचे चेहरे उजळून निघाले. एक फार मोठा अधिकारी आपल्या बरोबर चहा घेत आहे याचा आनंद सर्वांना झाला आणि त्यांनी सर्वांसोबत चहा घेतला.

मा. के. के. कश्यप विशेष पोलिस महानिरीक्षक हे महाराष्ट्र पोलिस ॲकॅडमीचे प्राचार्य होते. किल्लारी परिसरात कोसळलेल्या संकटातील

समाजजीवन सावरण्यासाठी त्यांनी आपल्या ॲकॅडमीतील प्रशिक्षणार्थी पोलिस उपविभागीय अधिकारी व पोलिस उपनिरीक्षकांना प्रत्यक्ष मदत कार्यात सहभागी होण्यासाठी आणले होते. त्यांनी अनेक भूकंपग्रस्त गावांचा दौरा करून नियोजनबध्दरीत्या प्रशिक्षणार्थ्यांच्या तुकड्या निरनिराळ्या गावाला पाठवून मदतकार्यात सहभागी व्हायचा आदेश दिला. त्यांचे सर्वांवर सतत नियंत्रण असे.

मा. एच. बी. घुले साहेब नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक भूकंपग्रस्त भागातील प्रत्येक गावाला भेटी देऊन तिथल्या लोकांची ते आस्थेवाईकपणे चौकशी करीत असत. त्या भागात काम करीत असताना कर्तव्यापेक्षा त्यांच्या ठिकाणी त्यागाची भावना पदोपदी दिसत होती.

मा. निंगलोवा साहेब यांनी पण भूकंपग्रस्तात जाऊन त्यांची दुःखे जाणून घेतली व पोलिस मदत कार्यावर सतत नियंत्रण ठेवले.

मा. बिपीन बिहारी साहेब पोलिस अधीक्षक लातूर यांनी भूकंप झाल्या क्षणापासून ते भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनापर्यंत प्रचंड काम केले. ते या भागात अहोरात्र फिरले. संबंध ढवळून निघालेले समाजजीवन सावरण्यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट केले.

मा. राजेंद्रसिंग अतिरिक्त पोलिस अधीक्षक हे भूकंपग्रस्त भागात सतत तीन महिने वास्तव्याला होते. या काळात ते आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन भूकंपग्रस्तांना सावरण्यासाठी सतत कार्यमग्न असलेले मी पाहिले आहे.

भूकंपग्रस्त भागात राहून भूकंपग्रस्तांना सहकार्य व दिलासा देण्यात मा. अतुलचंद्र कुलकर्णी सहाय्यक पोलिस अधीक्षक, मा. कऱ्हाळे

प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलिस अधिकारी, मा. वायदंडे, मा. दत्ता नरोड पाटील, मा. जाधव साहेब, केशव पाटील, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी व जिल्ह्यातील इतर सर्व पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या जिवाचे रान करून भूकंपग्रस्तांना मदत केली आहे.

याशिवाय या परिसरात बंदोबस्त निमित्ताने आलेले अनेक वरिष्ठ अधिकारी व पोलिस कर्मचारी, होमगार्ड, एस.आर.पी. चे जवान, एन.सी.सी. चे कॅन्डीडेट यांनी देखील भूकंपग्रस्तांचे जीवन पूर्वपदावर आणण्यासाठी आपल्यापरीने अहोरात्र प्रयत्न केले.

पोलिस खात्यासारखेच शासनाच्या महसूल विभाग, आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विद्युत मंडळ, कृषि विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती, शिक्षण खाते, समाज कल्याण खाते व इतर खात्याच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी आपल्यापरीने भूकंपग्रस्तांना मदत केली.

भारतीय सैन्यदल भूकंपपीडित क्षेत्रात येऊन दाखल झाले. त्यांच्यातील अधिकारी व सैनिकांनी मोठमोठे ढिगारे क्षणात उपसून दबलेल्या मुडद्यांना बाहेर काढले. प्रचंड दुर्गंधी येत असताना देखील अशा प्रेतांना अग्नी दिला. एकूण त्यांचे कार्य अतुलनीय होते.

## २८

माणसे विचाराने आणि प्रवृत्तीने वेगवेगळी असतात. प्रत्येकाचे स्वतंत्र विचार असल्यामुळे काही प्रसंगी ते एकत्र येऊ शकत नाहीत. परंतु जेव्हा संकटे येतात त्यावेळी प्रत्येकजण आपली तत्त्वे, आपले विचार बाजूला सारून आपदग्रस्तांना मदत करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करीत असतो. समविचारी संस्था समाजातील सांस्कृतिक ऐक्य टिकविण्यासाठी व संस्कृती संवर्धन करण्यासाठी धडपड करीत असतात. अशा भिन्न संस्थांनी किल्लारी परिसरात येऊन प्रत्येक स्वंयसेवकाने जिवापाड मेहनत केली व मदत कार्यात ते आघाडीवर राहिले. अनेक संस्था भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी व त्यांचे मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी पूर्णवेळ कार्य करीत होत्या.

सीताराम सेवा ट्रस्ट लातूर, विवेकानंद चॅरिटेबल ट्रस्ट लातूर, सुशिलादेवी चॅरिटेबल ट्रस्ट लातूर, स्व. राजीव गांधी चॅरिटेबल ट्रस्ट लातूर, नारी प्रबोधन मंच लातूर, एन.सी.सी. कॅडेट लातूर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बजरंग दल, स्वप्नभूमी केरवाडी, मानसिक आरोग्य संस्था पुणे, भारतीय रेडक्रॉस सोसायटी, प्राईड इंडिया स्पर्श, ख्रिश्चन हॉस्पीटल्स् असोसिएशन ऑफ इंडिया, ॲक्शन ग्रूप अहमदाबाद, महाराष्ट्र आरोग्य मंडळ पुणे, शिशु आधार फॉर चाईल्ड, भारतीय जैन संघटना, राष्ट्र सेवा दल, स्त्री आधार केंद्र पुणे, पृथ्वी प्रकल्प, जनार्थ औरंगाबाद, मानवलोक अंबेजोगाई, लोक कल्याणकारी मंडळ मुरूड, यशवंतराव चव्हाण ॲकेडमी, चर्चेस

ऑक्झीलरी फॉर सोशल ॲक्शन (कासा), स्वामी नारायण ट्रस्ट मुंबई, कीर्तीलाल मेहता ट्रस्ट मुंबई, जनकल्याण समिती, युनिक सर्व्हिस लातूर, महाराष्ट्र सोशल हाऊसिंग ॲण्ड ॲक्शन लीग मुंबई, इपकोर संस्था, रोटरी क्लब, लायन्स क्लब, लियो क्लब, लातूर तथा महाराष्ट्रातील इतर क्लब्स, विवेकानंद ग्राम विकास प्रकल्प, हनुमान व्यायामशाळा अमरावती, श्रीकृष्ण भावनामृत संघ मुंबई, आंतरभारती लातूर, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा मुंबई, रचनात्मक संघर्ष समिती गंगाखेड, तसेच महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील विविध राजकीय पक्षांनी आपआपल्या परीने उध्वस्त जनजीवन सावरण्याचा प्रयत्न केला.

जगातल्या अश्रूंची भाषा ज्यांना कळली आहे असे मा. बाबा आमटे यांनीसुध्दा किल्लारी परिसराला भेट दिली. अंगाखांद्यावर तरूणाई घेऊन फिरणारे बाबा आमटे भूकंपग्रस्तांना मानसिक धक्क्यातून उभे राहण्यासाठी प्रेरणा देत होते. ज्याठिकाणी दुःख आहे त्याठिकाणी बाबांचे संवेदशील मन धावून जाते. त्यांच्या सोबत डॉ. विकास आमटे व आनंदवनातील त्यांचे सर्व कार्यकर्ते या भागात आले होते. श्रमसंस्कार छावणीच्या रूपाने भूकंपपीडिताला स्वतंत्रपणे उभे राहता येईल, अशा प्रकारचे प्रबोधन व संस्कार केंद्र या भागात बरेच दिवस कार्यरत होते.

बाबांचे सहकारी सर्व कुष्टरोगी होते. दुःखाला फेकून देऊन भूकंपग्रस्तांना आधार देण्यासाठी व्यथा वेदना टाकून नव्या जोमाने नवे आकाश निर्माण करा, हा संदेश घेऊन हे कुष्टरोगी आपल्या श्रीमंत आणि निरोगी मनाचे प्रदर्शन करीत होते.

राष्ट्रसंत मुरारी बापूंनी भूकंपग्रस्त भागात प्रवास केला व

किल्लारीला सात दिवस राम कथा सांगितली. भूकंपामुळे मानसिकदृष्ट्या विकलांग झालेली माणसे भ्रामिष्टासारखी वागू लागली. कुठलीच वैचारिक सुसूत्रता त्यांच्यात दिसत नव्हती. सांस्कृतिक मूल्यांची पुनर्रचना होणे गरजेचे होते. भरकटलेली मने रामकथेशी केंद्रित करण्याचा मुरारी बापूंनी यशस्वी प्रयत्न केला. आपल्या रसाळ व मधुर वाणीने एक अध्यात्मिक प्रेरणा देऊन प्रत्येकाचेच मानसिक संतुलन ठेवण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला.

भूकंपग्रस्तांना मानसिक आधार देण्यासाठी मा. शंकररावजी चव्हाण, मा. सोनिया गांधी, मा. लालकृष्ण अडवाणी, मा. मधू दंडवते, मा. बापूसाहेब काळदाते, मा. गोविंदभाई श्रॉफ, मा. मोहन धारिया, मा. बाळासाहेब भारदे, मा. बाळासाहेब ठाकरे, मा. मधुकरराव चौधरी, मा. रामविलास पासवान, मा. प्रमोद महाजन, मा. शरद जोशी, मा. सुनिल दत्त, मा. प्रकाश आंबेडकर, मा. रा.सू. गवई, मा. रामदास आठवले, मा. जाफर शरीफ, मा. सुशिलकुमार शिंदे, मा. ना.स.फरांदे, मा. सूर्यभान वहाडणे, मा. दिवाकर रावते, मा. गोपीनाथ मुंडे, मा. मनोहर जोशी, मा. छगन भुजबळ, मा. बबनराव पाचपुते, मा. अशोकराव चव्हाण, मा. जयसिंगराव गायकवाड, मा. भास्करराव खतगावकर, मा. रामराव आदिक, मा. शिवाजीराव देशमुख, मा. अभयसिंह राजे भोसले, मा. जवाहरलाल दर्डा, मा. मधुकरराव पिचड, मा. रणजित देशमुख, मा. अरूणलाल गुजराथी, मा. हर्षवर्धन देशमुख, मा. सदाशिवराव मंडलिक, मा. माणिकराव ठाकरे, मा. एकनाथ गायकवाड, मा. मोरेश्वर टेंमुर्डे-पाटील, मा. जयवंतराव टिळक, मा. सूर्यकांता पाटील, मा. विलास गुंडेवार, मा. प्रकाश खेडकर, मा. प्रताप पाटील चिखलीकर,

मा. साहेबरावल बारडकर, मा. लक्ष्मणराव ठाबेडे, मा. जयदत्त क्षीरसागर, मा. राजेंद्र दर्डा, मा. विमलताई मुंदडा, मा. बसवराज पाटील, मा. नितीन गडकरी, मा. पवनराजे निबांळकर, मा. जिवनराव गोरे, मा. नागदे, मा. अशोकराव पाटील (केज), मा. दिलीप सोपल, तसेच शासनाच्या विविध खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांनी भूकंपग्रस्त भागात भेटी देऊन भूकंपग्रस्तांचे सांत्वन करून पुनर्वसन कार्यांत आपले योगदान दिले.

## २९

भूकंपामुळे संपूर्ण समाजरचनाच ढवळून निघाली. भूकंपाच्या धक्क्यामुळे कित्येकजण सावरण्याच्या पलीकडे गेले. तर काहींनी पुन्हा आपले मनोधैर्य एकवटून उभे राहण्याचा प्रयत्न केला. कित्येकांनी वेदनेचाही व्यापार केला. कष्टाची भाकरी सोडून अनुदानावर जगण्याचे नवे तंत्र शोधून काढले.

अलीकडे मदतीचा ओघ मंदावला. शासनाने व सेवाभावी संस्थांनी भूकंपग्रस्तांचे पूनर्वसन करण्यासाठी नवे प्रयत्न आरंभिले. भूकंपपीडित गावांच्या परिसरात योग्य अशी मोकळी जागा शोधण्याचे प्रयत्न अधिकारी वर्ग करीत होते. ऐदी झालेल्या टुकारांनी या कामात वारंवार अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी अधिकाऱ्यांच्या अंगावर धाऊन जाण्यासही त्यांनी कमी केले नाही. याच प्रसंगी नव्या नेतृत्वाचाही ठिकठिकाणी उदय होऊ लागला. आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी अशा लोकांनी सामाजिक ऐक्याला तडा दिला. काहीकाही ठिकाणी तर एकाच गावाचे दोन दोन ठिकाणी पुनर्वसन झाले. केवळ आपल्या हट्टापायी अनेकांनी सामाजिक ऐक्याचा बळी दिला.

पूनर्वसनाचे काम सुरू झाले. दूरदूरवरून ठेकेदार मंडळी आली. पूनर्वसनाच्या कामी मजुरांची त्यांना गरज होती. पण मजुरी करण्याचे इथल्या लोकांनी नाकारले. मदतीवर पुष्ट झालेला देह हाती टिकास घ्यायला तयार होत नव्हता. कंत्राटदारांनी बाहेरूनच मजूर आणून प्रत्यक्ष कामाला

सुरूवात केली. बालपणापासूनच मजुरी करणारे व मजुरी करता करता वयस्क झालेले लोक ढिगाऱ्यावर बसून त्या मजुरांकडे पाहात होते. पण स्वतः त्यांनी काम करण्याचे नाकारले होते.

भूकंपापूर्वी अनेकजण साध्या घरात किंवा झोपडीत राहात असत. भूकंपानंतर त्यांचे पुनर्वसन करण्याच्या हेतूनं त्यांना पक्की घरे बांधून देण्याचे ठरले होते. पण त्यांना यात अप्रूप वाटत नव्हतं उलटपक्षी बांधकाम किती निकृष्ट दर्जाचे आहे हे बोलत बोलत प्रामाणिक काम करणाऱ्या इंजिनिअर लोकांचे मनोधैर्य नष्ट करण्याचा गचाळ प्रयत्न करू लागले. अप्रामाणिकपणा प्रामाणिकपणावर सातत्याने मात करताना या समाजात दिसू लागला.

अनेकजण मदतीच्या अपेक्षेने रस्त्याकडे डोळे लाऊन बसत. मदतीची गाडी किंवा एखादा पुढारी गावात आला की त्याला घेराव घालीत. डोळ्यात पाणी आणून म्हणत, " आम्हाला आतापर्यंत कोणतीच मदत मिळाली नाही, असे खोटेच सांगत. "

मदतीच्या ओघामुळे अनेकांनी दारूला जवळ घेतले. काम नसल्यामुळे, फुकट अन्नपाणी मिळत असल्यामुळे त्यांच्यात दारू पिण्याची सवय वाढतच गेली. ज्या ठिकाणी काम चालू असेल त्या ठिकाणी जाऊन विनाकारण बकबक करण्याची त्यांची वृत्ती बळावत होती. तर काही नव्या जोमाने कामाला लागले होते.

किल्लारी पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या गावांना भेटी देण्यासाठी मला जावे लागत असे. एकदा असाच निघालो. रस्त्याने जाताना आजूबाजूचे शेतकरी येऊन आमची जीप अडवून विचारीत,

" काय साहेब... कोणीकडे दौरा निघाला " त्यांच्या बोलण्यात आमच्या बद्दलचा आदर स्पष्ट दिसत असे.

" साहेब... आपले गुऱ्हाळ चालू आहे. थोडासा रस तरी घेऊन जा ! "

" हे बघा..आता मी फार कामात आहे. जमलच तर येताना तुमच्याकडे येतो" .

" नाही साहेब... तुम्ही आताच चला... "

त्याच्या आर्जवामुळे मी आपसूक त्यांच्या मागोमाग गुऱ्हाळाकडे निघत असे. गुऱ्हाळावर जाताच तो आपल्यावर कोसळलेल्या संकटाची उजळणी माझ्या समोर करीत असे.

" साहेब... भूकंपात माझा एकुलता एक मुलगा गेला " सांगता सांगता त्याचे डोळे भरून यायचे.

मीही त्याला खोटे अवसान यावे म्हणून असंच काहीतरी सांगत असे.

" साहेब... काम करण्यात अजिबात लक्ष नाही... कशातच रस वाटत नाही... पण पोटाची खळगी भरण्यासाठी मी हे करीत आहे साहेब. "

समोर आलेला ऊसाच्या रसाचा प्याला पोटात रिचवताना मला त्याची गोडी कशी ती जाणवायची नाही. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा मारून त्याला उसना धीर देत आम्ही जीपकडे वळत असू. पुढे निघाल्यावर कुठेतरी एखाद शेतकरी आमची गाडी अडवीत असे. तो आम्हाला विनंती करायचा,

" भूकंपानंतर सुदैवाने आपली भेट होत आहे... चला साहेब दोन चार द्राक्षे तरी खाऊन जा ! "

त्याची विनंती आम्हाला मोडवत नसे. बागेत गेल्यावर तोही आपले दुःख सांगत असे.

" काय करणार साहेब, हा मळा मला मोप पैसा देणार आहे... पण काय करू खायला कोणीच नाही..." त्याचं दुःख डोळ्यांतून घळघळा वाहत असे. त्याच्यावर कोसळलेल्या संकटाची कल्पना येऊन माझही मन रूदन करू लागे. पण माझ्या डोळ्याच्या कठोर पापण्या अश्रूंना थोपवून धरत असत. त्या श्रीमंत शेतकऱ्याला मी धीराचे चार शब्द सांगून रस्त्याला लागत असे. मग मात्र माझ्या प्रयत्नाला न जुमानता डोळ्यांतले अश्रू टपकून जायचे.

लोकांच्या मनोवृत्तीत होत असलेले गंभीर बदल माझ्या नजरेतून सुटले नाहीत. काम करणारा माणूस आळसी झाला. मिळालेल्या मदतीतून अनेकजण दारूच्या आहारी गेले, काहींनी जीपा घेतल्या, काहींनी टी.व्ही. व नव्या घड्याळी तर काहीजण मस्तवाल होऊन बाहेरख्याली झाले. आपल्याजवळ असलेल्या पैशात वाढ करण्यासाठी अनेकांनी पत्त्याचे डाव मांडले.

ग्राम दैवत स्वयंभू नीळकंठेश्वराचा अनेकांना विसर पडला. सुखासीन झालेला भूकंपग्रस्त माणूस षड्रिपूंच्या राज्यात आस्तेकदम प्रवेश करता झाला.

भूकंपामुळे बदललेली काही माणसे अलीकडे कुणालाच भीत नव्हती. केवळ मदत मिळविण्यासाठी त्यांचा आटापिटा चाले. मी जर गाडी घेऊन गावात गेलो तर असाच कुणीतरी मला अडवून विचारायचा,

" काय साहेब... फार गडबडीत दिसता... आज कोण येणार ? "

" तसं काहीही नाही... सहजच चाललो " आणि मी माझ्या कामासाठी निघून जात असे. लोक असे येणाऱ्याच्या पत्त्यावर का राहतात...? कळत नव्हते. थोडं पुढे जाताच एखादा तळीराम गाडीच्या समोर आडवा यायचा. आता हा काहीतरी म्हणणार हे माझ्या लक्षात यायचे. त्याच्या अवस्थेकडे पाहून उगीच मनात तुकारामाच्या ओवीतील काही शब्द आठवायचे.

' बोले तैसा चाले।'

या नियमात खरं म्हणजे हे तळीराम बसतात. बोलतातही अडखळत आणि चालतातही अडखळत. मग तो माझ्यासमोर येऊन हात जोडून बोलत असे.

" फार वाईट झालं साहेब " म्हणत तो गळयात पडायचाच बाकी राहत

असे.

मी सुद्धा सवयीप्रमाणे

" जाऊ द्या हो... झालं गेल विसरून जा !" त्याला दिलासा देत असे.

" बरं साहेब... राम राम " फारच विनम्र होऊन झोकांड्या खात निघून जात असे. जाता जाता त्याची बडबड जीपच्या घरघरीतही माझ्या कानावर येत असे.

" अरे आता पुन्हा भूकंप होणार आहे... राहिले साहिले मरणार आहेत... कशाला ठेवता पैसा अडका... खा-पिया... मजा करा. "



# ३१

कामाच्या व्यापात दिवस कधी निघून गेले कळलेच नाही. किल्लारीचे समाजजीवन थोडे फार स्थिर झाले होते. बाहेर गावावरून बंदोबस्तासाठी आलेले पोलिस कर्मचारी, होमगार्डस् व अधिकारी वर्ग परत निघून गेले. सेवाभावी संस्थांचे फार कमी लोक राहिले होते. पुढाऱ्यांची ये-जा सुध्दा रोडावली होती. बघ्यांनी व टग्यांनी इकडे यायचे टाळले होते. आता उरलो फक्त आम्ही स्थानिक पोलिस व मूळ गावकरी. आमच्या सोबत खांद्याला खांदा लाऊन काम करणारे व नव्याने मित्र झालेले अधिकारी निघून गेल्यामुळे मला अजिबात करमत नव्हते. गर्दी संपल्यामुळे एक भयाण पोकळी निर्माण झाल्याचा भास मला होत असे. गजबजलेले तंबू आता ओस पडले होते.

मी सगळा वेळ पोलिस ठाण्यावर किंवा पेट्रोलिंग मध्ये घालवीत असे. मला घर असे राहिलेच नव्हते. कारण कुटुंब पूर्वीच रोहा जिल्हा रायगड येथे गेले होते. तिथे माझे सासरे राहत असत.

वेळ जात नसल्यामुळे पोलिस स्टेशनसमोर बसून रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यास मी बोलावून घेत असे. त्याला बोलतं करून त्याच्या व्यथा वेदना किंवा गमती जमती ऐकून माझ्या मनाची करमणूक करून घेत असे. काही वेळेला असा बोलवलेला पाहुणा, एका मिनीटात येतो साहेब म्हणून तिकडून तिकडेच निघून जात असे.

एखाद्या वेळेस गप्पा मारायला कोणीच भेटत नसे. मग मी तिथे हजर असणाऱ्या पोलिस शिपायाबरोबर गप्पा मारीत बसे. माझ्यामुळे त्यांना

इकडे तिकडे फिरता सुध्दा येत नसे. मग कोणीतरी म्हणे,

"साहेब...पुष्कळ वेळ झाला, प्रभूने केव्हांच डबा नेऊन ठेवला...जेऊन घ्या साहेब !"

ते असं का म्हणतात हे माझ्या लक्षात यायचं.

" मग असं करा तुमच्यापैकी एकजण जाऊन डबा घेऊन या... मग आपण सगळे मिळून इथंच जेवू. " मी असे म्हणताच त्यांचे चेहरे हिरमुसले होत व अत्यंत नाराजीच्या स्वरात,

" ठीक आहे साहेब..." म्हणत.

डबा आणल्यावर इतर सुध्दा आपआपल्या शिदोऱ्या आणत. एकच गोपाल काला करून आम्ही सर्वजण गप्पा मारत मारत जेवण करीत असू.

भूकंप झाल्यावर कामाचा ताण प्रचंड होता. रात्री टेबलावर अंग टाकल्याबरोबर झोप लागत असे. अधूनमधून उठून शिवाजी चौकातून चक्कर मारून येत असू. नंतर नंतर जीपमधील अपुऱ्या जागेत सुध्दा पडल्या पडल्या झोप लागत असे. बाहेर पाऊस पडत असतांना पाय भिजून जात किंवा टपातून रात्रभर पाणी टपटपत राही. पण थकलेल्या शरीराला हे काहीही जाणवत नसे.

आता टेन्ट मोकळे झाले होते. अनेक कॉटस् होत्या. गाद्या, कूलर सर्व काही होते. कामाचा ताणही कमी झाला होता. अवतीभोवतीची गर्दी निघून गेली होती. जिकडे तिकडे शांत होते. पण या निर्माण झालेल्या पोकळीमुळे मन मात्र बेचैन होते. रात्री झोपण्याचा प्रयत्न करून देखील डोळ्याला डोळा लागत नसे. रात्रभर कुटुंबाच्या आठवणी, किल्लारीतील निसर्गाचे तांडव डोळ्यासमोर येत असे.

## ३२

जिवंत राहिलेले लोक कोसळलेले जीवन सावरण्यासाठी नव्याने प्रयत्न करू लागले. शेतकरी आपल्या शेतावर राहायला गेले व काहीजण आपल्या ओळखीच्या शेतकऱ्याकडे राहायला गेले, तर काही लोक शासनाने उभारलेल्या शेडमध्ये राहायला गेले.

शासनातर्फे पन्नास बाय साडे सतराचे पत्राचे शेड मारून त्यात प्रत्येक कुटुंबाला दहा बाय साडे सत्तराचे एक शेड दिले जात असे. त्यात पार्टीशन करून दोन खोल्याचा आकार आणला होता. नियतीने त्यांना एवढ्या लहान खोल्यात राहायला भाग पाडले होते. भूकंपातून शिल्लक राहिलेल्या आपल्या संसारोपयोगी वस्तू आणल्या होत्या. जुन्या वस्तू सोबत मदत रूपाने मिळालेल्या नवीन वस्तूमुळे बरीच जागा आटली होती. बैठक, स्वयंपाकघर, ओसरी हे सर्व दहा बाय साडे सतराच्या शेडमध्ये कल्पनेच्या भिंती उभारून केले होते.

शेडचे वाटप करताना शासनाने सर्वधर्मसमभावाचे तत्व स्वीकारले होते. तिथे भूकंपग्रस्त ही एकच जात मानून शेडचे वाटप केले होते. भिन्न स्वरूपाच्या चालीरीती, पंथ, जाती, संस्कृती एकमेकांच्या शेजारी नांदत होते. भिन्न संस्कृतीमुळे व खाण्यापिण्याच्या सवयीमुळे एक दुसऱ्याचा द्वेष करू लागला. यातूनच ते चिडखोर झाले. किरकोळ तक्रारीचे रूपांतर भांडणात व्हायचे. कधी कधी शेजारी शेजारी एक दुसऱ्याच्या अंगावर धाऊन जाऊ लागले.

किल्लारी गावात भक्कम भिंतीचे वाडे होते. वाडयात अनेक खोल्या होत्या. समोर मागे अंगणं होती. शेजाऱ्यांना बोलायचे असेल तर बाहेर येऊनच बोलावे लागे. भूकंपामुळे घर आणि वाडा संस्कृती ढिगाऱ्यात लोप पावली व ही नवी शेडसंस्कृती उदयाला आली.

शेजारी शेजारी भिन्न संस्कृती नांदू लागल्या. एका शेडमध्ये पंढरीचा वारकरी असे तर त्याच्या शेजारी मासे तळणारा असे. अशा प्रसंगी वारकरी माणूस आपल्या शेजाऱ्याला बोधामृत पाजण्याचा प्रयत्न करी. पण तो शेजारी म्हणायचा, " तुझ्यासाठी मी काय माझे पोट मारू... तुला वास सहन होत नसेल तर दुसरीकडे निघून जा " पांडुरंग...पांडुरंग... म्हणत आपल्या कपाळावर हात मारत वारकरी आत निघून जात असे. सज्जनाच्या शेजारी तळीराम राहू लागला. रात्रभर आरडाओरडा करून शेजाऱ्याला झोप लागू देत नसे. मनात आलं तर रात्रभर टिन बडवीत राही. सहनशीलता संपल्यावर सज्जन त्याला विनंती करे,

" अहो थोडं शांत रहा... झोपा आता "

" मला झोप म्हणतोस... तू काय आमचा मालक आहेस... मी झोपेल नाहीतर रात्रभर रडेल... तुला काय करायचं ? "

बिचारा सज्जन गुपचूप आत जाऊन अंथरूणावर पडत असे.

तळीरामाचा अतिरेक झाला तर कधीतरी सज्जनांपैकी एखादा येऊन मला सांगत असे. मग मी त्या तळीरामाला ठाण्यावर बोलावून घेत असे. आल्या बरोबर तो विचारे,

" काय साहेब... कशाला बोलविलं ?"

" का बे मुर्खा... पिऊन बोंबा मारून लोकांना का त्रास देतोस ?"

" याच्यासाठी बोलविलं...? रात्री जरा जास्ती झाली होती... आज कमी पितो...चुकलो साहेब " म्हणत निघून जात असे.

शेड संस्कृतीत पतिव्रतेच्या शेजारी व्यभिचारी स्त्री राहू लागली. तिच्या घरचे हसणे खिदळणे ऐकून पतिव्रता तिला म्हणायची,

" अगं... तुला जी काही थेरं करायचीत ती दुसरीकडे जाऊन कर... इथं आम्हाला का त्रास देतेस ?"

" मी जाईना... तुला बघू वाटत नसंल तर तूच जा तिकडं... लई पतिव्रता लागून गेलीस मोठी...! " पतिव्रता हे ऐकून स्वतःच्याच तोंडावर तोबा तोबा करत आपल्या शेडमध्ये निघून जायची.

शेडसंस्कृतीत सगळी घरे व सगळ्या घराची दारे सारखीच होती. दिवसादेखील शोधून सापडणे कठीण होते. एखाद्या घरात एखादी तरूण बाई एकटीच राहत असेल तर तिला हेरण्यासाठी रात्री एखादा कुप्रवृत्तीचा माणूस तिच्या दारावर टकटक करायचा. दार उघडताच तो म्हणे,

"अरे बा... मला वाटलं माझच घर आहे काय की... बरं कसं चाललं बाई" समोरची बाई रागाने दरवाजा आपटून बंद करी. येथे आपली दाळ शिजत नाही समजून तो आपल्या घराकडे निघून जात असे.

शेडसंस्कृतीत भिन्न प्रकृत्तीचे व प्रवृत्तीचे कुटुंब शेजारी शेजारी राहत असले तरी त्यांच्यात घरोबा निर्माण झाला नाही. पुरेशी ओळख नसल्यामुळे त्या घरातील स्त्रिया एकमेकींना बोलत नसत. त्यांच्यातील मनमोकळेपणा हरवला होता. लहानसहान कारणावरून या बाया मात्र एकमेकींना शिव्याशाप देत भांडत असत. अशी भांडणं गल्लीवाल्यांचा सिनेमा व्हायची.

शेडसंस्कृतीत नवरा बायकोतला संवाद कमी झाला होता. आपण

बोललेलं शेजारच्याला ऐकू जाते म्हणून प्रत्येक कुटुंबातला प्रत्येक व्यक्ती अगदी दबक्या आवाजात व मोजक्या शब्दात एकमेकांशी बोलत असे. सूनेला सासूची तक्रार नवऱ्याजवळ करता येत नव्हती. तोंडून शब्द निघाला की तो घरांच्या भिंती ओलांडून पलीकडे जात असे. एकाच शेडमध्ये अनेकांचे संसार थाटले होते.

काळ्या जमिनीवर शेड उभारून शक्य त्या ठिकाणी शासनाने रस्ते देखील बांधले होते. पण पावसाच्या रिपरिपीत रस्त्याच्या बाजूला पूर्ण मैदानावर चिखलच चिखल होत असे. बाहेरून येणाऱ्यांना चपला जोडे हातात घेऊन यावे लागे. तळीराम येता येता चिखलात घसरून पडत. नखशिखांत चिखलाने माखलेले तळीराम कसेतरी आपल्या घरापर्यंत पोहचत. दारावर टकटक करताच त्याची पत्नी दार उघडून बघे. हे कोण भूत समजून फटकन दार लाऊन घेई.

" अगं... मी तुझा नवरा आहो "

त्याचा आवाज ओळखून ती परत दार उघडे,

" अहो तुम्ही आहेत का ? चिखलात लोळून आलात का... जरा कमी ढोसायची होती...इथच थांबा बकेट आणते "


मग तो तिथच दारासमोर खाली बसायचा व ती त्याच्या अंगावर तीन-चार बकेटा पाणी टाकायची, तेव्हा त्याचा चेहरा तिला स्पष्ट दिसायचा. डोक्यावर पाणी पडल्यामुळे त्याची दारू थोडी फार उतरायची. हे त्याच्या लक्षात येताच तो घरात न येता आल्या पावली परत चिखल तुडवीत गुत्त्याकडे जात असे. त्याची बायको त्याला दहा-पाच शिव्या देऊन धाडकन दरवाजा लावून टाकी, या प्रसंगामुळे शेजाऱ्या-पाजाऱ्यांची फुकट करमणूक होत असे.

उन्हाळ्यात सूर्य दाही दिशाने तळपत असे. टिन शेडमध्ये राहणाऱ्यांच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागत. शेडमध्ये राहणे नकोसे होऊन बसले. पण नाइलाज होता. काहीनी कूलर पंखे आणले. तरीपण हवेतील उष्णता थोडी देखील कमी होत नसे. सूर्याची किरणे थोपविण्यासाठी अनेकांनी आपल्या शेडवर कडबा, तुराट्या व इतर पाळापाचोळा टाकला होता. तरीही उष्णता कमी होत नव्हती. शेडमध्ये राहणे म्हणजे भट्टीजवळ सतत बसून राहिल्यासारखे होते. नशिबाला दोष देत एक-एक दिवस मागे टाकीत होते.

मे जूनच्या महिन्यात वारा गती घेत होता, बावटळी सुटायच्या. धुळीच्या लाटा आकाशापर्यंत पोहचायच्या. पत्रांच्या खणखणाटात नवी भीती जन्माला यायची. आपला जीव मुठीत घेऊन देवाचा धावा करीत, शेडमध्ये कुठेतरी कोपऱ्यात दाटीवाटीने बसत. वारा घुमत घुमत यायचा, शेडवरील पत्रे पतंगासारखे आभाळात भिरकावले जायचे. अनेकांच्या नजरा वर उडणाऱ्या पत्रावर खिळत असत. वारा थांबल्यावर आतली माणसे बाहेर येत. पत्रांच्या शोधात इकडे तिकडे धावत. ज्याच्या हाती पत्तर लागे तो त्याचा मालक होई. ' जिसकी लाठी उसकी भैस ' या म्हणीप्रमाणे दांडग्या व आडमुठांनी इतरांचीही पत्रे नेली. ना दाद ना फिर्याद। अनेकांची छप्परं गेल्यामुळे ते तशीच रात्र काढत व दुसऱ्या दिवशी महसूल खात्याकडे पुन्हा पत्रे मिळण्यासाठी चक्करा मारीत. शेवटी त्यास यश मिळत असे. पक्षी आपलं घरटं बांधण्यासाठी जशी एक-एक काडी गोळा करतो तसा हा भूकंपग्रस्त एक-एक पत्तर डोक्यावरून आणून छप्पर तयार करीत असे.

निवारा ही माणसाची अंतिम गरज आहे. झोपड्यातील संसार

आणि राजवाड्यातील संसार सारखाच असतो. फक्त निवाऱ्यांचा आकार व वैभवात फरक असतो. भूकंपापूर्वी वाडा संस्कृतीत निवांत संसार करणाऱ्यांना भूकंपानंतर नियतीने शेडसंस्कृतीत आणून सोडले. नियतीच्या इशाऱ्यावर नाचणाऱ्या माणसाने प्रसंगाप्रमाणे राहायचे ठरवून प्रत्येकजण दहा बाय साडे सत्तराच्या शेडमध्ये आपले विश्व सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करू लागला. शेवटी कुटुंब आणि निवारा महत्त्वाचा असतो, हेच खरे.



# ३३

नियतीचा खेळ मोठा विचित्र असतो. रावाचा रंक आणि रंकाचा राव करणे तिला सहज जमते. ज्यांनी काडीकाडी जमवून आपली आर्थिक परिस्थिती सुधारली होती. भूकंपाच्या एका धक्क्याने त्यांना जमीनदोस्त केले होते. अनेक कुटुंबे नामशेष झाली. तर अनेकांच्या घरातील दोन-चार-सहा अशी माणसं ढिगाऱ्यात दबून मेली. दुःखाचा डोंगर डोक्यावर घेऊन नव्याने उभे राहण्यासाठी जिवंत राहिलेल्यांचा प्रयत्न चालू होता. भूकंपाच्या धक्क्यानंतर गाव सोडून शेडमध्ये आलेली माणसं स्वतःला व आपल्या कुटुंबाला स्थिर करण्याच्या सतत विचारात असे.

निसर्गाच्या अवकृपेमुळे बेघर झालेल्यांना घर आणि नव्याने संसार उभा करण्यासाठी शासकीय मदत मिळू लागली. शासनाने भूकंपग्रस्तांचे दुःख वाटून घेतले. ज्या घरातील एक व्यक्ती मृत पावली असेल, अशांना पंचवीस हजार रुपये रोख व पंचवीस हजार रुपयाची किसान विकास पत्रे देण्यात आली. ज्यांच्या घरात जास्त माणसं मेली त्यांना देखील वरील प्रमाणेच सहकार्य करण्यात आले.

नियतीने लोकांना उजाड केले व शासनाने त्यांना आबाद केले. ज्यांनी कधी फार पैसा पाहिला नाही. अशांच्या पदरात लाख लाख रूपये पडू लागले. पैसा दिसू लागल्याने भूकंपग्रस्तांच्या वागण्यात व बोलण्यात फरक जाणवू लागला. ज्यांच्या घरात जास्त माणसे मेली तो सर्वांत श्रीमंत म्हणून गणल्या जाऊ लागला. आता या पैशाचा विनियोग कसा करायचा. एक नवा

प्रश्न सर्वांच्याच समोर उभा होता. अनेकांनी मिळालेल्या मदतीवर आपली शेती सुधारली तर कांहीनी आपला जुना व्यापार परत सुरू केला. काहीनी नव्याने छोटे-मोठे उद्योगधंदे सुरू करून संसार सांभाळायला सुरूवात केली. अनेकांनी मिळालेल्या मदतरूपी पैशाचे व्यवस्थित नियोजन न करता आलेला पैसा वायफळ खर्चीला. काहीनी आलेला प्रचंड पैसा दारूच्या प्याल्यात ओतला.

एकदा संध्याकाळी एक तळीराम झोकांड्या खात पोलिस स्टेशनात आला. त्याने मला जोरात राम राम घातला. त्याचे दारू पिऊन मला राम राम करणे हे मला आवडले नाही. मी त्याला खडसावले. त्यावर त्याचा चेहरा गंभीर झाला व म्हणाला,

" साहेब... मी दारू पिदाड्या वाटलो...? याच्या आधी मला कधी प्यालेलं पाहिलं ?... धरणी मायेने माझे लेकरं बाळं गिळून टाकले... एवढं दुःख विसरता येईना, म्हणून तर नौटाक घेतली... आता मला तरी कुणासाठी जगायचं ? हा पैसा कुणाला देऊ "

सांगताना त्याने आपल्या खिशावर हात मारला आणि त्याचे डोळे झरझर वाहू लागले. मी थोडा वेळ काहीही बोललो नाही. त्याचे दुःख त्याच्या डोळ्यांतून वाहण्याचे थांबले. मग मी विचारले,

" मग कसे काय इकडे आले होते ? "

" साहेब... तुम्ही आपले म्हणून तर आलो... एरव्ही कोणी बोलवलं तर मी जात नसतो. "

" बरं ठीक आहे....बसा "

तो इकडच्या तिकडच्या थोड्याफार गप्पा करी. मग हळूच तो आपले

तत्वज्ञान अगदी गंभीर होऊन सांगत असे.
" मला एक सांगा साहेब... जेवढे मेले तेवढ्यांनी आपल्या बरोबर काय नेले... साहेब, खरं सांगा तुम्ही तरी काही नेणार आहेत का सोबत ? "
त्याच्या प्रश्नावर मी नाही म्हणून मान हलविली.
" पुन्हा मोठा भूकंप होणारच आहे... तेव्हा जिवंत आहोत तोवर खाऊन पिऊन मजा करा... साहेब, तुम्हीपण जास्त विचार करू नका... तुम्हाला म्हणून सांगतो, तुम्ही सुद्धा रात्री थोडीफार घेत जा ! "
त्याच्या या सल्ल्यावर बोलण्यासाठी माझ्याजवळ शब्द सापडत नव्हते. म्हणून मी म्हणालो,
" उपदेश केल्याबद्दल धन्यवाद.. ! आपण जाऊ शकता... "
किल्लारी गावात पैशाचा ओघ सुरू झाल्याची कुणकुण दूरवर पसरली होती. येथे आपला चांगला धंदा होईल या उद्देशाने बाहेरचे छोटे मोठे व्यापारी आले. धाबेवाले आले, हॉटेलवाले आले, दारूवाले आले, भविष्य सांगणारे कुडमुडे जोशी आले, व्ही.डी.ओ. गृहवाले आले, अनेक मोठमोठ्या एजन्सीचे एजन्ट लोक येऊ लागले, ज्यात फ्रीज, कलर टी.व्ही., जीप, ट्रॅक्टर इत्यादी. उमरगा, लातूर, निलंगा, औसा येथून नागरी बँकांचे प्रतिनिधी येऊन आमच्या बँकेत पैसे ठेवा अशी विनंती करू लागले.

किल्लारीत शासकीय मदतीची गंगा वाहू लागली. या गंगेत हात धुऊन घेण्यासाठी दूरदूरच्या वेश्याही आल्या आणि इथल्याच झाल्या.

## ३४

किल्लारी गावात राहणाऱ्या नागरिकांना बाहेरच्या अधिकाऱ्यांशी भेटण्याचा कधी प्रसंग आला नाही किंवा तशी कारणंही उद्‌भवत नव्हती. समता आणि सौजन्य इथे नांदत असल्यामुळे तक्रारींना फारसा वाव नव्हता. मी जेव्हा येथे पोलिस उपनिरीक्षक म्हणून आलो तेव्हा फारशा तक्रारी घेऊन लोक माझ्याकडे येत नव्हते. मात्र भूकंपानंतर बाहेरची अधिकारी मंडळी भूकंपग्रस्तांना भेटण्यासाठी व मदतीसाठी वारंवार येऊ लागली. त्यामुळे या लोकांना आपल्याकडे यावेच लागणार असा एक समज त्यांच्यात निर्माण झाला. अधिकाऱ्यांशी उर्मट बोलण्यापर्यंत भूकंपग्रस्तांची मजल जाऊ लागली. एखादे वेळेस एखाद्या अधिकाऱ्याने विशेष चौकशी केली असता, तो म्हणे,

" आम्हाला देशाचे पंतप्रधान भेटायला आले होते... तर तुम्ही कोण ? "

असे तोऱ्यात बोलण्याची जणू त्यांना सवय लागली होती. अलीकडे ऊठसूट लहान लहान तक्रारी घेऊन अधिकाऱ्यांशी हुज्जत घालीत होते.

एकदा तर भूकंपग्रस्तांना धान्य वितरण योग्य होते की नाही हे पाहण्यासाठी औस्याचे नायब तहसीलदार आले असताना कोणीतरी त्यांना धोंडा मारून जायबंदी केले होते. अशा घटना अलीकडे वारंवार होऊ लागल्या. भूकंपानंतर लोकांच्या मानसिकतेत झालेला हा बदल नोंद करण्यासारखा आहे.

भूकंपापूर्वी लोक पोलिसांशी सौजन्यपूर्ण वागत होते, नंतर

त्यांच्यातले सौजन्य कमी झाले. आम्ही सर्वांना मदत केली. रात्रीचा दिवस केला. आम्हाला स्वतःला आमच्या कुटुंबाचीही या कामापुढे आठवण झाली नाही. आम्ही सर्व पोलिस कर्मचारी एकाच तंबूत राहिल्यामुळे एक नवे बंधु-भावाचे नाते निर्माण झाले होते. एकमेकांची दुःखे ऐकून, एकमेकांना सहानुभूती दाखवत आम्ही दिवस काढीत होतो. आमच्यातलाच एक मित्र कागे हा सदैव बेचैन असे. त्यालाही कितीही समजावून सांगितले तरी त्याचे भ्रमिष्टासारखे वागणे आम्ही कमी करू शकलो नाही आणि ते शक्यही नव्हते. या विनाशकारी भूकंपात कागेचे सर्व मुलं-मुली मृत्यू पावली. त्यात त्याने नसबंदी शस्त्रक्रिया करून घेतल्यामुळे नव्याने आपत्य होण्याची संधीही नव्हती. याचे दुःख त्याला अधिक जाळू लागले.

" कागे,... असं निराश होऊन कसं चालेल...? हे विज्ञानयुग आहे... काहीतरी होईलच की..." मी त्याला दिलासा देत असे. तो मात्र आत्मविश्वास हरवल्यासारखा बोलत असे.

" आता कशावरच भरोसा नाही... साहेब... जगून तरी काय उपयोग ?"

त्याच्या बोलण्यामुळे आम्ही सर्वजण व्यथित होत होतो. एकमेकांची दुःख बोलून हलके करण्याचा आम्ही प्रत्येकजणच प्रयत्न करीत असू. या टेन्ट कुटुंबात हिंगे, उडते, वाघमारे, मडिले, शेटकर, कागे, इंगळे, कांबळे, नागरगोजे, घोडके, पवार, नागुरे व मी एका कुटुंबातले सदस्य असल्याप्रमाणे दीर्घकाळ राहिलो.

# ३५

भूकंपग्रस्तांचे सामाजिक व मानसिक पुनर्वसन झाल्यासारखे दिसू लागले. ज्या घरात लग्नाची मुल-मुली अशांनी स्थळं बघायला सुरूवात केली. लग्नाचे बार धुमधडाक्यात फुटायचे, मेजवाण्या झडायच्या आणि वाजतगाजत वराती निघायच्या.

असे दृश्य पाहिले की विधुरांच्या मनात आसक्ती निर्माण व्हायची. आपल्याही आयुष्यात पुन्हा असा प्रसंग यावा, असा विचार त्याला छळू लागे. आपल्या वयाचे भान न ठेवता केस रंगवून व दातांच्या कवळ्या बसवून मुली बघायला निघायचे.

ज्याच्या घरी जास्त माणसं मेली अशा विधुराला लोक बेधडक आपली मुलगी देऊन टाकत. त्याच्याकडे प्रचंड पैसा असल्यामुळे त्याचे वय न पाहता मुलगी देणारा आनंदात हो म्हणत असे. लग्न ठरल्यावर या वयात पुन्हा लग्न बरे दिसणार नाही. या जाणिवेने देवळात जाऊन देवा-ब्राम्हणाच्या साक्षीने हार घालण्याचे प्रयोग होत असत. एकदा एकाला मी विचारले,

" काय हो... दुसरं लग्न केलं म्हणे तुम्ही "

" होय साहेब... भाकरी पाण्याचा प्रश्न होता "

" पण तुम्हीतर... " माझे बोलणे पूर्ण व्हायच्या आधीच त्याने उत्तर दिले.

"अमका तर पन्नास वर्षांचा आहे, त्याने लग्न केलं. त्यामानाने मी तर तरूणच आहे "

" आम्हाला बोलवायला कसं काय विसरलात "

"देवळात लग्न केले... शोभत नाही ना साहेब आता...वाटल्यास पार्टी देतो"

मंगरूळ येथे मारूती भगवान कांबळे नावाचे सदगृहस्थ राहत होते. असतील पन्नास-पंचावन्नचे. भूकंपात त्यांची पत्नी मेली. त्यांचा मुलगा बालाजी हा तरूण होता. घरात बाई-माणूस नाही म्हणून बालाजीचे लग्न ठरविले. लग्न आनंदात पार पाडले. नवरीसोबतच तिची मोठी बहीण करवली म्हणून तिच्या बरोबर आली. नव्या जोडप्याचा मधुचंद्र होताना मारूती तळमळू लागला.

दिवसा बालाजी व त्याची पत्नी अर्थार्जनासाठी घराबाहेर जात. पाहुणी म्हणून आलेली करवली घरीच राहत असे. तिला तिच्या नवऱ्याने घटस्फोट दिला होता. दोघेही समदुःखी असल्यामुळे एकमेकांचे दुःख त्यांना कळले व साहजिकच पाहुणी आणि मारूती एकमेकांच्या जवळ आले. त्यांच्यातले प्रेम बहरू लागले आणि ही गोष्ट हवेने घराघरात नेऊन पोहचविली. शेवटी दोघेही तुळजापूरला जाऊन देवा ब्राम्हणाच्या साक्षीने विवाहबद्ध झाले. आता करवली म्हणून आलेली मोठी बहिण लग्न होऊन आलेल्या लहाण बहिणीची सासू झाली.

नीतिमत्तेला जोपासणारे गाव भूकंपानंतर नीतिमत्तेला तिलांजली देतांना दिसले. लिंबाळा दाऊ येथील एका म्हाताऱ्याने आपल्या नातीला चक्क आपली पत्नी म्हणून महसूल खात्याला मदत मिळण्यासाठी लिहून दिले. पैसा मिळविण्यासाठी माणूस किती खालच्या थराला जाऊ शकतो याचे हे उदाहारण होय.

नीतिमत्तेच्या ऱ्हासामुळे सामाजिक घडी विस्कटली गेली. स्वार्थ वाढत गेला. यापुढे भूकंपाचा धक्का सामाजिकदृष्ट्या कमी धक्कादायक वाटतो.

## ३६

भूकंप झाल्यानंतर भूकंपग्रस्तांच्या मदतीला त्यांचे नातेवाईक तात्काळ येऊ शकले नाही. तात्काळ मदत केली ती पोलिसांनीच, कित्येकांना आपल्या जिवाची पर्वा न करता ढिगाऱ्यातून बाहेर काढले. त्यांना जीवदान दिले. जखमी झालेल्यांना तातडीने शहरातील दवाखान्यात पाठविले. संकट येताना सर्वांनावर सारखेच येत असते. त्यातून आम्ही सुद्धा सुटलो नव्हतो. जेव्हा आसमानी संकट कोसळतं त्यावेळी कोणत्याही माणसापुढे एकच प्रश्न असतो, तो म्हणजे संकटात सापडलेल्याला वाचविणे. तो गरीब आहे की श्रीमंत आहे याचा विचार माणूस नावाच्या माणसापुढे तरी येत नाही. आम्ही रात्र-दिवस मढे काढून एकतर त्यांच्या नातेवाईकांच्या समक्ष त्यांना स्वाधीन करीत आणि जर कोणाचे नातेवाईक नसलंच तर त्याच्या आत्म्याला आम्हीच सद्‌गती देत होतो. कर्तव्यापुढे आमच्या मुलांबाळांचाही पूर्ण विसर आम्हाला पडला होता. भुकेची जाणीव व्हायची पण भाकरी खाण्यासाठी वेळ मिळत नव्हता. जिकडे तिकडे आक्रंदन चालू होते. सर्वांना यातून वाचविण्यासाठी आम्ही जिवाची बाजी लाऊन काम करीत होतो.

प्रत्येकाला मदत मिळाली पाहिजे यासाठी आम्ही नियोजनही केले. पण कुठलीही अपेक्षा आम्ही ठेवली नाही. पाऊस-वादळ-वारा रात्रीचे भयाण वातावरण असतानाही आम्ही लोकांचे जीव आणि वित्त रक्षण केले. हे सर्व किल्लारीकरांना ठाऊक आहे.

मदतकार्यात अडचण निर्माण होऊ नये म्हणून आम्ही बघ्यांना रोकले व गावात घुसलेल्यांना बाहेर काढले. हे कृत्य त्यांना आवडले नाही. म्हणून त्यांनी पोलिसांवर बेछुट आरोप केले. पोलिसांची प्रतिमा प्रसार माध्यमाद्वारे मलीन करण्याचा भरपूर प्रयत्न झाला. यामुळे गाडले गेलेले मुडदे काढण्याचं काम आम्ही थांबवलं नाही. पण आमचं मन मात्र विदीर्ण झालं होतं.

तत्कालीन पोलिस उप महानिरीक्षक श्री घुले साहेब व पोलिस अधीक्षक बिपीन बिहारी साहेब यांनी वृत्तपत्रांमधून जनतेला आवाहन केले. 'ज्यांना पोलिसांच्या कार्यावर आक्षेप आहेत, त्यांनी आपली तक्रार अतिरिक्त पोलिस अधिकारी श्री राजेंद्रसिंह यांचेकडे नोंदवावी. विशेष म्हणजे मुंबईवरून पोलिस अधीक्षक श्री रामराव घाडगे या संदर्भात चौकशीसाठी मुद्दाम आले होते. स्थानिक सामान्यापासून प्रतिष्ठितापर्यंत विचारणा करण्यात आली. लोकांनी आरोप तर सोडाच पण पोलिसांनी केलेले सहकार्य किती मोलाचे होते हेच वारंवार सांगितले.

गणवेशाच्या आतही असतो माणुसकीचा झरा,
पोलिसांतील माणूस तुम्ही जाणून घ्या हो खरा।

पोलिसी गणवेशात आम्ही असलो तरी कधी आम्ही माणुसकी सोडली नाही किंवा सोडणारही नाही. माझे किल्लारीतील लोकांशी अत्यंत विश्वासपूर्ण संबंध होते, आजही आहेत. वाईट कृत्य करणारी माणसं लोकांच्या फार काळ स्मरणात राहत नाहीत. आजही त्या भागातले लोक अधूनमधून मला भेटत असतात. किल्लारीशी माझे जे भावबंध निर्माण झालेत ते कधीही तुटणार नाहीत.

# ३७

शासकीय नोकरीत असताना बिऱ्हाड पाठीवर घेऊन आदेशाप्रमाणे गावोगाव फिरावे लागते. प्रत्येक गावी नवे संबंध निर्माण होतात. बदली झाली की ते संबंध तुटतात. आत्मियतेचे भावबंध सुख-दुःखाशिवाय निर्माण होत नाहीत. किल्लारीवर जर दुखद प्रसंग ओढवला नसता तर माझेही तिथल्या लोकांशी कायम स्मरणातील भावबंध निर्माण झाले नसते. मला किल्लारीकरांनी स्वीकारले होते. मीही त्यांच्याच कुटुंबातील एक सदस्य म्हणून राहिलो. प्रत्येकाला दुःखातून बाहेर काढण्यासाठी मी धडपडलो. मदतीचा ओघ आला. लोकांनी फिनीक्ससारखी झेप घेतली. सर्वजण नव्याने उभे राहू लागले. वातावरण निवळलं होतं. अशातच माझ्या बदलीचे आदेश येऊन धडकले. ही गोष्ट गावातील प्रत्येकाला ठाऊक झाली. माझ्याबद्दल त्यांच्या मनात असलेलं प्रेम जागृत झालं. लोक मला येऊन भेटू लागले. त्यांचं प्रेम पाहून मनातल्या मनात मलाही गहिवरून येऊ लागलं.

सगळयाच गावकऱ्यांनी व परिसरातील लोकांनी माझा नागरी सत्कार ठेवला. अनेकांनी शाल-श्रीफळ व पुष्पहारांनी मला सन्मानित केले. शाल पांघरताना या शालीतील उभ्या आडव्या धाग्यांमध्ये शाल घालणाऱ्याचे दुःख मला जाणवू लागले. त्याच्या प्रेमाचा स्वीकार करताना त्याच्यावर गुजरलेली वेळ मला आठवू लागली.

सत्कार व निरोप समारंभानंतर मी जड अंतःकरणाने जीपमध्ये बसलो. जीप निघाली पण माझं मन मागे रेंगाळत होतं. किल्लारी मागे

राहिली. दृष्टीआड होताना किल्लारी बाबतच्या सर्व आठवणी, त्यांचं प्रेम, त्यांचे सौजन्य आणि नीळकंठभाऊ मला वारंवार आठवू लागला.

संध्याकाळ झाली होती. सूर्य पश्चिमेकडे झुकला होता. हवेत गारवा निर्माण झाला. क्षितिजावर लाली पसरली. मी ड्रायव्हरला गाडी थांबविण्यास सांगितले. मी जीपमधून बाहेर आलो. मागे वळून किल्लारीकडे पाहिलं. ओस पडलेल्या गावावर काजवे चमकताना दिसले. एक ऐश्वर्य माझ्या डोळ्यांसमोर संपले होते. हे सगळं आठवलं आणि प्रयत्न करूनही अश्रूंना बांध घालता आला नाही. हुंदके आवरू शकलो नाही. माझा ड्रायव्हर देखील माझ्याकडे पाहून रडताना मला दिसला. सूर्य पूर्ण मावळला होता. अंधार पडू लागला होता. जीपचा उजेड समोरचा रस्ता दाखवीत होता.

" चलो साब.... "

मी नकळत जीपमध्ये जाऊन बसलो. दुसऱ्या गावी जाण्यासाठी.

**समाप्त...**



एकदा पुस्तक वाचण्यासाठी हातात घेतले की ते वाचतच रहावे वाटते. एखादी सुगरण खोप्याची गुंफन ज्या पध्दतीने करते. त्या पध्दतीने नावंदे यांनी प्रवाशी शब्दात या ग्रंथाची मांडणी केली आहे. भूकंपात प्रत्यक्षात असलेल्या आणि पहिल्या धक्क्यापासून अनेक धक्के सोसलेल्या सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या एका संवेदनशील लेखकाने केलेले हे वर्णन मराठी वाचकांना किल्लारीचा भूकंप व त्यामुळे उध्वस्त झालेले गांव, गांवाची बदललेली मानसिकता, माती दगडांचे प्रचंड ढिगारे, आत्यंतीक वेदनांनी विव्हळणारे असाह्य जीव, मृतांचे ढिगारे आणि अश्रु गोठविणारे कितीतरी हृदयद्रावक प्रसंगाचे वास्तव चित्रण किशोर नावंदे यांनी सर्मपक व परिणामकारक रितीने केले आहे.

त्या बद्दल त्यांना धन्यवादच दिले पाहिजेत.

**विकास आमटे**
आनंदवन



सुमेय प्रकाशन
नांदेड.